ISSN 2395-3748 | UGC APPROVED JOURNAL NO 64191
RNI REGISTRATION NO MAHMUL/2014/57148

# BULLETIN OF INDIAN SOCIETY AND CULTURE

A Peer-Reviewed Inter-Disciplinary International Research Journal

Vol 5 I Issue 2 I Feb 2018

## समकालीन हिंदी पद्य साहित्य विवेचन

SPECIAL ISSUE

संपादक

प्रा. क्षीरसागर पी. बी | डॉ. सोळंके सी. एन.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

समकालीन आदिवासी साहित्य
प्रा. नागनाथ बनसोडे
६८ - ७५

शेतकऱ्याच्या तोलाच्या जगण्याचा हृदयस्पर्शी आविष्कार म्हणजे 'असं जगणं तोलाचं' ही प्रादेशिक कादंबरी
डॉ. विजयकुमार शिवदास ढोले
७६ - ८३

पश्चिम खानदेशातील अदिवासी (भिल्लांची) लोकगीते
प्रा. डॉ. एम.बी. धोंडगे आणि प्रा. आर.एम. आहिरे
८४ - ९०

समकालीन साहित्य, संज्ञा व स्वरुप
प्रा. डॉ. चंद्रसेन एस. आवारे
९१ -९५

समकालीन मराठी ग्रामीण साहित्य
प्रा. डॉ. सहदेव विलासराव रसाळ
९६ - १०१

ऊससोड कामगार बनण्याची कारण मिमांसा
डॉ. श्रीम. गित्ते कविता नरसिंगराव
१०२ - १०७

मराठी रंगभूमीची स्थिती
हनुमंत बिरुदेव सौदागर
१०८ - ११२

जागतिकीकरणानंतरची समकालीन स्त्रीवादी साहित्याची चळवळ
प्रा.डॉ. गोविंद रामदिनेवार
११३ - ११९

आदिवासी साहित्याची वाटचाल
डॉ. मोहन श्रीरंग कांबळे
१२० - १२३

समकालीन शिक्षण व्यवस्थेचा भेदक आलेख : बॉनसाय
प्रा. डॉ. दिलीप भिसे
१२४ - १२७

समकालीन मराठी ग्रामीण साहित्य
प्रा. डॉ. संजय खाडप
१२८ - १३०

'गराडा' : शेतकऱ्यांच्या जीवनातील धगधगते जीवनवास्तव सांगणारी मराठी ग्रामीण कादंबरी
प्रा. डॉ. संगीता दत्ताजी मोरे
१३१ - १३५

समकालीन मराठी कादंबरी
प्रा. महारुद्र जगताप
१३६ - १४१

नंतर आलेले लोक कवितासंग्रहातील समकालीन जाणिवा
प्रा.डॉ. राजकुमार यल्लावाड
१४२- १४८

ग्रामीण कादंबरीतून आविष्कृत झालेले शेतकरी जीवन
स. प्र. ढास रवींद्र बाबासाहेब
१४९ - १५३

साठोत्तरी साहित्य प्रवाह आणि मराठी स्त्रीवाद
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट
१५४ - १५७

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VISHWABHARATI RESEARCH CENTRE

BULLETIN OF INDIAN SOCIETY AND CULTURE
ISSN 2395-3748
Vol 5. Issue 2. Feb 2018. pp. 124 - 127
http://www.vishwabharati.in
Paper received: 01 Jan 2017.
Paper accepted: 25 Feb 2017.
© VISHWABHARATI Research Centre

# समकालीन शिक्षण व्यवस्थेचा भेदक आलेख : बॉनसाय

प्रा. डॉ. दिलीप भिसे

साठोत्तरी कालखंडातील एक महत्वाचे कादंबरी कार म्हणून डॉ. सुभाष भेण्डे यांचे नाव आवर्जुन घेतले जाते. एकूण ११ कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. विषयाची विविधता व समकालीन प्रश्नांना निर्भिडपणे प्रकट करणारे त्यांचे कादंबरी लेखन आहे. यातील मबॉनसायफ ही सुभाष भेण्डे यांची समकालीन शैक्षणिक वास्तव चित्रण करणारी एक महत्वपूर्ण कादंबरी म्हणून उल्लेख करता येईल. शिक्षणक्षेत्रात बोकाळलेली सत्तास्पर्धा, भ्रष्टाचार आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यावर मर्मभेदकपणे प्रहार करणारी एक नितांत वाचनीय अन् मनाला अवस्थ करून जाणारी कादंबरी. यासंदर्भात वैजनाथ महाजन यांनी व्यक्त केलेला अभिप्राय लक्षवेधी ठरतो. ते म्हणतात, अंतर्मुख करून अस्वस्थ करणारी संवेदनशील मांडणी ही जी उत्तम लेखकाची कसोटी आणि त्यानंतर हातोटी असते, ती भेण्डे यांनी आपल्या लेखनातून वेळोवेळी सिद्ध केलेली आहे. मबॉनसायफ्ही त्यांच्या अशाच लेखक प्रवृत्तीतून उतरलेली कलाकृती होय.१ कोणत्याही विद्यापीठात आजवर घडत आलेले व या पुढेही घडू शकेल असे शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्ट वातावरण, सत्तास्पर्धेचे जिवघेणे

प्रा. डॉ. दिलीप भिसे : मराठी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई



खेळ अतिशय मार्मिकपणे या कादंबरीतून चित्रित होतात. या दृष्टीने ही कादंबरी एका महत्त्वपूर्ण विषयाला स्पर्श करते. या व्यवस्थेतील खरेखुरे वास्तव जगासमोर खुले करण्यात ती यशस्वी होते. म्हणूनच रंगनाथ कुलकर्णी बोलून जातात की, ङ्गसामाजिक जीवनातील अपप्रवृत्ती आणि विसंगती ताकदीने मांडून कधी पृथ:करणात्मकरीत्या भांडणारा सव्यासाची साहित्यिक प्रा. सुभाष भेण्डे यांनी बॉनसाय ही कादंबरी लिहून मोलाची अशी सामाजिक जबाबदारी पार पाडली आहे.ङ्ग २

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू बळवंतराव सोमण यकृतच्या कर्करोगामुळे प्रचंड त्रस्त असतात. यातून कायमची सुटका करून घेण्यासाठी ते झोपेच्या गोळ्या घेऊन आपली जीवनयात्रा संपवितात. शिक्षणक्षेत्र व विद्यापीठाचे पावित्र्य टिकविण्याचा ते शेवटपर्यंत प्रयत्न करतात. त्यांचे अचानक जाणे अनेकांना चटका लावून जाते. प्रा. दत्तू साटमासारखा संवेदनशील माणूस ढसाढसा रडतो. मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर बळवंतरावांनी राज्यपालांकडे प्रभारी कुलगुरूसाठी प्राचार्य वसंतराव मोडक यांची केलेली शिफारस मंजूर होते व सहा महिन्यांसाठी वसंतराव मोडक मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारतात. मात्र एवढ्यावरच समाधान न मानता त्यांची महत्त्वाकांक्षा आणखीनच बळावते. व पुढील तीन वर्षे विद्यापीठाचे हे सर्वोच पद आपल्याकडेच कसे राहील यासाठी त्यांची धडपड सुरू होते. या धडपडीतून अनेक घटना–प्रसंग, चढ–उतार कादंबरीत ओघाने येतात. व खऱ्या अर्थाने यातूनच कादंबरीचा विकास होत जातो. प्रचंड धूर्त, कावेबाज वृत्तीचे प्राचार्य सांगळे आपल्याला कुलगुरूपदापासून जाणीवपूर्वक डावलले गेले, म्हणून बळवंतराव सोमणांच्या नावाने खडे वेचतात. मजाता जाता म्हाताऱ्याने नांगी मारली आम्हाला विंचवासारखी !फअसा मनातील राग व्यक्त करतात. विद्यापीठीय राजकारणात स्वतंत्र ठसा उमटविलेले प्रा. दातार अत्यंत चाणाक्षपणे माजी आमदार संपतराव घोरपडे यांना डी. लिट. पदवीचे प्रलोभन दाखवितात. त्यांच्या खर्चाने नवनियुक्त कुलगुरूंच्यिा सत्काराचे आयोजन घडवून आणतात. त्या सत्कार समितीचे अध्यक्ष म्हणून शहराच्या नगराध्यक्षांना बोलावितात. कुलगुरू मोडक प्रा. दातार हे आपल्या कामाचे आहेत, हे ओळखून त्यांना प्राचार्यपद देण्याचे बोलून दाखवतात. मात्र प्रा. दातार या प्रस्तावास चक्क नकार देतात व विद्यापीठाच्या महत्त्वाच्या समित्यावर आपल्या मित्रांची, जवळच्या माणसांची नावे घुसडत आपल्या चतुरपणाची झलक दाखवतात. व जाता जाता डॉ. शिरोडकर हे तुमचे स्पर्धक होऊ शकतात, अशी चुगली करत मोडकांना सावध करतात. प्राध्यापक संघटनेचे कार्यवाहक प्रा. दत्तू

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Scanned with CamScanner



साटम विद्यापीठातील गैरकारभार, भ्रष्टाचार व इतर काही प्रकरणं कुलगुरूंच्या कानावर टाकतात. त्यातील दोषी विरुद्ध गंभीर कार्यवाहीसाठी आग्रह धरतात. त्यामध्ये विद्यार्थी ग्राहक भांडाराचा माल विकणारे प्राचार्य सांगळे, प्राध्यापकांकडून जास्त रकमेवर सह्या घेऊन कमी पगार देणारे गिरगावचे प्राचार्य, प्राध्यापकांनी प्राध्यापक संघटनेचे सभासदत्व स्वीकारू नये म्हणून फतवा काढणारे खेमचंद महाविद्यालयाचे प्राचार्य ठाकूर, नगर विकास मंत्र्याच्या मेव्हणीची रिव्हाल्यूशन केस व त्यात सहभागी असलेले रजिस्ट्रार झाबवाला. यांच्या विरोधी कार्यवाही व्हावी असा आग्रह साटम धरतात. तेव्हा दत्तू साटमसारख्या चळवळीतील कार्यकर्त्याला मोकळे ठेवणे आपल्यासाठी अडचणीचे ठरू शकते हे ओळखत कुलगुरू मोडक साटमांना झाबवालाचे रिकामे झालेले कुलसचिव पद देऊ करतात. साटम प्रथम आढेवेढे घेतात नंतर विचारांती या पदाचा स्वीकार करतात. साटम पद स्वीकारताच धडाडीने काम करण्याचे ठरवतात; परंतु आपल्या जाळ्यात साटम अडकल्याचे पाहून कुलगुरू चहुबाजूंनी त्यांची कोंडी करतात. अधिकारांवर गदा आणतात. व प्राध्यापक दातारांच्या सांगण्यावरून रांदेरीया, भरुचा यांसारख्या भ्रष्टाचारी वृत्तींना विद्यापीठीय कार्यात सामावून घेतात.

विद्यापीठातील इतिहास विभागात प्रपाठकपदासाठीच्या जागेसाठी विभागप्रमुख डॉ. फ्रँक रिबेटो हे प्रा. मॅन्यूअल फर्नांडिस या हुशार व मेहनती प्राध्यापकासाठी आग्रह धरतात; परंतु कुलगुरू त्यांची शिफारस डावलत आपल्या कौटुंबिक स्वार्थासाठी प्रा. शैला मुजूमदार या प्राध्यापिकेला प्रपाठकपदी नेमतात. या मोबदल्यात ते आपल्या मुलाला अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठीची प्रा. मुजूमदारचे वडील संचालक असलेल्या संस्थेकडून मिळणारी शिष्यवृत्ती पदरात पाडून घेतात. दरम्यान प्रा. दातार डी.लिट.च्या नावाखाली संपतराव घोरपडे यांची आर्थिक पिळवणूक सुरूच ठेवतात; तर वसंतराव मोडकदेखील पुढील तीन वर्षे आपले कुलगुरुपद कसे कायम राहील यासाठी खेळी खेळण्यात व्यस्त राहतात. पुढील काळात प्राध्यापक शिरोडकरांसारखा प्राध्यापक आपल्याला अडसर ठरू शकतो हे दातारांचे सूतोवाच लक्षात ठेवत ते प्रा. शिरोडकरांना रसायन–शास्त्र विभागातील प्रोफेसरपदी नेमणूक होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करतात; मात्र तज्ज्ञांच्या निर्णयासमोर त्यांची डाळ शिजत नाही. तेव्हा मात्र ते कुलगुरुपदाचा अवमान ठरावा अशा मार्गाने म्हणजेच प्राध्यापक दातार, रांदेरिया यांच्या मदतीने अमेरिकन संशोधक हेन्रिएटासोबत शिरोडकरांचे अनैतिक संबंध आहेत, असा बनाव करुन बदनामी करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी शिरोडकर अशा मंडळींच्या संकुचित विचारसरणीला कंटाळून विद्यापीठच नव्हे तर भारत देशच सोडून निघून जातात. मुख्यमंत्र्याकडून आपल्या नावाची शिफारस व्हावी म्हणून कुलगुरू मोडक मुख्यमंत्र्याचे खासगी सचिव भाऊसाहेब घाटगे यांच्या शिक्षणाचा बाजार मांडलेल्या संस्थेला संलग्नता देण्याचा प्रताप करतात व ह्याही पुढे जाऊन अतिशय चतुराईने संपतराव घोरपडे यांना डी.लिट पदवी देण्याचे दिलेले आश्वासन नजरेआड करत, स्वार्थासाठी मुख्यमंत्र्यांना ही पदवी मिळावी म्हणून शिफारस करण्याचा प्रयत्न करतात ; परंतु शेवटी मोडकांच्या या सर्व घडामोडींवर, प्रयत्नांवर पाणी पडते व अत्यंत नवखे असलेले मगुलाब वधवानीफ यांची मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदी पुढील तीन वर्षासाठी निवड झाल्याची बातमी सर्वत्र पसरते व परिणामस्वरूप मोडकांच्या पदरी निराशा येते. अशा स्वरूपाचे ढोबळ; परंतु आकर्षक कथानक लाभलेली बॉनसाय ही कादंबरी शिक्षणासारख्या मूलभूत व पवित्र क्षेत्रातील अवाजवी स्पर्धा, भ्रष्टाचार, बुजवेगिरी, हेवेदावे या सर्वांचे अतिशय भेदक व मार्मिक दर्शन समर्थपणे घडविते. त्यासोबतच विद्यापीठ, विद्यापीठातील मुलाखती, चर्चासत्रे, परिषदांचे वाढते पीक, यातील वास्तवता, ढोंगीपणा, सर्वोच्च पदाचा सर्रास होणारा गैरवापर, स्वार्थीपणा, गुणवत्तेला डावलून होणाऱ्या नेमणुका...अशा अनेक गंभीर प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ही कादंबरी करते. यादृष्टीने या कादंबरीचे महत्त्व व प्रासंगिकता लक्षात येऊ शकते.



मबॉनसायफकादंबरीमध्ये शिक्षणाप्रती आस्था असलेली, शैक्षणिक पेशाचं पावित्र्य अबाधित राहिलंच पाहिजे म्हणून झगडणारी माणसे जशी येतात, तशीच या क्षेत्राचं पावित्र्य जाणतेपणाने कलंकित करणारी, या पेशाला काळिमा फासणारी माणसेही येतात. वैजनाथ महाजन अशा दुसऱ्या प्रवृत्तीच्या माणसांना मखुज्या प्रवृत्तीची माणसेफ असे संबोधतात म्हणूनच की काय जागतिक पटलावर आपल्या देशाची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यापीठीय दर्जा उंचवण्यासाठी अजून काहीसा अवकाश आहे. असे खेदाने म्हणावे लागते.

## संदर्भ सूची

१. वैजनाथ महाजन : दै. केसरी, १० जुलै १९८८, पृष्ठ – ०२.
२. रंगनाथ कुलकर्णी : दै. नवशक्ती, २३ ऑक्टोबर १९८८, पृष्ठ– ०५
३. वैजनाथ महाजन : दै. केसरी, १० जुलै १९८८, पृष्ठ – ०२.

Scanned with CamScanner

Vol No. : 4 Issue No : 1 Mar. 2018

ISSN No. : 2350-1391

NIVRJ

# NEW INTERNATIONAL VALUABLE RESEARCH JOURNAL

UGC Approved List No. 63849



♦ Chief Editor ♦
Asst. Prof. A . V. Hingmire

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

NEW INTERNATIONAL
VALUABLE RESEARCH JOURNAL

# CONTENTS


| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | पेशवेकालीन ग्रामीण व्यवस्थेत बलुतेदारी पध्दतीचे स्वरुप<br>श्री.चव्हाण गणेश शंकरराव | 01 |
| 2 | हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात मराठवाड्यातील महिलांची भूमिका<br>(विशेष संदर्भ : बीड, परभणी परिसर)<br>प्रा.राजाभाऊ वेंकटराव भगत, | 06 |
| 3 | అభ్యుదయ కవితాశరధి దాశరధి<br>డా॥ జి. ప్రవీణ్ కుమార్ | 10 |
| 4 | पर्यावरणवादी स्त्रीवाद - पर्यायी विकास दृष्टीकोण<br>प्रा. शिवाजी उकरंडे | 18 |
| 5 | Analyzing of Yoga and its Benefits ,Their Asana<br>B. Venkateshwarlu | 23 |
| 6 | बीड जिल्ह्यातील मराठी कादंबरी<br>प्रा.डॉ. दिलीप भिसे | 28 |
| 7 | మహాకవి దాశరథి<br>పల్లె సైదులు, | 33 |
| 8 | बीड जिल्हयातील उस तोडकामगारांच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण घेताना येणा—या अडचणींचा शोध व त्यावरीलउपाय योजना— एक अभ्यास<br>प्रा. तेजस आश्रुबा तिडके, | 40 |
| 9 | हायटेक प्रशासनाचे पर्व- ई- गव्हर्नन्स, विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य<br>डॉ.बालासाहेब किलचे | 44 |
| 10 | जागतिक तापमानवृध्दी एक ज्वलत समस्या<br>डॉ. प्रतिमा गिरगावकर | 50 |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

**ORIGINAL ARTICLE**

# बीड जिल्ह्यातील मराठी कादंबरी

प्रा.डॉ. दिलीप भिसे,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई

कादंबरी हा कथा, कविता, नाटक या वाङ्मयप्रकाराप्रमाणेच साहित्याचा एक मुख्य प्रकार होय. विशाल अवकाश पट, अनेक आशय सूत्रे, पात्रांची गर्दी निवेदनाच्या अनेकविध पद्धतीतून गद्य शैलीची लोचिकता जपत कादंबरी वाङ्मयप्रकार बाह्य व आंतर भावविश्वाला समर्थपणे व्यक्त करण्यात यशस्वी होतो. जीवनाशी संबंधीत विविधप्रकारचे विषय घेऊन त्यानुसार कथासूत्रे पकडून कादंबरीने सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, ग्रामीण, दलित, प्रादेशिक, आत्मचरित्रात्मक, संज्ञाप्रवाहात्मक, विज्ञानविषयक अवतार धारण करत आजवर समृद्ध वाटचाल केली आहे. या वाटचालीचे प्रमुख शिलेदार 'यमुनापर्यटन' या पहिल्यावाहिल्या कादंबरीचे लेखक बाबा पद्मनजीपासून आजपर्यंतच्या कादंबरीकारातून बरीच नोंदवता येईल. परंतु प्रस्तूत लेख विषयाचे स्वरूप लक्षात घेता या निमित्ताने केवळ बीड जिल्ह्यातील मराठी कादंबरीकारांचा, त्यांच्या कादंबऱ्यांचा आढावा घेणे मुख्य उद्दिष्ट आहे.

याअंतर्गत बीड जिल्ह्याच्या पार्श्वभूमीवर आरंभीच्या काळात अग्रक्रमाने येथील शोषित समाज व्यवस्थेचा, इथल्या शेतीमातीचा, वातावरणाचा संवेदनशीलतेने जाणीवपूर्वक वेध घेणारे कै. त्र्यंबक आसरडोहकर हे महत्वाचे कादंबरीकार. 'हऱ्यानाऱ्या', 'लीडर' व 'काळी आई' अशा आशयसंपन्न कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. या कादंबऱ्यामधून बीड जिल्हातील माणूस, शेती, निसर्ग, सामाजिक, राजकीय प्रश्न, शेतकरी, कष्टकरी, गोर-गरीब यांच्या दुःखाला आस्थेने समजावून घेतले. आपल्या लेखनाच्या प्रेरणा सांगतांना त्यांनी 'काळी आई' कादंबरीच्या मनोगतात म्हटले आहे की, "मी कधीतरी अस वाचलं होत की, समाजमनाचं खरंखुरं प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात प्रतिबिंबीत झालेलं असतं आणि हे जर खरं असेल तर महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत राहणाऱ्या गरीब, शोषित, अशिक्षित, कष्टकरी समाजाचं, समुहमनाचं चित्रण त्यांच्या गुणदोषांसह मराठी साहित्यात प्रतिबिंबित व्हायला हवं आहे. या एकाच प्रामाणिक इच्छेपोटी मी अधूनमधून लेखन करीत असतो. "म्हणूनच दिवसेंदिवस शोषितांचे भक्ष्य होत चाललेल्या खेड्यातील अशिक्षित, गरीब कष्टकरी समाजाची बाजू घेणारी, समाजाच्या गंभीर प्रश्नांची दखल घेणारी 'काळी आई' ही कादंबरी महाराष्ट्रातील शेतकरी आणि शेती यांच्यातील अतूट भावबंधावर भाष्य करणारी कादंबरी वाटू लागते. धरणं, तलावं उभारणीसाठी शेतकऱ्याच्या कित्येक पिढ्या पोसलेल्या त्या काळ्या आईला अर्थात शेतीला अनेकांना मुकावे लागले. काहींनी त्यातून अन्य ठिकाणी जमीनी घेऊन स्वतःला सावरले, जगवले; मात्र काहींच्या जगण्याची आबाळ झाली. जगण्याची उमेद, उत्साह पार ढेपाळून गेला. मावेजापोटी मिळालेल्या पैशाची उधळपट्टी झाली. व्यसनाधिनता वाढली. कितीतरी संसाराची राखरांगोळी झाली. अशा प्रश्नांचा वेध घेणारी 'काळी आई' कादंबरीतील मांडणी लक्षणीय आहे.

'हऱ्यानाऱ्या' कादंबरीतून अडाणी, अशिक्षित, भोळसर ग्रामीण माणसांचे शोषण, छळ, लुबाडणूक हऱ्यानाऱ्यासारखे धुर्त, स्वार्थी स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक कशाप्रकारे करतात, याचे वास्तव चित्रण





केले आहे. 'लीडर' कादंबरीमधून स्वातंत्र्योत्तर काळात प्रचंड मागास आणि पिचलेल्या मराठवाड्याला नव्याने स्थापीत झालेल्या राजकीय व्यवस्थेकडून व शासकीय यंत्रणेकडून प्रश्नांची सोडवणूक होऊन विकासाची गंगा प्रकटेल अशी खूप आशा लागून होती. काही प्रमाणात तसे प्रयत्नही झाले ; मात्र त्यांच्याही अधिक स्वार्थी, संधीसाधू, दिशाहीन, संवेदना हरवलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी इथली सगळी व्यवस्था पोखरून टाकली. त्यांच्या भ्रष्ट आणि शोषित कारभाराने इथला ग्रामीण, कष्टकरी माणूस अधिक व्यथित झाला. त्यांचे दुःख कमी होण्याऐवजी वाढत गेले. त्याचे जगणे कठीण झाले. अशा स्वरूपाचे वास्तववादी चित्रण 'लीडर' कादंबरीतून येते.

एकूणच त्र्यंबक आसरडोहकर यांचे लेखन बीड जिल्ह्याच्या पार्श्वभूमीवर असले तरी समस्त मराठवाडा, महाराष्ट्रांमधील शेतकरी, कष्टकरी, शोषित यांच्या हक्काची बाजू घेणारे होते असे म्हणता येईल. त्याप्रमाणे ते काही समकालीन नव लेखकांसाठी प्रेरणादायी होते. जसे की, विजय सिरसाट या कादंबरीकाराने आपल्या 'कुस्ती' कादंबरीच्या मनोगतात तशी कबुली दिली आहे. निश्चितच ही बाब एखाद्या लेखकाचे मोठेपण दर्शवण्यासाठी पुरेशी आहे, असे म्हणता येईल.

एकूणच मराठी कादंबरीत लक्षणीय भर घालणारे कादंबरीकार म्हणून 'प्रा. रंगनाथ तिवारी' यांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते. देवगिरी बिलावल, बेगम समरू, अनन्वय, उत्तमपुरुष एकवचन आणि गुरुदेव अशा सशक्त कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. ऐतिहासिक कादंबरी लेखनात महत्त्वपूर्ण भर घालणारी रंगनाथ तिवारी यांची 'देवगिरी बिलावल' ही एक बृहत् कादंबरी. यादवकालीन इतिहास, घटनाक्रम, सामाजिक व धार्मिक जीवन, सांस्कृतिक संपन्नता, गोपाल नायक, अमिर खुसरो, कँवल देवी, देवल राणी, मलिक काफूर, यादवसत्तेची धुळधान करणारा अल्लाऊद्दीन खिलजी अशा मुख्य पात्रांच्या उभारणीतून कादंबरी आकार घेते. 'अनन्वय' या कादंबरी देव मामलेदार या प्रभावी, तेजस्वी व्यक्तिमत्वाच्या जीवनावर सखोल प्रकाश टाकला आहे. प्रत्यक्ष भगवान शंकराचीच प्रतिमूर्ती म्हणून देव मामलेदाराचे स्वरुप व कर्तृत्व प्रभावीपणे रेखाटले आहे. भारतीय इतिहासातील एक विलक्षण, रोमहर्षक स्त्री व्यक्तिमत्व 'बेगम समरू' या कादंबरीच्या माध्यमातून रंगनाथ तिवारी यांनी चित्रित केले आहे. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास "वीर रसानं शृंगाराशी सोयरीक करावी आणि शृंगाराने पराक्रमाशी अभिसार करीत करीत शांत - रसाचा उंबरठा. लिलया ओलांडून निर्वेदाच्या नादी लागावं - असले विचित्र रसायन" उभे करण्यात कादंबरीकार म्हणून रंगनाथ तिवारी यांना यश लाभले आहे. कथानकाची विलक्षण गतिमानता आणि ऐतिहासिक वातावरण निर्मितीतील सहजता लक्ष वेधून घेणारी आहे. 'उत्तम पुरुष एकवचन' कादंबरीच्या शीर्षकातील 'उत्तम' हे नाव कादंबरीचे मुख्यपात्र आहे. उत्तमच्या भोवती कादंबरी साकार होते. सरंजामशाही व्यवस्था, रियासतदारांचे कौटुंबिक भावविश्व, त्यांच्या चालीरीती, रझाकारी अन्याय, अत्याचाराचा वास्तवपूर्ण वेध घेणारी ही एक उल्लेखनीय कादंबरी. कादंबरीची भाषाशैली उर्दूमिश्रित मराठी व दखनी या स्वरुपाची आहे. कादंबरीतील आशयानुरूप आलेले चित्रण व संवादरचना अतिशय वेधक आहे. 'गुरुदेव' ही रविंद्रनाथ टागोर या थोर कवी, व्यक्तिमत्वाचा वेध घेणारी एक महत्वाची व काव्यात्मक कादंबरी. रविंद्रनाथ टागोरांचे व्यक्ती म्हणून असलेले मोठेपण व साहित्यक्षेत्रातील त्यांचा लौकिक या घट्ट विणीतून ही कादंबरी वाचकाच्या मनाचा ठाव घेते.

वासुदेव मुलाटे हे मराठी साहित्यातील जेष्ठ समीक्षक व कसदार कथाकार म्हणून सुपरिचित असे महत्वाचे नाव. 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही एकमेव लक्षवेधी कादंबरी त्यांनी लिहिली. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे विविध अंगाने चित्रण करून एका महत्त्वपूर्ण विषयाचा गांभीर्याने वेध घेतला. 'सहकाराने सामान्य माणसाचा, समाजाचा देशाचा उद्धार अपेक्षित होता, तुम्हाला, मला, जनसामान्याला, लोक प्रतिनिधींना, राज्यकर्त्यांना हा उद्धार हवा होता. झाला का ? का झाला नाही ? झाला तर कुणाचा ? हे मला स्वतःला पडणारे प्रश्न आहेत 'एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' असे हातात हात मिळविणाऱ्यांचे हात कुणाचे ? कोणत्या सुपंथाला येऊन पोहोचलो आहोत आपण ? माझ्या मनातल्या या प्रश्नांनीच मला 'विषवृक्षाच्या मुळ्या' लिहायला प्रेरणा दिली. सहकाराचा वृक्ष खरा तर कल्पवृक्ष; पण तो तसा उरलाही नाही, तो विषवृक्ष झाला आहे आणि त्याच्या मुळ्या खोलवर जमिनीत पोहोचल्या आहेत. त्याच्याच शोधाचा प्रयत्न कादंबरीतून झाला आहे.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

वि.शं.पारगावकर हे मुळ बीड जिल्ह्यातील, सध्या पुणे येथे वास्तव्य असलेले विपुल कादंबरीलेखन करणारे कादंबरीकार. कालचक्र, अंतरिता, ललाट, निगुडा, वैशाखातील वावटळ, शेवगा वेडा झाला, एक होता राजा, पांढरी माती, अपरंपार, ललिता, गोंदण, अयोनिजा अशा त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. बीड व सभोवतालच्या ग्रामीण जीवनाचा चेहरा असणाऱ्या एकत्र कुटुंब पद्धतीचे जीवन जगणाऱ्या तीन पिढ्यांच्या उत्कर्षाचा व नाशाचा आलेख लेखकाने 'कालचक्र' मध्ये मांडला आहे. मराठी ग्रामीण साहित्यात ब्राह्मण कुटुंबाचे पांढरपेशी अस्तित्व, जे मराठी ग्रामीण कादंबरीत फारसे आलेले नाही ते चित्रित करण्यात पारगावकरांना यश आले आहे. 'अंतरिता' या कादंबरीत संयुक्त ब्राह्मण कुटुंबाचे आणि खेड्यातील विविध स्थरातील, समाजामधील ताण-तणावाचे दर्शन घडविले आहे. जसे की, ब्राह्मण, मराठा, महार, मांग, चांभार, शिंपी, तांबोळी यांचे परस्परातील आर्थिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक ताणतणाव फारच प्रभावीपणे रेखाटले आहेत. डॉ. दादा गोरे यांनी अंतरिता कादंबरीचे महत्त्व व स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे की, "पारगावकरांची 'अंतरिता' समाजजीवन चित्रणाच्या दृष्टीने हरिभाऊ आपटे यांच्याशी नाते सांगते, तर दुसरीकडे ती गो.नी.दांडेकरांच्या 'पडघवली' ची आठवण करून देते... आपल्या साध्या, सरळ शैलीने मराठवाड्याच्या बीडसारख्या मागासलेल्या ग्रामीण परिसरातील कुटुंबजीवन आणि समाजजीवन यांची अभिव्यक्ती पारगावकर या कादंबरीतून करतात... ग्रामीण ब्राह्मण कुटुंबातील तीन गावांची ही कथा आहे. पण ती त्या कुटुंबापुरतीच मर्यादित न राहता खेड्यातील लोकजीवनाचे ताणतणावाचे कळतनकळत चित्रण करीत जाते... एकूण 'अंतरिता' ही कादंबरी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठवाड्यातील जीवनाच्या स्थितीगतीचा एक कलापूर्ण दस्तावेजच ठरते." 'शेवगा वेडा झाला' या कादंबरीत सभोवतालच्या विकृतीपणाचा सद्वर्तनी विचारसरणीवर होणारा परिणाम चित्रित झाला आहे तर निगुडा' या कादंबरीत प्राचीन मानवाच्या प्रगत जीवनाच्या पाऊलखुणा आजही थक्क करून जातात याचे अभ्यासपूर्ण चित्रण आले आहे.

मराठी साहित्याच्या अभ्यासक व अध्यापक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या डॉ. शैला लोहिया यांनी कथा, कविता निर्मितीसोबत 'शोध अकराव्या दिशेचा' ही एक लक्षणीय कादंबरी लिहिली. अनुराधा व श्रीनाथ या सामाजिक ध्येयाने प्रेरित, दुष्काळग्रस्त, गोर-गरीब, शोषितांच्या न्याय, हक्कासाठी लढा देणाऱ्या जोडप्याची कथा समोर ठेवत डॉ. शैला लोहिया स्वतःची व पती डॉ. द्वारकादास लोहियांची जीवनकथा कथन करतात. कथेच्या अनुषंगाने साने गुरुजी, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, डॉ. बापू काळदाते, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, उत्तमराव पाटील यदुनाथ थत्ते आदींचे आलेले अर्थपूर्ण उल्लेख कादंबरीला अधिक अर्थता प्राप्त करून देतात. बप्पा देशमुख, अण्णा, अशक्या, अंकुश, अमन ही हाडाची कार्यकर्ते मंडळी आपल्या परिसरातील, आपल्या भोवतालची आहे, हे वाचकाला नव्याने सांगण्याची गरज राहत नाही. कादंबरीतील विविध प्रसंग, घटना, निसर्गवर्णने वैशिष्ट्यपूर्ण आहेत." निसर्ग वर्णनांना काव्यात्म शैलीची जोड मिळाल्याने या समग्र निवेदनाला कलेचा दर्जा प्राप्त झाला आहे." असे प्रा. मधू जामकर यांचे गौरव उद्गार कादंबरीचे वाङ्मयीन योगदान स्पष्ट करून देतात.

सौ.मंदा देशमुख यांनी दीर्घकाळाच्या चिंतनातून 'नक्षलविश्वाची गोंडराणी' कादंबरीची उभारणी केली आहे. तब्बल वीस वर्षं मी ही 'कादंबरी' लिहित होते असे मनोगतात त्यांनी स्पष्ट केले आहे. मानवी मनाचे भावविभोर अविष्कार उलगडून सामाजिक प्रेमापोटी, आदरापोटी, माणूस किती उंचीवर स्वतःला नेऊ शकतो याचे चित्रण. या कादंबरीत येते. शेखर सावजी व अनुराधा इनामदार यांच्यातील अबोल, मधुर मैत्रीची सुंदर गुंफण फारच वेधक साधली आहे. भ्रष्टाचाराने लदबदले राजकारण, स्वार्थी राजकारणी व प्रशासकीय अधिकारी वर्गातील संघर्ष, रियासतदारांचे रीतीरिवाज, महाल, दिवाणखाण्यांचे विलासी वर्णने रेखाटण्यात लेखिकेला मोठे यश लाभले आहे. सहृदतेने आणि प्रेमळ भावनेने साकार झालेली सयंमी गोड शब्दकळा कादंबरीचे बलस्थान आहे.

पद्माकर संभूस यांनी लिहिलेली सहज, ओघवती व वाचनीय अशी 'वैरी' कादंबरी, संजीव-शीला, अजय-लता, या दोन विवाहित जोडप्याच्या माध्यमातून साकार होणारी कादंबरी. विवाहपूर्व जीवन, प्रेमातील





चढउतार, कौटुंबिक ताणेवाणे, आंतरिक मनातील अस्वस्थता अधिक भावपूर्णरित्या यशस्वी मांडली आहे. कादंबरीची अभिव्यक्ती, निवेदनशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे.

उमेश मोहिते, बीड जिल्ह्यातील एक महत्त्वाचे कथाकार. 'बांधणूक' व 'वळण' या दोन कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित आहेत. 'बांधणूक' कादंबरीत उपजत कौशल्य व परिस्थितीची जाणीव असलेली एक निरक्षर माता जगण्याची वाट चुकलेल्या आपल्या मुलाला कशाप्रकारे समर्थपणे सावरते. म्हणजेच त्याच्या ढासळलेल्या व्यक्तिमत्त्वाची 'बांधणूक' करते याचे प्रभावी चित्रण केले आहे. 'वळण' कादंबरीत वळणं नायाच्या मुलाची कहाणी येते. लहानलहान गोष्टीवरून झालेले भांडण कसे वाढत जाते : पुढे हा वाद निवळून वळण या नायकाच्या आयुष्याला नवे वळण कसे लाभते, याचे प्रभावी चित्रण केले आहे. शालेय विद्यार्थ्यांचे भावविश्व, हेवेदावे, भांडणतंटे, मौजमज्जा. त्यातून घडणाऱ्या बऱ्यावाईट घटना. या सर्वांचा पालकवर्गावर होणारा परिणाम त्यांच्या जबाबदाऱ्या अशा अनेक मूलभूत प्रश्नांना उजागर करण्यात ही कादंबरी यशस्वी होते.

गो.गो.कुलकर्णी ज्या मातीत आपण वाढलो त्या मातीचे काही देणे लागतो हे देणे वेगवेगळ्या रुपाने फेडता येऊ शकते हा विचार बळावत गेला आणि 'काहूर' आकारले. अशा जाणिवेतून साकार झालेल्या कादंबरीतून रझाकारीपूर्व व उत्तरकाल चित्रित झाला आहे. वतनदारांचे परस्परांतील प्रेम व द्वेष चित्रित करताना वनिता आणि अमृत या मुख्य पात्रांच्या जडणघडणीतून कादंबरी आकारास येते. प्रेमसंबंधातील संसारातील सूक्ष्म ताणेवाणे, घडामोडी कादंबरीला वाचनीयता प्रदान करतात.

विद्याधर पांडे हे एक बहुआयामी व महत्त्वाचे लेखक, कादंबरीकार. 'मांजराकाठ' व 'मराठे हिंदूराव नायक' अशा दोन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. 'मांजराकाठ' कादंबरीतून ग्रामीण माणसाचे रागलोभ, हेवेदावे, कोर्टकचेऱ्या, तुरुंगवास, पती-पत्नीमधील तुटलेपण, हेकेखोरपणा, संशयीवृत्ती, व्यसनाधिनता, शेतकरी कर्जमाफी, जोडधंदा, उदासीन शासन व्यवस्था या अशा ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांवर अचूक प्रकाश टाकला आहे. 'मराठी हिंदूराव नायक' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी. शीर्षकापासून वेगळेपणा, उत्सुकता निर्माण करणारी. गांधीजीच्या 'खेड्याकडे चला' या संकल्पनेला खरी उतरणारी. कादंबरीच्या स्वरुपाबाबत प्रा. शैलजा बरुरे म्हणतात "बालविवाह, बहुपत्नीत्व चंगळवाद, भ्रष्टाचार, शेतीची दुरावस्था, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेकारी, वंचित व शोषित समाजाचे बेघरपण, अंधश्रद्धा, धर्मांधता, अनैतिकता व समाजातील मूल्यांची घसरण या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार मांडत ही कादंबरी आकरास आली आहे." या कादंबरीच्या आशय अभिव्यक्तीच्या रंगरुपावरून विद्याधर पांडे यांच्यातील सामर्थ्यशाली कादंबरीकाराची चुणूक पाहायला मिळते.

प्रा. उदार नरसिंग यांची 'ठणूक' ही लघू कादंबरी भटक्या, विमुक्त समाजजीवनाचे वास्तव चित्रण करण्यात यशस्वी झाली आहे. आनसा, भिव्या, म्हारुत्या, संकरदा, सिंदाप्पा, नाम्या, सुकानाना, संपाज अशी विविध पात्रे या समाजाचे जगणे, भाषा, प्रश्न मांडण्यात यशस्वी होतात. कादंबरी लेखक म्हणून प्रा.उदार यांचा पहिला प्रयत्न वाखण्याजोगा आहे.

'काचकांगऱ्या' या कादंबरीतून डॉ. राजीव उन्हाळे यांनी 'रायगाव' या खेड्याच्या परिसराचे, समाजजीवनाचे, चालीरीतीचे, इथल्या माणसांचे वेधक चित्रण कादंबरीत रेखाटले आहे. महाविद्यालयीन जीवनानुभवाची, आठवणीची पुनर्जाणीव करून देणारी वैशिष्ट्यपूर्ण आणि वाचनीय कादंबरी आहे.

विजय जावळे यांची 'चारखणी' व 'भाऊबंधकी' या उल्लेखनीय कादंबऱ्या. आजच्या पिढीतील एक सकस व उमेदीचे कादंबरीकार म्हणून विजय जावळे यांचा उल्लेख करता येईल. 'चारखणी' कादंबरीतून रंगवलेले गावपातळीवरचे राजकारण प्रतिनिधिक स्वरुपाचे आहे असे म्हणता येईल. तर 'भाऊबंधकी' या कादंबरीतून भाऊबंध, भावकीतले हेवेदावे, भांडणतंटे या सर्वांचा घेतलेला वेध चिंतनीय आहे.

महावीर जोंधळे बालसाहित्यिक व पत्रकार म्हणून योगदान. 'शिवाचीवाडी' ही किशोर कादंबरी व 'बिगुल' ही राष्ट्रीय कादंबरी त्यांनी लिहिली आहे. शिवाचीवाडी या कादंबरीत देशासाठी बलीदान दिलेल्या शिवाची कथा येते वाडीतील लोक त्याचा पुतळा उभारतात त्याच्या शौर्याचा अभिमान बाळगतात. 'मुलांच्या नावाने' ही लघु कादंबरी त्यांच्या नावावर आहे.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

दि.गो. मुंढे बीड जिल्ह्यातील आणखीन एक उल्लेखनीय कादंबरीकार. 'सरितासागर' ही महत्वाची कादंबरी त्यांनी लिहिली. रक्ताच्या स्वार्थी नात्यापेक्षा मानलेल्या नात्याची पवित्रता व निःस्वार्थीपणा अधिक असल्याची मांडणी मुंढे यांनी या कादंबरीच्या अनुषंगाने केली आहे. यासोबतच त्यांच्या 'केवड्याचे कणीस', 'रसिका' या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे, वृत्ती प्रवृत्तीचे अनोखे दर्शन घडविले आहे.

डॉ. सतीश साळुंके हे अभ्यासू इतिहासकार व एकांकिका, नाटकामध्ये विशेष योगदान असलेले नाटककार म्हणून परिचित असे नाव. त्यांची मुलांच्या भावविश्वाचा वेध घेणारी 'उदाहरणार्थ' ही लघु कादंबरी प्रसिद्ध आहे.

याशिवाय आवर्जून नोंदी घेता येतील अशा कादंबरीकारामध्ये चंद्रकांत बिवरे यांची 'हळदीघाट' ही कुमार कादंबरिका प्रसिद्ध आहे. प्राचार्य भगवान काळे (धारुरकर) यांची 'कर्मरेखा'ही कादंबरी कर्म, जीवनावर भाष्य करते. विश्वप्रकाश खरात (धारुरकर) यांची 'खोपीतील सनद' ही एक उल्लेखनीय कादंबरी. सखा गायकवाड यांची 'भारताचा सातबारा' ही कादंबरी भारतातील लोकशाही, शासन व्यवस्था व समाज जीवनातील गुणदोष मांडते. श्रीपाद भाले यांची वैशिष्ट्यपूर्ण शीर्षक असलेली "३ PM to ३ AM" ही कादंबरी.

एकूणच उपरोक्तपणे बीड जिल्ह्यातील मराठी कादंबरीचा वेध घेतला असता ही संख्या मोजकी असली तरी आशय अभिव्यक्तीच्या अंगाने समाधान देणारी आहे. बीड जिल्हा व सोबत संपूर्ण मराठवाड्यातील माणूस, समाज, शेतीमाती, त्यांचे प्रश्न, समस्या अधोरेखित करण्यात यशस्वी झाली आहे. मराठवाड्यावर सत्ता असलेल्या अन्यायी रझाकाराचा काळ व त्यांच्या पाडावानंतरची परिस्थिती नेमक्या स्वरुपात रेखाटण्यात या कादंबरीला यश आले आहे. पराक्रमी व वैभवशाली इतिहास उभा करण्यात ही कादंबरी यशस्वी झाली आहे. सरंजामशाही, रियासती थाटमाट, ग्रामीण, आदिवासी, दलित व्यवस्थेचे प्रश्नांकित जगणे या कादंबरीचे मुख्य विषय आहेत. विकासाची मूल्य पायदळी तुडवणारी इथली राजकीय व प्रशासकीय व्यवस्था कादंबऱ्यांतून निडरपणे मांडली आहे. त्याचप्रमाणे अनेक समकालीन विषय, प्रश्नांना उजागर करण्यात या कादंबऱ्यांना यश आले आहे. थोडक्यात एकूणच मराठी वैभवशाली कादंबरीला आपल्यापरीने अधिकाधिक समृद्ध करण्यात 'बीड जिल्ह्यातील कादंबरी' यशस्वी झाली आहे असे आवर्जून म्हणता येते. शेवटी जाताजाता उपरोक्त लेखनात जर एखाद दुसऱ्या कादंबरीकाराचा, त्यांच्या योगदानाचा उल्लेख राहून गेला असल्यास त्याबद्दल क्षमस्व व्यक्त करून या लेखनास पूर्ण विराम देतो.





**ORIGINAL ARTICLE**

# మహాకవి దాశరథి

పల్లె సైదులు,
ఎం.ఎ.తెలుగు,
ఉస్మానియా విశ్వవిద్యాలయం,
చరవాణి- 9959528783.
ఈమెయిల్- pallesairaj@gmail.com

దాశరథి పూర్తి పేరు దాశరథి కృష్ణమాచార్యులు. దాశరధి అనేది వారింటి పేరు. వారిది శ్రీవైష్ణవ కుటుంబం శ్రీవాత్సవ గోత్రం. విశిష్టాద్వైత సిద్ధాంత ప్రవక్తలయిన శ్రీమద్రామానుజాచార్యుల వారి ప్రధాన ఆంతరంగిక శిష్యులతో దాశరధి అనే వ్యక్తి మొదటివాడు. చతుష్షష్టి సింహాసనాధీశులలో ఒకడు. ఆతడు మహా విద్వాంసుడు.శ్రీ రామానుజాచార్యులచే ఉపదేశం పొందిన ధన్యుడు. శ్రీమద్రామానుజాచార్యుల వారు తమ పర్యటనలో భాగంగా తెలంగాణప్రాంతాన్ని రచించిన సందర్భంలో వారి శిష్యులైన దాశరథి ఈ ప్రాంతంలో స్థిరనివాసం ఏర్పరుచుకున్నారు. క్రమంగా వారి సంతతి వారందరికి దాశరథి అనే వంశనామం ఏర్పడింది.దాశరథిగారి తండ్రి వెంకటచార్యులు గొప్ప సంస్కృత విద్వాంసులు. మద్రాసు విశ్వవిద్యాలయంలో విద్వాన్ యోగ్యతను సంపాదించాడు. వారు తమిళభాషలో ఉన్న వైష్ణవ మత వచన గ్రంథాలను ఆంధ్రీకరించారు."నాలాయిరా" ప్రబంధంను తెనిగించారు. దాశరథి అనే మాస పత్రికను కూడా నడిపాడు. చిన్నతనంలో కాళంబరి, అప్పకవీయం. లిల్లాపియం వంటి గ్రంధాలు కంఠ పాఠంగా వచ్చేవి. 1940లో దాశరథి (sacturace) పోటీలో ప్రథమంగా వచ్చాడు.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# संतांचा मराठी साहित्यावरील प्रभाव



संपादक

प्रा. आशिष गाडगे

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Santancha Marathi Sahityavaril Prabhav
संतांचा मराठी साहित्यावरील प्रभाव

संपादकाधीन

प्रकाशक : सौ. तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि. पुणे-४१० ५०२.

मुखपृष्ठ : निखिल लंभाते

प्रकाशन क्रमांक : ३९

प्रथमावृत्ती : २८ जानेवारी २०१९

अक्षरजुळणी : यशोदीप पब्लिकेशन्स्
२१७ ब, नारायण पेठ, पुणे-३०.

मुद्रक : समर्थ प्रोसेस, पुणे

ISBN : 978-93-84309-37-4

मूल्य : रु. २००/-

## अर्पणपत्रिका



यै. मगनशेठ महादु गाडगे
यांच्या पवित्र स्मृतीस

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * संपादकीय | | ५ |
| * मनोगत | | ७ |
| * सूफी संप्रदाय आणि साहित्य | – प्रा. डॉ. विठ्ठल केदारी | ९ |
| * संत कवयित्री | – प्रा. संतोष मारुती शिंदे | १४ |
| * संतांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | – प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ | २० |
| * महानुभाव संप्रदाय आणि मराठी साहित्य | – प्रा.डॉ.बागूल एम.एम. | २६ |
| * मुस्लिम साहित्यातील स्त्री | – शकील जाफरी | ३३ |
| * संत कवयित्री | – प्रा.सौ.मोहिते सुलभा शिवाजीराव | ४४ |
| * संत कवयित्री जनाबाई | – प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग | ५५ |
| * संत आणि सामाजिक सुधारणा | – प्रा.दत्तात्रय सदाशिव सावंत | ६० |
| * संत तुकारामांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा | – प्रा. डॉ. मंगल एकनाथ डोंगरे | ६६ |
| * मराठी संत साहित्यातील विविध विचार | – ज्ञानेश्वर आश्रुबा भोसले | ७५ |
| * मुसलमान मराठी संतकवी | – प्रा. डॉ. दिलीप ज्ञा. भिसे | ८१ |
| * संत कवियत्री | – प्रा. लक्ष्मण धावारे | ८६ |
| * संत | – श्री. वसंत एच. गाडगे | ९० |
| * संत श्रेष्ठ कवयित्री जनाबाई | – श्री. दत्तात्रय तुकाराम आसवले | ९३ |
| * मराठीतील संत कवयत्रिंचे योगदान | – प्रा. गोकुळ शिखरे | ९७ |
| * साहित्यप्रकार : मध्ययुगीन कविता | – प्रा. अश्विनी महाले | १०४ |
| * मध्ययुगीन साहित्याचे स्वरुप | – प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबर | १११ |
| * संत मीरा | – डॉ. शशिकांत साळवे | ११७ |
| * संत ज्ञानेश्वर : भक्तीविचार | – प्रा. विक्रम ओतारी | १२६ |
| * संत तुकाराम : जीवन आणि कार्य | – प्रा. आशिष गाडगे | १३३ |
| * भक्तीची चळवळ | – रमेश भिमराव नारायणकर | १३८ |
| * चोखा चोखट निर्मळ | – प्रा. रूपाली नीलेश अवचरे | १४५ |
| * सूफी संप्रदाय : मराठी साहित्य | – डॉ.अंजली मस्करेन्हस | १५२ |
| * डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संत साहित्य विषयक विचार | – प्रा. संदिप भागु चपटे | १५८ |




# संपादकीय

'संतांचा मराठी साहित्यावरील प्रभाव' हा राज्यस्तरीय चर्चासत्रात सादर केलेल्या अभ्यासपूर्ण शोधनिबंधाचा ग्रंथ आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. ह्या चर्चासत्राच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील आणि महाराष्ट्रातील सर्वच अभ्यासक आणि संशोधकांना संतांचा मराठी साहित्याशी असलेला संबंध लक्षात येणार आहे, म्हणूनच त्या चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

ह्या चर्चासत्राच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर ते निळोबारायापर्यंत सर्वच संतांचा मराठी साहित्यावर काय परिणाम झाला, त्यांची समतेची, शांततेची शिकवण आणि अहिंसेची शिकवण मराठी साहित्यात कशी झिरपत आली हे समजण्यास मदत होणार आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत नामदेव ह्या सर्वच संतांना आपल्या लेखणीने आणि वाणीने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले, त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन अनेक लेखक लिहिते झाले हे न नाकारता येणारे सत्य आहे.

प्रस्तुत ग्रंथ पूर्णत्वास येताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री. पांडुरंग पवार ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याचबरोबर संस्थेचे सर्वच पदाधिकारी आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ह्यांनीही प्रोत्साहन दिले, त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

दिलीप वळसे पाटील महाविद्यालयातील सर्वच कर्मचारी प्राचार्य डॉ.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

संदर्भग्रंथ -
१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर.
२. वारकरी संप्रदाय : उदय व विकास, प्र.ज्ञा. भालेराव.
३. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, ह.श्री. शेणोलीकर.
४. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, गं.बा. सरदार.

संशोधक वि[illegible]
ज्ञानेश्वर आश्रुवा [illegible]
मराठी भाषा व वाङ्मय वि[illegible]
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरं[illegible]
मो. ९७६४११[illegible]



# मुसलमान मराठी संतकवी

मराठी समाज, संस्कृती जोपासण्यासाठी मराठी संतांनी केलेले योगदान अतुलनीय आहे. समाजातील जातीभेद, धर्मभेद, अंधश्रद्धा यांचा नायनाट करून सर्व समाज एकोप्याने आपले कल्याणकारी आयुष्य कसे व्यतीत करेल याचा कायम ध्यास मराठी संतांनी घेतलेला दिसतो. संत ज्ञानेश्वरापासून सुरू झालेली संत परंपरा आजतागायत आपले कार्य करीत आहे. संत बहिणाबाईंनी संत परंपरेचे चित्रण खालीलप्रमाणे केले आहे.

**संत कृपा झाली। इमारत फळा आली ।**
**ज्ञानदेव रचला पाया । त्याने उभारले देवालया ।**
**नामा तयाचा किंकर । त्याने केला विस्तार ।**
**जनार्धनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत।**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।**

यात पुढील काळामध्ये सर्वच जातीधर्मातील संतांनी विठ्ठल भक्ती व सामाजिक ऐक्य, सामाजिक कल्याण करणाऱ्या या संत चळवळीत, परंपरेत सक्रिय सहभाग घेतला. यात काही मुस्लीम संतांनीही महत्त्वाची भूमिका पार पाडली. संत परंपरेचा प्रसार करणारी साहित्य निर्मिती, अभंग निर्मिती करण्यामध्ये या मुस्लीम संतांचा वाटा उल्लेखनीय आहे. जसे की, शेख महंमद, हुसेन अंबरखान, शेख सुलतान, संत अलमखान, शहा मुंतोजी ब्रह्मणी, शहा



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

नवरंग, जंगली फकीर सय्यद हुसेन, शहा हुशेन फकीर, सय्यद महंमद, शेख सली महंमद, रामभक्त लतीफशाह अशा अनेक संतांचा या संत चळवळीमध्ये महत्त्वाचा सहभाग दिसून येतो.

**शेख महंमद :-** 'कबिराचा अवतार' म्हणून मराठी संत मंडळीत शेख महंमदाची ओळख आहे. जन्म मुस्लीम कुटुंबात झालेला असताना त्यांनी हिंदू गुरूकडून परमज्ञान प्राप्त केले. हिंदू-मुस्लीम भेदाच्या पलीकडे जाऊन शुद्ध परमार्थाचा अनुभव त्यांनी घेतला. कबिराप्रामाणेच शेख महंमदाने महाराष्ट्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. ताठर, स्वार्थी माणसाला या भवसागरातून केवळ प्रसिद्धी तारू शकत नाही; तर विनंम्रतेने भक्तीभावात तल्लीन होणे. हे अधिक योग्य अशी शिकवण त्यांनी दिली. म्हणूनच विनंम्रतेचा आदर्श असलेल्या मुसलमान संत शेख महंमदाचा हर्षभराने महाराष्ट्रात उल्लेख केला जातो. शेख महंमदाचे गुरू प्रख्यात हिंदू साधू चांद बोधले हे आहेत. शेख महंमदाने योगसंग्रमात आपल्या गुरूंचा आदरयुक्त खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

**नमो जी श्रीसदगुरू चांद बोधले । त्यांनी जानोपंता अंगीकारिलें**

**।**

**जनोबाने एका उपदेशिलें । दास्यत्वगुणे ।।** (यो.सं.१५.१)

शेख महंमद यांनी मूर्तिभंजन करणाऱ्या मुसलमानांवर आणि मूर्तिभंजनातून उद्ध्वस्त होणाऱ्या दुबळया हिंदूवर वाक्प्रहार करूण त्यांना सत्याचा शोध घेण्यास प्रवृत्त केले. अंधश्रद्धेवर, ढोंगी विचारसरणी, खुळचट धर्मकल्पनांवर प्रखर आघात केले. त्यांनी घेतलेली स्पष्ट भूमिका, हिंदू गुरू, हिंदू धर्मग्रंथ, हिंदू संतांचे चरित्र, त्यांचा प्रभाव व हिंदू संतवाणीचा केलेला स्वीकार यामुळे काही कडवे मुसलमान त्यांना 'काफर' समजत असत. मात्र त्यांनी या गोष्टीचा मनावर प्रभाव करून न घेता आपल्या अंत:करणातील भावना स्पष्टपणे व प्रांजळपणे व्यक्त केल्या. म्हणूनच त्यांना श्रेष्ठ मराठी संतांच्या मांदियाळीत मानाचे स्थान प्राप्त झाले. त्यांनी योगसंग्राम या प्रमुख ग्रंथाशिवाय अनेक लघुग्रंथ व स्फुट कविता निर्माण केल्या. अशा या महान मुसलमान संताची कबर श्रीगोंदे येथे आजही यांच्या महान कार्याची स्मृती सांभाळून



आहे.

**शहा मुंतोजी ब्रह्मणी:-** मराठी संत परंपरेत 'मृत्युंजय' या नावाने शहा मुंतोजी ब्रह्मणी परिचित आहे. मुंतोजींना पंढरपूरमधील भक्तीमय वातावरण, टाळ, मृदंग, विणा यांच्या तालावर गात-नाचत हरिनामाच्या भक्तीत तल्लीन झालेली वारकरी मंडळी दृष्टीस पडली व ते भारावून गेले. त्यांनाही भक्तीची ओढ निर्माण झाली. ही भक्तीमय अवस्था हविहविशी वाटली. परिणामी ते भक्ती परंपरेत समाविष्ट झाले. पुढे त्यांच्या हातात विवेकसिंधुची प्रत पडली. यातील भक्तीची ओढ, गुरू शिष्य परंपरेतील अनोखे नाते अनुभवता आले. या संताने विपुल ग्रंथ रचना केली यामध्ये सिध्दसंकेत प्रबंध, अनुभवसार, अ‍ैतप्रकाश, प्रकाशदीप, स्वरूपसमाधान, अमृतानुभव, जीवोध्दरण पंचीकरण, गुरूलीला व काही पदे, अभांग संत परंपरेला बहाल केली.

**हुसेंन अंबरखान :-** मराठी संत परंपरेत हुसेन अंबरखान यांनी गीतेवर आधारीत मराठी ओवीबद्ध टीका लिहून गीतेविषयी, त्यातील ज्ञान अमृताविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली. या ग्रंथाचा रचनाकाल पुढील ओळीतून स्पष्ट होतो.

**शके पंधारासे पंचेहातरि । विजय नाम संवत्सरिं ।**
**आश्विन शुध्ददशमी सोमवारिं ।**
**अंबरहुसेनी टीका संपूर्ण जाली ।।१८.८६।।**

असा हा मुसलमान साधुसंत समाजातील धार्मिक भेदाभेंदांच्या आग्रहाचा नाश करून अदृैताच्या अधिष्ठानावर ठामपणे उभा असल्याचे दिसून येते.

**शेख सुलतान :-** शेख सुलतान मूळचा तुरेवाला शाहीर म्हणून प्रसिद्ध होता. शृंगारिक लावण्यासोबतच भेदिक रचना करण्यात तो कुशल होता. म्हणून त्याला शाहीर अशी प्रतिष्ठा लाभली. तत्कालीन राज्यकर्ते शाहीरांना आपल्या दरबारी आश्रय देत असत. त्यांच्याकडून अधिकाधिक रचना करून घेत असत. शेख सुलतान देखील शाहु छत्रपतींच्या आश्रयास होता, असे म्हटले जाते. यासोबतच शेख सुलतान कीर्तने करू लागले. आपल्या मधुर वाणीने गुरूंना, श्रोत्यांना मंत्रमुग्ध करू लागले. पुढील काळात यांच्याकडून काही हिंदी रचनाही निर्माण झाल्या व त्या स्वाभाविकच होत्या.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

त्यांच्या मराठी रचनेत काही कथात्म प्रकरणे, काही पदे तर काही आरत्या आहेत. कथात्मक प्रकरणामध्ये सती अनुसया, गणपतीजन्म, हनुमंतजन्म, कोल्हाट्याचे चरित्र आणि शिवरात्रिकथा अशा लोककथांच्या पातळीवरील रचना प्रसिद्ध आहेत.

**शहा मुनी :–** धर्माने मुसलमान असूनही महानुभव संप्रदाय धारण करणाऱ्या शहा मुनी या संताने मराठी जनमानसावर आपल्या चरित्र व प्रभावी वाणीने स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांचा 'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ महाराष्ट्रातील सर्व भक्तीभाविकांना प्रिय असून चातुर्मासात या ग्रंथाचे सामुदायिक वाचन केले जाते. आपण मुसलमान कुळात जन्म घेतला, याची त्यांना खंत वाटते. कारण मुसलमान हे हिंदू परंपरेचे विध्वंसक म्हणूनच भारतात कार्य करीत राहिले, याची त्यांना स्पष्ट जाणीव दिसते.

**नव्हे यातीचा ब्राह्मण । क्षत्रिय वैश्य नोहे जाण ।**
**शूद्रापरीस हीन वर्ण । अविंधवंशी जमलो ।।**
**ऐसे खांणीत जन्मालों । श्रीकृष्णभक्तीसी लागलों ।**
**तुम्हां संतांचे पदरी पडलों । अंगीकारावें उचित ।।** (सि.बो. २.१२९.१३२)

या काही प्रमुख मुसलमान मराठी संतासोबतच शहा नवरंग, जंगली फकीर सय्यद हुसेन, शहा हुशेन फकीर, सय्यद महंमद, शेख सली महंमद, रामभक्त लतीफशाह अशा अनेक संतांचा या संत चळवळीमध्ये महत्त्वाचा सहभाग दिसून येतो. या सर्वांनी समाजातील एकात्मता अधिक दृढ कशी होईल याचा सातत्याने ध्यास घेतलेला दिसून येतो. सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन समता, बंधुता व एकात्मतेची बांधणी अधिक मजबूत कशी होईल, यासाठी प्रांजळ प्रयत्न केले. हिंदू संतांना उत्कट सहयोग दिला. महाराष्ट्राची, भारताची उदार व समन्वयशील सांस्कृतिक परंपरा अधिक समृद्ध कशी होईल, यासाठी महान कार्य केले. म्हणूनच मराठी संतांचा उल्लेख करीत असताना मुसलमान मराठी संतांचाही उल्लेख तेवढ्याच मान-सन्मानाने केला जातो, हे वेगळे सांगावयाची अवश्यकता नाही.



**संदर्भ सूची :**

१. मुसलमान मराठी संतकवी – रा.चिं.ढेरे – पद्मगंधा प्रकाशन, पुणे
२. महाराष्ट्रसारस्वत (आवृत्ती पाचवी) – वि.ल.भावे.
३. ऐतिहासिक संकीर्ण निबंध – खंड ६ वा.

**प्रा. डॉ. दिलीप ज्ञा. भिसे**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
अंबाजोगाई जि. बीड



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 ( II )

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

54. मानवी हक्काचा जागतिक दृष्टीकोन — 148
प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी

55. मानवाधिकार: विकास व अंमलबजावणी — 150
प्रा. रमेश एकनाथ भारुडकर

56. मानवाधिकार आणि महिला — 152
खंडेराव हरिभाऊ काळे

57. मानवी अधिकारासाठी शिक्षण — 154
पवार बापूराव भगवानराव

58. मानवी हक्क : संकल्पना आणि आवश्यकता — 157
प्रा. पवार मनोरमा श्रीधर

59. मानवी हक्काच्या रेषा पुसट करणाऱ्या काही कथा — 159
डॉ. दिलीप ज्ञा. भिसे

60. भारतीय महिलाएँ और मानवाधिकार — 151
प्रा.सोनवणे रार्जेद्र जगन्नाथ , प्रा. पोटकुले हिरा तुकाराम

61. मानवी हक्क आणि भारतीय संविधान — 163
अजय श्रीधर फड

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF)–0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी हक्काच्या रेषा पुसट करणाऱ्या काही कथा

डॉ. दिलीप ग्रा. भिसे
मराठी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

---

माणूस आणि त्याचे जगणे एक न उलगडणारे कोडे आहे. माणूस समाजशील प्राणी असल्यामुळे समाजाशिवाय त्याचे जगणे, वागणे, निभावणे अवघड असते. समाजाचा आधार घेतल्याशिवाय त्यास गत्यंतर नसते. प्रत्येक मनुष्याचा सर्वांगीण विकास, प्रगती ही एक्कल हाती बाब नाही. समाजाची मदत, सहकार्य किंवा त्याच्याशी सहसंबंध प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हा होईना, प्रत्येकास घेणे भाग असते. मी अमुक केलं... तमुक केलं अस केवळ म्हणण्याचा भाग असतो... समाजातील कोणत्याना-कोणत्या घटकाचे पाठबळ लाभल्याशिवाय त्यास पूर्तता नसते... असं सगळ असताना मनुष्य, माणूस, मानव हा मात्र आपल्या सोभवतालच्या विविध प्राकृतिक, सजिव, निर्जीव घटकांशी अनेक वेळा फटकून वागतो, दुराव्याने वागतो. तिरस्कार, घृणा ठेवतो, स्वार्थाने बरबरटलेली मानसिकता घेऊन वागतो. सभोवतालच्या जगण्याचा, त्याच्या आनंदाचा, त्याच्या प्रगतीचा तोही एक आपल्या वाटेवरील सहप्रवासी आहे. त्यांच्या दुःखाच्या, संकटाच्या, संघर्षाच्या पडत्या काळात आपल्या परीने अधिकाधिक, भावनिक, मानसिक, आर्थिक बळ देणं त्याला शक्य असते. मात्र हे दिलं जात नाही, ही खरी खंत असते आणि मग प्रश्न उरतो, उरते दुःख, उरतो जिवघेणा संघर्ष मग जगण्याचीही अनेकदा अनिच्छा वाटू लागते. जगणे ओझे वाटू लागते. अशा वेळी गरज असते, आवश्यकता असते ती मानवी हक्काची, अधिकाराची... जन्मतः मनुष्यास काही अधिकार, हक्क प्राप्त झालेले असतात. काही काळानुरूप, परिस्थितीनुरूप बहाल करावे लागतात... कायद्याच्या चौकटी आखाव्या लागतात... त्याच्या पुर्ततेसाठी भयंकर अशा शिक्षेच्या तरतूदी केल्या जातात... पण तरीही प्रश्न उरतोच तो मानवी हक्काचा...

जगातील कोणतेही साहित्यकृती मानवाने माणसाच्या, सभोवतालच्या कल्याणाचा, त्याच्या सुंदरमय जगण्याच्या उद्देशपुर्तीसाठी साकार केलेली असते. संत ज्ञानेश्वरांचे पसायदान केवळ मानवाचेच नव्हेतर समस्त सृष्टीचे कल्याण मागते. सर्वांच्या ऐक्यासाठी, समतेसाठी, भल्यासाठी दान मागते... काही साहित्यकृती मानवी जीवन, त्यांचे भोवतालची परवड, दुःख, वास्तव सत्यता प्रखरपणे मांडतात... यातूनही अंतिमतः जे काही लिहिले, पाहिले, अनुभवले या सर्वांचा नायनाट होऊन ही सर्व परिस्थिती सुधारून, मानसातील परस्परातील तेढ, अंतर, दुरावा, चीड, लोभ, स्वार्थ, दुराचार, असभ्यता अशा कितीतरी गोष्टी नाहिशा होऊन त्यांच्या ठायी मांगल्य, जिव्हाळा, बंधुता, मानवता, समता, सहकार्य वृत्ती, दातत्व, थोरपण यावे अशी मनोमन अपेक्षा असते... या भूमिकेतून आपण अशा साहित्यकृतींचा विचार करणे, चिंतन करणे गरजेचे असते नव्हेतर अपरिहार्य असते...

या अनुषंगाने बी.ए.च्या द्वितीय भाषा अभ्यासक्रमासाठी काही कथा होत्या. त्या विद्यार्थ्यांपर्यंत अध्यापनाच्या माध्यमातून पोहोचविताना उपरोक्त बाबी वारंवार जाणवत राहिल्या... त्या-त्या वेळी त्या-त्या कथेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना यासर्व गोष्टी, नैतिक, सांस्कृतिक मूल्ये सांगता आली...माणूसपण, माणुसकी, मानवता यागोष्टी कमी अधिक प्रमाणात का होईना जोपर्यंत समाजाच्या प्रत्येक घटकात निर्माण होणार नाहीत तोपर्यंत मानवी हक्कांचे कायदे, लढाया लढाव्याच लागणार आहेत...

अंबादास केदार यांची घचिपाडङ कथा शेतकरी, ग्रामीण परिस्थितीचे वास्तव रेखाटते. प्रचंड कष्टातून, उसनवारी करून कसा-बसा लावलेला ऊस लेकराची काळजी घ्यावी तसा वाढवला, जोपासला जातो माणूसकीचा लवलेश नसलेले कारखानदार, मुकदम, अधिकारी शेतकऱ्यांची गळचेपी करतात. ऊसतोडीसाठी लाच मागतात. अगोदरच कर्जाच्या ओझ्याने हतबल झालेला शेतकरी ही पूर्तता कोठून करणार आणि त्यांनी तो का करावी? परिणाम ऊसाचा बहार संपत जातो. तो शुष्क होऊ लागतो, वाळून जातो, परिस्थितीने बेहाल झालेला वेडापीसा झालेला श्रीपती ऊसाला काडी लावून गावाकडं माघारी फिरतो.

घमिरगीपेरङ हे विजय जावळे यांची कथा ही शेतकऱ्यांच्या हतबल मानसिकतेचे चित्रण करते... वाचनाऱ्या प्रत्येकाच्या मनाला चटका लावून जाते. पैश्याची जुळवाजुळव करून बी-बियाणे, खतपाणी आणायचे असा बेत आखणारा महादु आईच्या आजारपणाला, तिच्या अंत्यसंस्काराला सर्व पैसा खर्च करून आपले कर्तव्य पार पाडतो... मात्र रितिरिवाजाप्रमाणे आईची दशक्रिया विधी पैश्या अभावी करू शकत नाही. या दुःखातून सावरत आपल्या लावलेल्या पेरणीच्या वेळी तो आईच्या आस्थी व राख धान्यासोबत मिसळून कायमस्वरूपी आईच्या स्मृती आपल्या सोबत राखून ठेवतो... चआता तो आम्हाला कवाच सोडणार न्हाई दोघी घकाळीमायङ अनं घइंद्रामायङ एकजीव झाल्या असल्या विचारात म्हादू गुंगला होता. दोन दिवसात आपली घमिरगीपेरङ कधी आटोपली ते भी कळलं न्हाई.छ[1]

एकनाथ खिल्लारे यांची घगायरानङ कथा ही प्रचंड कष्ट करून सोन्यासारख्या पिकलेल्या पिकाला गावातील जातीय राजकारणातून उद्ध्वस्त होताना डोळ्यादेखत पाहण्याशिवाय पर्याय उरत नाही. या अनैतीक प्रवृत्तीचा प्रत्यय ही कथा घडवते. पैश्याच्या व ताकतीच्या जोरावर अन्यायग्रस्तांवरच खोटे आरोप घेऊन त्यांना शरण येण्यास भाग पाडले जाते.

उमेश मोहिते यांच्या घभूकङ कथेचा शेवट प्रत्यक वाचकाच्या डोळ्याची कडा ओलावल्याशिवाय राहत नाही. पैशासाठी दहा दिवसाची बाळंतीन लेकरासह विटभट्टीवर कामाला येते. पेटलेल्या भट्ट्यांची आग, वरून सूर्यदेवाची आग अन् पोटाची आग... यातून जगण्याचा स्फोट होणार नाही तर नवल काय? शेवटी तापाने फणफणलेल्या त्या कोवळ्या जिवाला परस्थितीमूळे या सुंदर अन तेवढ्याच कठोर जगाचा निरोप घेणे नशिबी येते... चत्याच लहान बाळ शिवाच्या खिश्यातल्या नोटेप्रमाणे पांघरूनात निपचित पडलं होतं. त्याच्या डोक्यावरचं टोपलं सांडल्यामूळे सारं अन्न खाली सांडलं होतं नि त्यावर मग त्याच्यामागे आलेली बांडी आळ्या पडल्याली कुत्री तुटून पडली होती...छ[2]

घकेशीङ ही एक अशीच मनाला चटका लावणारी कथा. भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री ही भोग देणारी व शोषणयुक्त वस्तु समजली जाते. अशाच समाजाने वेडी ठरविलेल्या केशीची व्यथा सदर कथेत ज्ञा.रा.पंडित यांनी चित्रित केली आहे. केशी ज्या गल्लीत राहात असते. त्यांच्याकडून संकटाच्या काळी सहकार्याची अपेक्षा रास्त आहे. मात्र असे न घडता केशीला आईच्या माघारी एकाकी आयुष्य जगावे लागते. शेजाऱ्यापाजाऱ्याकडून ती वेडी ठरविली जाते. शाळेतील पोरं तिला दगडे मारतात. गल्लीतील थोर टवाळ पोरं तिच्या तारुण्याविषयी आसक्ती ठेवून वागतात. बालपणीच्या तिच्या मैत्रीणी

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

तिच्याशी दुरावा ठेवतात. गल्लीतल्या शहाण्या स्त्रिया तिच दुःख समजून न घेता तिच्या चारित्र्यावर संशय घेतात व शेवटी तर तिची झोपडी पेटवून देतात. या पेटत्या झोपडीत केशी स्वतःला झोकून देते व झोपडीसोबत स्वतःही जळून जाते. अशी मानवी जीवनाची विदारकता या कथेतून येताना दिसते. थोडक्यात या सर्व कथांचा, त्यातून आलेल्या विविध वाईट प्रवृत्तींचा विचार करता जाणवते की, माणसाने एका बाजूला केलेली प्रगती, शिक्षणाचा तळागळात झालेला प्रसार, प्राचीन काळापासून संतांच्या, थोरपुरूषांच्या विचारसरणीची पाश्र्वभूमी अशा कितीतरी मानव निर्माण करणाऱ्या, माणुसकी जपणाऱ्या, मानवतेचा प्रसार करणाऱ्या गोष्टी घडून ही मानवी हक्कासाठी, मानवतेच्या निर्मितीसाठी या जगाच्या सुंदरतेसाठी प्रयत्न करावे लागतात. यापुढे ही असे प्रयत्न निरंतर करावे लागतील, यात शंका नाही.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. साहित्यधारा - संपादन मराठी अभ्यास मंडळ, डॉ.वा.आं.म.वि., औरंगाबाद.
2. कथात्म साहित्य - संपादन मराठी अभ्यास मंडळ, डॉ.वा.आं.म.वि., औरंगाबाद.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner



Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV
Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मराठवाड्याची प्रतिनिधिक कविता : काळ्या आईच्या कुशीत<br>**डॉ. दिलीप भिसे** | ६०-६५ |
| १५ | मिलिंद कांबळे यांच्या 'भेटलं मांग फिटलं पांग' या कादंबरीतील एक समिक्षण<br>**डॉ. दिलीप सावंत** | ६६-६९ |
| १६ | अस्तित्ववादी समीक्षा : विशेष संदर्भ श्याम मनोहर यांची 'हे ईश्वरराव... हे पुरुषोत्तमराव' कादंबरी<br>**प्रा. डॉ. ललित अधाने** | ७०-७५ |
| १७ | नैतिकता-मूल्यनिष्ठ समीक्षा विचार (डॉ. किशोर सानप यांचे समीक्षा लेखन)<br>**प्रा. डॉ. राजेंद्र मुंढे** | ७६-८० |
| १८ | दलित साहित्य समीक्षा<br>**डॉ. शामराव शेंडगे** | ८१-८५ |
| १९ | आंबेडकरवादी समीक्षा : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. युवराज श्रीराम मानकर** | ८६-९७ |
| २० | सदानंद देशमुख यांच्या 'तहान' आणि 'बारोमास' च्या निमित्ताने<br>**प्रा. डॉ. अरविंद भ. कटरे** | ९८-११० |
| २१ | कथेची आस्वादक समीक्षा<br>**डॉ. उगले अनिल भिकाजी** | १११-११५ |
| २२ | मराठी आदिवासी साहित्य समीक्षा : एक  आकलन<br>**प्रा. अनिता कांबळे** | ११६-१२३ |
| २३ | नटसम्राट : माध्यमांतराचा यशस्वी प्रवास:..!<br>**डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे** | १२४-१२९ |
| २४ | स्त्रीवादी साहित्य समिक्षा विषयी माहिती<br>**प्रा. डॉ. गिन्हे डी. पी.** | १३०-१३२ |
| २५ | ग्रामीण साहित्य समीक्षा<br>**डॉ. गोवर्धन मुळक** | १३३-१४१ |
| २६ | आदिबंधात्मक व लोकतत्त्वीय समीक्षा<br>**डॉ. भाऊसाहेब राठोड** | १४२-१४५ |






## CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरुप<br>**प्रा. डॉ. अपर्णा अ. पाटील** | १४६-१४९ |
| २८ | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षेची मूलतत्त्वे<br>**गणेश रं. राठोड** | १५०-१५३ |
| २९ | मराठी ग्रामीण साहित्य समीक्षेची सद्य:स्थिती (संदर्भ-कथा व कादंबरी)<br>**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंवाले** | १५४-१५८ |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# १४. मराठवाड्याची प्रतिनिधिक कविता : काळ्या आईच्या कुशीत

डॉ. दिलीप भिसे
मराठी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड.

१९२० च्या पूर्वी ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा दिसून येत असल्या तरी साधारणतः १९२० च्या नंतर जानपद काव्याच्या रूपातून ग्रामीण कवितेचा प्रारंभ झाला, असे ढोबळपणे म्हटले जाते. यात प्रामुख्याने ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, गिरीश, यशवंत अशा कवी मंडळींनी ग्रामीण जीवनाचा अनुभव कवितेतून प्रकट केला. नंतर मात्र मराठी ग्रामीण कवितेचा प्रवाह काही काळ मंदावला. पुढे १९६० नंतर ग्रामीण कविता समर्थपणे अवतरली. १९७७ आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीचा परिणाम ग्रामीण कवितेवर मोठ्या प्रमाणात झाला. या कवितेने स्वतःचे अस्तित्व शोधले. कारण यातील बहुतेक कवी ग्रामीण भागातून जन्मास आलेली, वाढलेली, शिकलेली होती व आहेत असे निदर्शनास येते. आपले जीवनानुभव ही कवी मंडळी आपल्या, स्वतःच्या ग्रामीण ढंगाच्या बोलीभाषेतून प्रकट करू लागली. यात प्रामुख्याने आनंद यादव, सोपान हाळमकर, विठ्ठल वाघ, प्रकाश होळकर, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, राजन गवस, सदानंद देशमुख, शंकर वाडेवाले, भास्कर बडे, फ. म. शहाजिंदे, मोहन पाटील, उत्तम कोळगावकर, नारायण सुमंत या कवींनी ग्रामीण कवितेला समृद्ध केले तसेच नवे वळण देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. या कवींनी अस्सल ग्रामीण जीवनानुभव चित्रित केले. त्यांच्या अभिव्यक्तीसाठी ग्रामीण बोलीचा समर्थ वापर केला. पुढील काळात या पध्दतीची ग्रामीण कविता लिहिणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढत गेली. लहानसहान, गाव-तालुका स्तरावर अनेक लेखक कवी उदयास आले. ग्रामीण संवेदनशिलता जपणारी कविता, ग्रामीण साहित्य लिहू लागले. या यादीत बीड जिल्हा, अंबाजोगाई तालुक्यातील विद्याधर पांडे एक ग्रामीण कवी, साहित्यिक म्हणून परिसरात, साहित्य वर्तुळात सर्व परिचित आहेत. विद्याधर पांडे यांनी 'आपत्तीचा पाऊस आणि 'काळया आईच्या कुशीत हे अस्सल ग्रामीण जाणिवांचा अनुभव देणारे कविता संग्रह प्रकाशित केले आहे तसेच 'मांजराकाठ व 'मराठी हिंदुराव नायक या ग्रामीण माणूस, ग्रामीण परिस्थिती, ग्रामीण राजकारण, ग्रामीण सुख-दुःख या विषयांवर गांभीर्याने भाष्य करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तर 'एक क्षण नात्यांचा ही मानवी नाते संबंधावर प्रकाश टाकणारी त्यांची एकांकिका लक्षवेधक आहे.

"काळ्या आईच्या कुशीतील वैचारिक शब्दधन सर्वश्रेष्ठ आहे."[१] अशी शाबासकी प्रा. गौतम गायकवाड यांनी दिली आहे. तर आपल्या कवितेचे स्वरूप सांगताना विद्याधर पांडे यांनी म्हटले आहे की, "माझी लेखणी केवळ शेतीला आणि ग्रामीण जीवनाला वाहिलेली आहे."[२] त्यांच्या कवितेचे स्वरूप पाहता हे म्हणणे तंतोतंत खरे वाटते. आपल्या कवितेच्या प्रेरणा सांगताना त्यांनी म्हटले आहे की, "माझ्या या कविता का निपजल्या? हा प्रश्न कोणाला पडावयाचे काही कारण नाही. कारण शेतीची दुरावस्ता दैनंदिन चर्चेचा विषय होऊन बसली आहे. त्यावर उपाययोजना होत नाहीत. शेतीची व शेतीवर उपजीविका असणाऱ्यांची कुचेष्टा सुरू आहे. कारण शेतकऱ्यांचा असंघटीतपणा, त्याचे पडीक मन, विचारात बांध, कृतीत स्वार्थ, निसर्गाचा





दुष्टावा, व्यसनांचा व्यासंग, सत्संगाचा अभाव, साहित्याचा आकस, वर्तनात कस ना निकस, वाचन दुर्भिक्षक, पुस्तकांशी फारकत वगैरे वगैरे."[३]

पांडे यांनी ग्रामीण माणसांच्या, शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचं मांडलेले चिंतन वास्तव आहे. त्यामुळे त्यांनी उपरोक्त उल्लेख केलेल्या चिंतनात्मक बाबी त्यांच्या कवितेचा विषय होतात.

रोजचीच हार-जीत, सांगण्या विठू दरबारी,
काळ्या आईचा कष्टकरी, बाप चालला पंढरपूरी (बाप चालला पंढरपुरी पृ.२)

किंवा

अहो विठ्ठला, छातीच आणि पोटाचं कधी कराल सपाटीकरण,
घामानं सारखं भरतय, बेंबीच वळण. (चंद्रभागेला इकडेच पाठवा पृ.१४)

संपूर्ण महाराष्ट्रातून विठ्ठलाच्या निस्सिम भक्तीपोटी भक्त म्हणून येणारा वारकरी पंढरपुरास पायी वारी करत असतो. ऊन-पावसाची तमा न भागवता तहान-भुकेचा विसर पडल्यासम तो पांडुरंग-पांडुरंग नाद करत. टाळ मृदुंगाच्या तालावर नाचत बागडत विठ्ठलाच्या चरणी लीन होण्यासाठी वारीत सामिल होतो. यामध्ये सर्व जातीधर्मातील, उद्योग व्यवसायातील वारकरी असतात. परंतु तरीही यातील बहुसंख्य वारकरी हे शेती व्यवसायातील असतात हे नाकारता येत नाही. आपल्या सुख-दुःखाचा, हार-जीत ठरवणारा खरा तारणहार, सूत्रधार पंढरीचा विठ्ठल आहे, ही त्यांची ठाम श्रध्दा आहे. तोच आपले प्रश्न सोडवील, ही आशा त्याला असल्या कारणाने तो आपले म्हणणे, गाऱ्हाणे ऐकवण्यासाठी विठूच्या दरबारी जातो, असे निरिक्षण कवी विद्याधर पांडे यांनी आपल्या कवितेतून नोंदविले आहे.

रोजचीच हार-जीत, सांगण्या विठू दरबारी,
काळ्या आईचा कष्टकरी, बाप चालला पंढरपूरी (बाप चालला पंढरपुरी पृ.२)

किंवा

अहो विठ्ठला, छातीच आणि पोटाचं कधी कराल सपाटीकरण,
घामानं सारखं भरतय, बेंबीच वळण. (चंद्रभागेला इकडेच पाठवा पृ.१४)

तर काही वेळा वारी न करण्यामागील वारकऱ्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात

"पडेना पाऊस ठरल्या वारी। पेरणी लांबते चुकते वारी।

यातून मार्ग काढण्यासाठी नदी जोड प्रकल्प राबविणे ही काळाची गरज आहे. यात केवळ शेतकऱ्याचं हित नाही तर सर्व समाज, घटक, उद्योग व्यवसाय यासाठी ही कृती आवश्यक आहे. काही ठिकाणी प्रादेशिक असमतोल हे कारण असलेही मात्र काही नद्यांचा अपवाद वगळता अन्य नद्यांचे एकत्रिकरण, जोडणीकरण होऊ शकते, हे ही वास्तव नाकारता येत नाही. या संदर्भात शासनाला मागणी करून थकलेला शेतकरी पांडुरंगासमोर आपला प्रस्ताव ठेवतो.

हात थेंब कृष्णेचा। खोऱ्यात आडवा ।।



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मांजरेच्या भेटीसाठी । चंद्रभागेला पाठवा।। (चंद्रभागेलाच इकडे पाठवा पृ.)

शेतकऱ्यासाठी जन्मदात्री आई अन् जगण्याचा मुख्य आधार असलेली काळी आई या विषयी समान भाव, आदर, आपलेपणा असतो. लेकराचं यश, लेकरानं केलेल्या कष्टाचं दोन्ही मातांना खूप कौतुक असते. याविषयीचा अत्यंत वेधक भाव कवीने पुढील कवितेतून ठेवला आहे. भुईच्या, काळ्या आईच्या रक्षणासाठी आपल्या सोबतच खंबीरपणे ही झाडे-झुडपे कार्यरत असतात असा त्यांच्या प्रतीचा कृतज्ञता भाव कवी या निमित्ताने व्यक्त करतो, आणि त्याच वेळी वृक्षवली आम्हा सोयरे वनचरे। पक्षी हे सुस्वरे आळविते या संत तुकारामाच्या अभंगाची आठवण जागृत होते.

भूईच्या राखणीला उभं, झाडा झुडपाचं कुंपन।

कष्टकऱ्यांच्या पायाचे, आई घेते रातदिन चुंबन।। (काळ्या आईच्या कुशीत पृ क्र.४)

'काळ्या आईची हाक'ही कविता कवीच्या उदार मनातून आलेल्या मोठेपणाची साक्ष वाटते. केवळ स्वतः पुरते मागणे न मागता पशु-पक्षी, वृक्ष-वेली, कष्टकरी-शेतकरी, नदी-नाले यांच्या अस्तित्वाची दोर आपल्या हाती असणाऱ्या पावसाला कवी म्हणतो, हे पावसा या सर्व गोष्टींचे जिवंतपण तुझ्या हाती आहे, तुझ्या येण्याने या सर्वांचे अस्तित्व अबाधित रहाणार आहे. यासाठी तुला येणे भाग आहे. अशी आर्त हाक काळी आई पावसाला देते.

नदी नाले अजून कोरडे। कुठे झुकले तुझे पारडे।

कोमजले बघ रसाळ वृक्ष। मी नाही गुन्हेगार तू रूक्ष।।

किलबीलतो पाखरांचा थवा। पशुधनाचा संपतोय ठेवा।।

थेबांचा वर्षाव सदा रहावा। विनऱ्या धागा कष्टकरी हवा।।

तु भोंगळा मिटलेस लोचन। माझे जगणे झाले दुषण।। (काळ्या आईची हाक पृ ०७)

कोरडा दुष्काळ व नापीकी यासंदर्भात कवी आपले दुःख अनेक कवितेतून मांडतो. पाऊस न पडल्यामुळे वाटी येणाऱ्या भीषण परिस्थितीचा व शेतकऱ्याच्या जगण्याचा जीवघेणा खेळ कसा रंगतो याचे भावपूर्ण चित्रण शेतकऱ्यांचा पारंपरिक खेळ या कवितेतून रेखाटले आहे.

आभाळाकडे लागले डोळे। तिफणीला बैल सरू लागला।।

काळ्या मातीत तारूण्याचा ऱ्हास। लक्तरांच चऱ्हाट वळू लागला।।

पाचवीला पुजलेला घोर दुष्काळ। रातदिन काळजाला झळू लागला।।

पिढ्यानं पिढ्या एकच खेळ। शेतकरी खेळू लागला।।

मावळतीकडे दीनदुबळा। हळूहळू ढळू लागला।। (शेतकऱ्यांचा पारंपरिक खेळ पृ ०८)

जेंव्हा पाऊसपाणी चांगले होतं, पिकपाणी भरभरून येते तेंव्हा सुखाने आनंदवून जाणारा कवी आपणाला दिसतो. चैतन्यमय, गुजगोष्टी करू पाहणाऱ्या शिवाराचं वर्णन कवी 'माझी तूर' कवितेतून करताना दिसतो.

बघता बघता पाणे फुटली। हिरवा झगा ल्याली चतूर।।





सखी ग वाऱ्यासंगे खेळू लागली तूर।

डोईवरती पिवळा तुरा। फुल पाखरांचे वाढले भ्रमण।।

जिव होतो चुर चुर। सखी ग।

आनंदाने बागडू लागली तूर।। (माझी तूर पृ ९)

शेतकऱ्यांच्या अवस्थेला निसर्ग जेवढा जबाबदार आहे. कदाचित त्यापेक्षाही अधिक जबाबदार घटक म्हणून कवी शासनाकडे बोट करतो. शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, प्रचंड भ्रष्टाचार, ठोस उपाय योजनांचा अभाव, पोकळ धोरणे, या कचाट्यात सापडलेल्या शेतकऱ्याची प्रचंड दाणादाण उडते. सभासमारंभातून आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत, आपला देश कृषीप्रधान आहे. असे केवळ शाब्दिक बोळवण करून स्वतःची व पक्षाची खुर्ची कशी कायम राहील याचीच या राजकर्त्यांना चिंता असते. परिणामी यातून शेतकऱ्यांची कशी दुरावस्था होते, हे कवी धीटपणे कवितेतून मांडतो.

खुर्चीवर तेवढं साऱ्यांच ध्यान। कावळे खातत लाखाचं अनुदान।।

शेतकऱ्यांची उडाली दानादान। तरी आमचा भारत देश कृषीप्रधान।। (दाणादाण पृ १०)

शेतकऱ्यांच्या दुःखाची नेमकेपणाने व अल्पक्षरात मांडणी करणा-या 'अवघड व निराशा' या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अल्पभूधारक, पडीक शेती, नापीक शेती, खडकाळ शेती यातून संसाराचे निभावणे, या निष्ठूर स्वार्थी समाज व्यवस्थेत तग धरून जगणे किती अवघड आहे हे चित्रण खालीप्रमाणे येते.

पडकातील झाडयांच्या फांदीवर लटकाताहेत।

गळफासासाठी कासरे।। (अवघड, पृष्ठ ३०)

किंवा

न आभाळाचं गाण, न आभाळाचं गळण, ऊनं ऊनं झाल कुणब्याच जगणं (निराशा पृष्ठ. ७३)

'ओझे' कविता हाच दुःखाच धागा, सरकारी भ्रष्ट व्यवस्थेचा कारभार, ओढातानातून आलेला मानसिक संताप, महागलेलं शिक्षण, आरोग्य सुविधा, लेकीच्या लग्नाचं ओझं पेलण्याची ताकत नसल्यामूळे न्याय मागण्यासाठी देवादारी जातो असे शेतकऱ्याचे, आत्महत्येचे चित्रण या कवितेत आलेले आहे. 'जोगवा' कविता दुष्काळाची विदारकता उभी करताना आभाळाकडे पावसाचा जोगवा मागते.

मुक्त छंदातील कविता अधिक प्रभावीपणे पांडे यांनी लिहिली आहे. उदा. 'स्वप्नातील कोत्याळ' यामध्ये स्वतःच्या आत्महत्येचे पडलेले भीषण स्वप्न येते. 'आवर्षण' या कवितेत कमी अधिक होणारे पर्जन्यमान/पाऊसकाळ, भुतकाळातील अखंड पडणाऱ्या पावसाच्या आठवणी या कवितेतून जागृत होतात. 'सद्गुणी माणसं' या कवितेतून अशी माणसे समाजाची मोठी संपत्ती असतात. त्यांच्या सदाचार, सद्भावातून चार चांगल्या गोष्टी संपन्न होतात. त्यांच्या हातून समाजाचा विकास होतो. ही माणसे स्वतःपेक्षा इतरांच्या कल्याणासाठी झटत असतात. हा आशय व्यक्त झाला आहे. 'भाग्यविधाता' ही कविता शेतकरी



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

बापाला धीर देण्याच्या हेतूने प्रेरीत करणारी कविता म्हणून महत्वपूर्ण आहे. तर 'बाप' या कवितेमधून कवी आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी स्वतः मात्र हसत-हसत सरणावर जाणारा बाप रेखाटताना दिसतो. 'परितर्वन' ही कविता मानवी संबंध, नात्यागोत्यातील ठिसुळता, तुटलेपण सांधणारी कविता म्हणून अर्थपूर्ण आहे. यासोबतच जोतीराव, सावित्रीबाई, भिमराव, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा जागृत करणारी कविता म्हणून आठवणीत राहते. नियोजन ही कविता विठ्ठल, पांडुरंगाच्या संदर्भात भाव व्यक्त करते.

विठू नामाचा गजर। पेरता तिफणी वाटे।।
मातीतून उठतील। लक्षलक्ष दाण्यांचे ताटे।। (नियोजन पृष्ठ. ३७)

'टागोर आणि पाऊस' ही काव्यसंग्रहातील एक दीर्घ कविता. टागोरांचे साहित्य, त्यातील पात्र व त्यातील तत्वज्ञान व दुसऱ्या बाजुला शेतकरी, शेती, पाऊस, दुष्काळ, ईश्वर यांचा समन्वय जोडण्याचा सुंदर व अर्थपूर्ण प्रयत्न कवितेत केला आहे. यातून कवी म्हणून विद्याधर पांडे यांच्या मनातील टागोरांबद्दल, त्यांच्या अलौकिक प्रतिभा सामर्थ्यांबद्दल असलेला आदरभाव व्यक्त होतो.

'प्रिय पावसा' ही एक अतिशय महत्वाची दीर्घ कविता, उपहास, उपरोध, खंत, राग, चीड अशा भावानुभावातून ही व्यक्त होते.

आम्ही बॉम्बस्फोट, दंगलीत नाहीत का
माणसं मारली? स्वहस्ते
तुझ्या महापुराने किती मेली असती? थोडी
आमची पोळी भाजली असती का?
अवर्षणात तर मजाच मजा
पैशाचा पाऊस... (प्रिय पावसा, पृष्ठ ४६)

यमकांची नैसर्गिक मांडणी किंवा कवितेची अंतर्गत लय सहजगत्या निर्माण झाली की कोणतीही कविता वाचक मनाचा ठाव घेते. प्रस्तुत आशय-विषय समर्थपणे मांडण्यात यशस्वी होते. स्वभाविकपणे ती कविता एक आशयघन व तालबध्द कविता ओळखली जाते. परंतु ही संधी कवी विद्याधर पांडे काही कवितेतून गमावताना दिसतात. उदा. वणवा, हालोऽऽ, हालोऽऽ. या संदर्भात जरासं लक्ष दिले तसेच पुनर्वाचनातून कवितेला साकार केले तर ही कविता अधिक सक्षम अन प्रभावी कविता म्हणून नावारूपाला येईल यात शंका नाही.

कवी विद्याधर पांडे यांच्या ठायी कवितेसाठी आवश्यक असणारी संवेदनशिलता, सभोवतालची व्यापकता, कवितेसाठी आवश्यक असणारी शब्दकळा, जाणिवांची परिपक्वता, निरिक्षणक्षमता व मांडणी कौशल्य या बाबी आहेतच. परिणामी या सर्वांचा अचूक व एकजीव मेळ साधत त्यांनी आपली आगामी कविता निर्माण करावी... निश्चितपणे त्यांच्यातील सशक्त





कादंबरीकाराप्रमाणे त्यांची कविता ही मराठी ग्रामीण कवितेच्या परंपरेत आपले स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करेल अशी आशा वाटते.

### संदर्भग्रंथ सूची

१. मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास - कैलास सार्वेकर, मेहता पब्लिकेशन पुणे.
२. मराठी कविता : आकलन आणि आस्वाद - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
३. इंद्रजित भालेराव यांची कविता - प्रा. मारोती घुगे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४. काळ्या आईच्या कुशीत - विद्याधर पांडे, लक्ष्मी प्रकाशन, औरंगाबाद.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**Sponsored By**
**National Commission for Women, New Delhi**
**and**
**Organised By**
**M.S.P. Madal's Yeshwantrao Chavan College, Ambejogai**

**One Day National Level Seminar**
**on**

# Government Schemes and women Issues Related to Water, Sanitation and Hygiene

26 March 2019 Special Issue - 168

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

Dr. Ahilya B. Barure
Assistant Prof. Dept. of English
Yashwantrao Chavan College, Ambajogai Dist. Beed

Co-Editor
Associate Prof. K.D. Gade
Dr. Arvind A Ghodke

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

19. Domestic Violence and Rights of Women- An analytical study 69
**Sonwalkar Ramesh Shankarrao**
20. Women Health and Hygiene in India: A Literature Review 72
**Dr.Channaveer R.M. 'Bhagyashree S.Vadageri**
21. Womens Role In Sanitation 78
**Harsha Rana**
22. Role Of Women In Addressing Issues Related To Sanitation And Water 81
**Dr. Ahilya Bharatrao Barure**
23. शुध्द पाणी व स्वच्छ गांव मोहिमेत ग्रामीण महिलांचा सहभाग 84
**प्राचार्या, डॉ.वनमाला गुंडरे**
24. महिला सबलीकरणामध्ये शासनाची भूमिका 86
**प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंत जाधव, प्रा.डॉ.डी.डी. भिसे**
25. स्वच्छतागृह सुविधा : एक अभ्यास (विशेष संदर्भ सिरसाळा) 89
**प्रा. माने उषा यशवंतराव**
26. महिला आरोग्य समस्या आणि उपाय एक अभ्यास 93
**प्रा.ए.बी.वाळके**
27. स्त्रिया आणि शाश्वत विकास 96
**प्रा.डॉ. शैलजा भारतराव बरुरे**
28. धनगर समाजाची ओळख आणि विकासात्मक प्रश्न 100
**विलास गोपीनाथ पारखे**
29. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारातील स्त्रि पुरुष समानता आणि महिलांचा सातत्यपूर्ण विकास : एक अभ्यास 103
**प्रा. हिरामन पुजदेकर**
30. पाणी आणि मानव 105
**डॉ. सविता वावगे**
31. महिला आणि शाश्वत विकास 107
**डॉ. संतोष बाबुराव कुन्हे**
32. जल व्यवस्थापनात महिलांची भूमिका 110
**प्रा. राजाभाऊ बंकटराव भगत**
33. महिला आणि पाणी 112
**डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे)**
34. महाराष्ट्रातील अंबाजोगाई तालुक्यातील सोपडपट्टीत स्वच्छता क्षेत्रात महिलांच्या भुमिकेतील सर्वेक्षणांचा आढावा 114
**प्रा.इंद्रजीत.आर.भगत, कु. कदम मोनिका मधुकर**
35. पाणी, आरोग्य व स्वच्छते विषयी ग्रामीण महिलांची भूमिका 117
**डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके**



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN-2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 | March 2019 | UGC Approved No. 40705

# महिला सबलीकरणामध्ये शासनाची भूमिका

प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंत जाधव
लोकप्रशासन विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

प्रा.डॉ.डी.डी. भिसे
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

**प्रस्तावना :**

समाजाचे स्त्री आणि पुरूष हे दोन अभिन्न अंग आहेत. समाजाच्या अस्तित्वासाठी या दोन्ही घटकांची समान आवश्यकता आहे. यापैकी पुरूष घटक महत्वाचा आणि स्त्री ही गौण आहे असे म्हणता येत नाही. भारतीय संस्कृतीमध्ये प्राचिन काळात स्त्रीयांना पूजनीय स्थान होते. स्त्रीचा अर्थ स्पष्ट करताना विद्वान रमन म्हणतात की, च्पतीसाठी चरित्र, मुलांसाठी ममत्व, समाजासाठी शील आणि जीवन मात्रांसाठी करूणा करणारी महाकृती म्हणजे स्त्री होय.छ स्त्री शिवाय मानवी जीवनाची कल्पनाच करता येत नाही. मध्ययुगीन काळापासून जन्मदात्री असलेल्या स्त्रीचे महत्त्व कमी-कमी होत गेले. आधुनिक काळात, स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कर्तुत्व गाजवीत असली तरी ती आज पुरूष - प्रधान मानसिकतेचा बळी ठरत आहे. भारतामध्ये करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार असे दिसून आले की, दर 28 मिनिटाला एक स्त्री लैंगिक शोषण, दर 43 मिनिटाला एक स्त्री अपहरण आणि दर 54 मिनिटाला एक स्त्री बलात्काराचा बळी पडत असते. अपहरण, लैंगिक शोषन, कुपोषण, अनारोग्य, किमान साक्षरता, कमी मजुरी, बलात्कार, कौटौंबिक हिंसाचार, स्त्रीहत्या, स्त्रीयांचे शोषण इत्यादी विविध समस्यांमध्ये स्त्री गुरफटलेली दिसून येते. पुरूष-प्रधान मानसिकतेच्या चक्रव्युहातून स्त्रीला बाहेर काढून तिच्या मानवी हक्काचे रक्षण करून सर्वांगीन विकासाची गरज आहे. समाजामध्ये सामाजिक न्यायाची स्थापना करण्यासाठी महिलांना सशक्त करणे आवश्यक आहे.

**महिला सबलीकरणाची संकल्पना :**

महिलांना समाजामध्ये त्यांच्या वास्तविक अधिकारांना प्राप्त करण्यासाठी सक्षम बनविणे म्हणजे महिला सबलीकरण होय. स्त्रीला शक्तीशाली बनविणे की, ज्यामुळे ती आपल्या जिवनाशी संबंधीत निर्णय स्वत: घेऊ शकेल आणि समाजामध्ये चांगल्या प्रकारे जीवन जगु शकेल. स्त्रीयांना भौतिक किंवा आध्यात्मिक, शारीरिक किंवा मानसिक, तसेच आर्थिक, राजकीय आणि समजिक क्षेत्रामये सशक्त बनविण्यासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे घ्महिला सबलीकरणङ होय. स्त्रियांच्या दृष्टीने समानता, समता न्याय असलेला समाज निर्माण करणे म्हणजे खन्या अर्थाने स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करणे होय. भारतीय संदर्भात असे म्हणता येईल की, आर्थिक सामाजिक दृष्या केल्या जाणाऱ्या सुधारणांमधून स्त्री-पुरूषांमध्ये व्यक्ती, समाज, समूह व जातजमात म्हणून स्त्रियांच्या दृष्टीने परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे. समाजातील स्त्रीयांना आपल्या जीवनामध्ये सर्व क्षेत्रांत आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असा समाज निर्माण करणे म्हणजे घ्महिला सबलीकरणङ होय. महिला सबलीकरणातील महत्वाची बाब म्हणजे स्त्रीला माणूस म्हणुन जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्व विकसीत करण्यास समाजातून प्रोत्साहन दिले गेले पाहिजे तसेच प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांना प्ररूषांप्रमाणे समान संधी दिली पाहिजे. ज्या समाजामध्ये स्त्रीचे स्थान सन्मानाचे असते तो समाज प्रगतिशील आणि विकसीत असतो. कुटुंब आणि समाजाच्या निर्मीतीमध्ये स्त्रीचे स्थान महत्वपूर्ण असते. ज्यावेळी समाज सशक्त आणि विकसीत होतो त्यावेळी देश सुध्दा मजबूत होत असतो. अशाप्रकारे राष्ट्राच्या निर्मितीमध्येही स्त्री महत्वाची भूमिका बजावीत असते. यामुळेच महिलाचे सबलीकरण करणे हे राष्ट्रविकासासाठीची प्रमुख अट आहे.

**महिला सबलीकरणामध्ये शासनाची भुमिका :**

राष्ट्रविकासासाठी महिलांची सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती घडवून आणने गरजेचे आहे. यामध्ये शासनाची भूमिका महत्वाची आहे. स्त्री सक्षमीकरणासाठी शासनाने धारेणे, योजना आणि कार्यक्रम आखून त्यांची प्रभावीपणे अंमल बजावणी करणे गरजेचे आहे. स्त्रीयांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय सबलीकरण करण्यासाठी भारतीय शासनाने पुढील प्रयत्न केलेले आहेत.

**1. संविधानात्मक तरतुदी :-**

भारतीय समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यासाठी राज्यघटनेमध्ये प्रभावी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम 14 मध्ये कायद्यांसमोर समानता आणि कायद्यापासून सर्वांना समान संरक्षण मिळेल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. राज्यघटनेच्या कलम 15 (1) नुसार लिंग या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तसेच कलम 15 (3) नुसार महिला आणि मुलांसाठी वेगळे नियम बनविण्याची परवानगीही शासनाला देण्यात आलेली आहे. कलम 16 नुसार शासनाच्या अधीन असलेल्या पदावर नियुक्त होण्याची पुरूषाबरोबर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आलेली आहे. कलम 17 नुसार महिला व पुरूषासोबत असलेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. कलम 23 नुसार शोषणा विरूद्ध अधिकार तसेच मानवाचा व्यापार अथवा वेठबिगारीस प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. 73 व्या आणि 74 व्या घटनेदुरूस्ती नुसार राज्यघटनेमध्ये कलम 243 (D) आणि कलम 243 (T) अंतर्गत पंचायतराज संस्था आणि नागरी स्थानिक संस्थामध्ये सदस्य आणि प्रमुखांसाठी सुरूवातीला $1/3$ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. सन 2011 पासून त्यात वाढ करून महिलांना 50% जागा राखीव ठेवण्यात येत आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांच्या सन्मानाकडेही लक्ष देऊन राज्यघटनेच्या कलम 39 नुसार स्त्री-पुरूष दोघांना समान वेतनाची तरतुद करण्यात आलेली आहे. कलम 42 च्या माध्यमातून महिलांना कामाच्या ठिकाणी न्याय व सुरक्षीतता आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय करण्यात आलेली आहे. तसेच कलम 51



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168
March 2019
ISSN- 2348-7143
UGC Approved No. 40705

नुसार स्त्रीयांच्या प्रतिमेला हमी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करण्याची तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांच्या मानवी अधिकारांना संरक्षण देण्यात आलेले आहे.

**2. महिलांशी संबंधीत कायदे :**

स्त्रीयांच्या मानवी अधिकारांचे रक्षण करण्याठी आणि भारतीय घटनेने महिलांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचा वापर करण्यासाठी संसदेने विविध कायदे बनविलेले आहेत. त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा - 1956, मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क व संरक्षण कायदा - 1986, विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा 1959, हिंदु वारसा हक्कात मालमत्तेत समान वाटप कायदा 2005, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा 1986, गर्भ धारणा पूर्ण आणि जन्म पूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा 1994, किमान वेतन कायदा 1948, समान वेतन कायदा 1976, नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण विधेयक 2010 इत्यादी या कायद्यांची प्रभवी अंमलबजावणी करून शासन स्त्रीयांच्या सक्षमीकरणामध्ये महत्वाची भूमिका बजावीत आहे.

**3. महिलांसाठी स्वतंत्र मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोग :**

भारतामध्ये महिला आणि बालकांच्या विकासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आलेले आहे. या मंत्रालयाच्या माध्यमातून महिला व बाल विकासाठी विविध धोरणे व कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. तसेच 31 जानेवारी 1992 मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. हा आयोग महिलांचे घटनात्मक अधिकार आणि कायदेशीर सुरक्षितते संदर्भातील अधिकारांना प्रभाविपणे लागू करतो.

**4. राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण (2001) :**

महिलांना सशक्त बनविण्यासाठी भारतीय शासनाने सन 2001 मध्ये राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण आखले. या धोरणाच्या माध्यमातून महिलांना विविध क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी आणि सर्वांगिन विकासाच्या आधारभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. महिलांचे सामाजिक, राजकिय, आर्थिक सामर्थ्य वाढविण्यासाठी या धोरणांची अपयुक्ता अधिक आहे.

**5. महिला सबलीकरणासाठी योजना व कार्यक्रम:**

महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी भारतीय शासनाकडून अनेक योजना व कार्यकम आखण्यात आलेले आहेत. त्यातील प्रमुख योजना व कार्यक्रमाचा पुढीलप्रमाणे आढावा घेण्यात आलेला आहे.

I. **DWCRA :** (Development of Women and Children in Rural Areas) ग्रामिण भागातील महिला आणि बालकांचा विकास योजना :- एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रमाचा सहाय्यक कार्यक्रम म्हणून ही योजना सन 1982-1983 पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे महिलांना आर्थिक दृष्ट्रिकोनातून सक्षम बनविणे हा आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वरोजगारासाठी सक्षम बनविले जाते. त्यासाठी महिलांना प्रशिक्षण रोजगाराची साधने उपलबध करून दिली जातात. ग्रामीण महिलांचे गट त्यांना आर्थिक स्त्रोत उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

I. **महिललांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम:**
भारतीय शसनाने सन 1987 मध्ये या कार्यक्रमाचा प्रारंभ केला. यामध्ये कृषी, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स पालन, हातमाग, हस्तकला, खादी व ग्रामोद्योग आणि रेशीम उद्योग यांचा समावेश करून त्याबाबतचे प्रतिक्षण महिलांना दिले जाते.

I. **WILL** - Women Integrated Learning For Life (स्त्री- एकात्मिक शिक्षण जीवनासाठी) या कार्यक्रमाचा उद्देश निरक्षर मुली आणि युवतींना साक्षर बनविणे तसेच आरोग्य आणि पोषण, स्वच्छता, कुटुंब कल्याण इत्यादी महत्वाच्या विषयासंदर्भात त्यांच्यामध्ये जाणीव - जागृती घडवून आणणे हा आहे.

**स्वंयसिध्दा :**
महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेनुसार महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच महिलांचे आरोग्य, राहणीमान, सकस आहार, शिक्षण, स्वच्छता, मानवी अधिकार इत्यादी बाबत महिलांमध्ये जाणीव - जागृती घडवून आणण्याचे कार्य केले जात आहे.

**मिशन इंद्रधनुष्य :**
या योजनेच्या माध्यमातून गर्भवती महिला आणि बालकाचे आजारापासून रक्षण करण्यासाठी लसीकरण अभियान चालवले जाते.

**प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :**
या कार्यक्रमाच्या माध्यमातून गर्भवती किंवा बालकांना दूध पाजणाऱ्या मातांना आर्थिक मदत दिली जाते. प्रत्येक गर्भवती किंवा मातेला 6,000/- रूपये मदत राशी दिली जाते. ज्यामुळे ती महिला आराम करू शकेल आणि वेळेवर आरोग्याची तपासणी करू शकेल. या योजनेच्या देशातील लाखो महिला लाभ घेत आहेत.

**मुली वाचवा, मुली शिकवा योजना :**
महिला सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी या योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे देशातील अनेक जिल्ह्यामधील स्त्री-पुरूष लिंग गुणोत्तरामध्ये सुधारणा घडून आलेली आहे. तसेच माध्यमिक शाळेमधील मुलीच्या नोंदणीच्या संख्येतही वाढ झालेली आहे. मुलीच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी शासनाने अनेक शिष्यवृत्या सुरू केलेल्या आहेत. 12 वी पर्यंतचे शिक्षण



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 | March 2019 | ISSN- 2348-7143 | UGC Approved No. 40705

मुलीसाठी काही राज्यामध्ये मोफत करण्यात आलेले आहे. स्त्री शैक्षणिकदृष्ट्या सबळ झाली की कुटुंबाचा विकास होतो यामुळेच स्त्री शिक्षणाच्या विकासासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

VIII. **महिला उद्योजकांना प्रोत्साहन :**

केंद्र शासनाने मुद्रा योजना आणि स्टॅंडअप इंडिया योजनेच्या माध्यमातून देशातील उद्योजगांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्याही गॅरन्टीशिवाय कर्ज उपलब्ध करून दिले आहे. स्टॅंडअप इंडिया योजनेतंर्गत अनुसूचित जाती आणि जमाती, महिला, इतर मागासवर्गातील उद्योजगांना एक कोटी रक्कमेपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. मुद्रा योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिला उद्योजगांची संख्या सुमारे 70% पेक्षा जास्त आहे . यावरून स्पष्ट होते की महिला उद्योजगांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाकडून कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

IX. **स्वच्छ भारत मिशन :**

देशातील सुमारे 30 कोटी महिला शौंचालयाच्या सुवीधेपासून दूर आहेत. याचा विपरित परिणाम महिलांच्या आरोग्यावर आणि त्यांच्या सुरक्षिततेवर होतो. महिलांची या प्रश्नातून सुटका करण्यासाठी केंद्र शासनने स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून देशभरात सुमारे 7.25 कोटी शौंचालयांची निर्मिती करण्यात आलेली आहे. शाळामध्ये मुलींसाठी सौच्छालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

X. **इतर योजना :**

महिलांची धुरापासून मुक्तता करण्यासाठी आणि स्वयंपाक करण्यामध्ये सहजता येण्यासाठी केंद्र शासनाने उज्वला योजनेच्या माध्यमातुन देशातील सुमारे 3.8 कोटी महिलांना गॅसचे कनेक्शन मोफत उपलब्ध करून देण्यास आलेले आहेत. तसेच स्वआधार योजना 2001-2002 बालिका समृध्दी योजना (1996) तात्पुरता निवारा गृह योजना (1969) निराधार महिला, मुलींना राहण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहेत. तसेच पंतप्रधान सुरक्षित मातृत्त्व अभियान, पोषण अभियान, पंतप्रधान आवास योजनेमध्ये महिलांना प्राथमिकता देणे आणि मुस्लिम महिलांच्या सबलीकरणासाठी तीन तलाक विधेयक इत्यादी योजनाही महिलांच्या उत्थानासाठी केंद्र शासनाकडून राबविल्या जात आहेत.

**निष्कर्ष :**

महिलाच्या सबलीकरणासाठी भारतीय शासनांकडून अनेक योजना व कार्यक्रम आखण्यात आलेले आहेत. तरी आजही स्त्रीयांच्या दर्जामध्ये अपेक्षित सुधारणा झालेली दिसून येत नाही. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या मार्गात रूढी, प्रथा आणि परंपराचे वर्चस्व, पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय असमानता, योजना व कार्यक्रमाविषयी जनजागृतीचा अभाव, महिलांची योजनेप्रती उदासिनता, योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये अकार्यक्षमता, भ्रष्टाचार व पारदर्शकतेचा अभाव इत्यादी अडथळे आहेत. भारतीय शासनाने महिलांच्या सबलीकरणसाठी केलेल्या प्रयत्नामुळे आजची स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वावलंबी होत आहे. शिक्षण, आरोग्य, सरकारी व खाजगी क्षेत्रातील नोकरी, उद्योग आणि व्यवसाय तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये महिला पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत आहेत. परंतु महिला सबलीकरणापासून ग्रामीण क्षेत्र, आदिवासी क्षेत्र खूप दूर आहेत. यासाठी देशातील प्रत्येक महिला सक्षम होण्याच्या प्रक्रियेत शासन, जनता आणि प्रशासन या तिन्हीही घटकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

**संदर्भ सूची :**

१. Goel Auruna, Violence and Protective Measures for woman Development and rmpowerment, Deep. & Deep publication, New Delhi, 2004.
२. माहेश्वरी अविनाश, महिला अधिकार और कानून, प्रिज्मबुक्स, जयपूर, 2011.
३. गोटे-गव्हाणे शुभांगी, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद, 2004.
४. डॉ. विलास आढाव, महिला सबलीकरण, प्रोढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ.
५. कुरूक्षेत्र, सप्टेंबर 2018.
६. Womenङ्क Empowerment Wikipedia.org.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भास्कर चंदनशिव यांच्या कथेची भाषाशैली<br>**प्रा. दिलीप भिसे** | १-४ |
| २ | बहिणाबाईच्या कवितेतील अहिराणी बोलीभाषा<br>**प्रा. भैरवी कावरे** | ५-९ |
| ३ | आसाराम लोमटे यांच्या 'आलोक' कथासंग्रहाचे भाषिक विशेष<br>**सखाराम शहादेव शिंदे**<br>**डॉ. गणेश मोहीते** | १०-१३ |
| ४ | 'आंधाचं कारटं' या आत्मकथनातून व्यक्त झालेली बोली<br>**प्रा. डॉ. कल्याण गोपनर** | १४-१७ |
| ५ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**प्रा. डॉ. शिंदे जी. व्ही.** | १८-२१ |
| ६ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**ज्ञानेश्वर अशोकराव कदम** | २२-२५ |
| ७ | बोलीभाषेतील एक कविता : शब्दं<br>**प्रा. डॉ. शंकरानंद येडले** | २६-२८ |
| ८ | स्त्री गीतातून व्यक्त होणारा सामाजिक सांस्कृतिक परिवेश<br>**प्रा. जगदाळे किरण आगतराव** | २९-३४ |
| ९ | ग्रामीण साहित्याची भाषा आणि जागतिकीकरण<br>**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्यकाल** | ३५-३७ |
| १० | शंकर पाटील यांच्या कथेतील बोली भाषा<br>**प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव**<br>**प्रा. कातकडे केशव श्रीरंग** | ३८-४१ |
| ११ | लोकगायक : वासुदेव<br>**प्रा. गणेश सावजी** | ४२-४७ |
| १२ | बोली आणि भाषा : मराठीचा कालांतर, स्थित्यंतराचा इतिहास<br>**प्रा. रमेश रिंगणे** | ४८-५२ |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# १. भास्कर चंदनशिव यांच्या कथेची भाषाशैली

**प्रा. दिलीप भिसे**
मराठी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

१९४७ साली आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. एक नवे युग सुरू झाले. समाजाच्या सर्व स्तरावर जागृतीस प्रारंभ सुरू झाला. व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीची अस्मिता यास पाठबळ मिळाले. शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिकस्तरावर प्रगती होत गेली. ग्रामीण, दुर्गम भागात शाळा महाविद्यायालयांची निर्मिती झाली. हजारो वर्ष ज्ञानवंचित व उपेक्षित समाजासाठी ज्ञानाची दारे खुली झाली. शिक्षणाने जगण्याचे, अधिकाराचे भान आले. अनेकमंडळी वाचन—चिंतन—लेखन करू लागली. यासर्वांचा परिणाम १९६० नंतर मराठी साहित्य संस्कृतीला समृध्द करणारे विविध प्रवाह उदयास आले. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण, दलित, प्रादेशिक, आदिवासी, स्त्रीवादी ही नावे सांगता येतील. यात लिहिणारी लेखक मंडळी एका विशिष्ट समाजाची नव्हती तर समाजाच्या विविध जाती जमातीतून पुढे आलेली होती. नव्या संवेदना — स्वभावांची मांडणी करणारी होती. एका अर्थाने महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागातून येणाऱ्या या साहित्यिक मंडळीचे साहित्य खऱ्या अर्थाने उद्याच्या मराठी साहित्याचे प्रतिनिधित्व करणारे ठरले. यासंदर्भात प्रा. प्रल्हाद लुलेकर म्हणतात की, "साठोत्तरी साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्य परंपरेला आणि साहित्याच्या इतिहासाला नवेच वळण दिले. मराठी साहित्यातही नवा इतिहास घडविला. या पूर्वीच्या साहित्याला मर्यादा होत्या. त्या मर्यादा संपविण्याचा प्रयत्न केला. मराठी साहित्याची प्रचलित, प्रस्थापित, साहित्याची पारंपरिकता संपुष्टात आणली आणि नवे व्यापक रूप नवतेसह साहित्याला मिळाले ते साठोत्तरी साहित्य प्रवाहांमुळे!" [१]

१९६० नंतर उदयाला आलेल्या मराठी ग्रामीण साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याच्या क्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. हे सर्वमान्य आहे. आपले जगणे, अनुभवने वास्तव स्वरूपात मांडले. यासाठी आपआपली त्या त्या प्रदेशातील बोली भाषा घेऊन ही साहित्यनिर्मिती आकारास आली. त्यामुळे मराठी साहित्याच्या स्वभावाबरोबरच मराठी साहित्याचा चेहरामोहरा जसा बदलून गेला तसाच साहित्यातील मराठी भाषेचाही चेहरामोहरा बदलून गेला. "आजवर मराठी शब्दकोशांनी अस्पृश्य मानलेले मराठी शब्द आज मराठी भाषेत धो—धो स्वरूपात वाहत आहेत. मराठी भाषेच्या विविध बोली आज साहित्यात मुखर होऊन आपल्या विविध आणि समृद्ध कळा मराठी साहित्याबरोबरच मराठी प्रमाण भाषेला बहाल करत आहेत."[२]

१९६० नंतर आलेल्या विविध वाङ्मय प्रवाहापैकी स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा काही प्रमाणात अपवाद वगळता उर्वरित सर्वच वाङ्मय प्रकाराने प्रमाणभाषेपेक्षा बोली भाषेला आपल्या साहित्यनिर्मितीचे मुख्य माध्यम मानले. बोलीभाषेतून सहजरित्या आपल्या भावना, अनुभवांना वाट मोकळी करून दिली. ग्रामीणांचे जीवनही साहित्य निर्मिती योग्य असू शकते हे या प्रवाहांनी दाखवून दिले. यामुळे प्रस्थापित किंवा शहरी वाचक वर्गाच्या पलिकडचा ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील समाज, वाचक या साहित्याशी फार जवळून



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

जोडला गेला. त्याला हे भावविश्व व भाषाशैली आपली वाटू लागली. विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगुळकर, रणजीत देसाई, शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांनी १९६० पूर्वी मराठी ग्रामीण साहित्याची पार्श्वभूमी सकस करण्यासोबतच ग्रामीण साहित्याचा प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. हे कार्य १९६० नंतरच्या विविध प्रवाहांसाठी प्रेरणादायी ठरली असे म्हणता येते.

मराठवाडयाच्या पातळीवर मराठी ग्रामीण साहित्य निर्मितीचा आणि त्यासाठी प्रामुख्याने माध्यम म्हणून लक्षणीय भूमिका पार पाडलेल्या स्थानिक बोलीभाषेच्या संदर्भात विचार करताना स्पष्टपणे लक्षात येते की, एकूण मराठी साहित्य, ग्रामीण साहित्यात मराठवाड्यातील साहित्यिकांचे, त्यांच्या साहित्य निर्मितीत योगदान अतिशय म्हत्त्वाचे आहे. यामध्ये प्रामुख्याने बी. रघुनाथ, रा. रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, इंद्रजीत भालेराव, श्रीराम गुंदेकर, जगदीश कदम, नागनाथ पाटील, महेश मोरे, आसाराम लोमटे, श्रीकांत देशमुख, अशा कितीतरी ग्रामीण लेखक मंडळीनी ग्रामीण जीवनाच्या समस्या, निकडीचे प्रश्न नव्या बदलासह ग्रामीण जाणीवासह आपापल्या साहित्यातून प्रखरपणे मांडले यातील प्रतिनिधिक स्वरूपात मराठवाडयातील ग्रामीण साहित्य व ग्रामीण बोलीच्या अनुषंगाने विचार करण्यासाठी प्रसिध्द कथाकार, भास्कर चंदनशिव यांच्या साहित्याचा या ठिकाणी विचार केला आहे.

प्रा. भास्कर चंदनशिव यांनी जांभळढव्ह, मरणकळा, अंगारमाती, नवी वारूळं, बिरडं हे मराठवाडयातील ग्रामीण माणूस व त्याच्या जगण्याचे वास्तव चित्रण करणारे कथासंग्रह मराठी साहित्याला दिले. या कथांमधून बेकारी, दुष्काळ, परंपरागत बुडतखात्याची शेती, सरंजामशाही, विस्थापित व्यवस्था, ऊस उत्पादक आणि ऊसतोड मजूर प्रश्न, राजकारण, शेतकरी चळवळ, जाती संघर्ष, वर्ग संघर्ष, कौटुंबिक संघर्ष अशा कितीतरी विषय, समस्यांना त्यानें आपल्या कथेतून मुखर केले. ग्रामीण साहित्य जाणिवेच्या अनुषंगाने चिंतनपर समीक्षा लेखन केले. माती आणि नाती, ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि दिशा, माती आणि मंथन असे त्यांचे समीक्षागंथ प्रसिध्द आहेत. यासोबतच त्यांचे ललित, वैचारिक व संपादन क्षेत्रातही केलेली वाङ्मय निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण आहे.

भाषाशैलीच्या अंगाने भास्कर चंदनशिव यांच्या कथेचा वेध घेताना जाणवते की, त्यांच्या जवळपास सर्व कथेतील भाषा ही अस्सल बोलीभाषा आहे. प्रामुख्याने ही कथा मराठवाडयातील खास करून उस्मानाबाद जिल्ह्यातील समाजाची बोलीभाषा आहे. भास्कर चंदनशिव आपल्या कथेच्या निवेदनासाठी देखील ते याच बोलीभाषेचा वापर करतात, निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादासाठी बोलीभाषा असे चंदशिव करीत नाहीत. यामुळे कोणी शिकलेला माणूस किंवा कथा पात्राहून काहिसे भाषिकदृष्टया वेगळे पात्र ही कथा सांगते असे वाटत नाही तर ते जीवन जगणाऱ्यापैकीच कोणीतरी ही कथा सांगत असतो. असे जाणीवपूर्वक वाटत राहते. याचा परिणाम चंदनशिव यांच्या कथेतून आलेले ग्रामीण जीवन, माणूस आणि परिसर जिवंतपणे एकजिवपणे उभा राहण्यास कमालीची मदत होते. "सामाजिक बदलांचे त्यांच्या भाषेला अचूक भान आहे. सामाजिक स्तरीकरणातील जातीव्यवस्था, स्त्री–पुरूष लिंगभेद, वयोगट, सांस्कृतिक पर्यावरण यातील भेदही ती





सूक्ष्मपणे टिपते."[३] यासंदर्भातील काही ठळक ग्रामीण बोलीतील संवाद, निवेदन व ग्रामीण बोलीतील शब्द, म्हणी या संदर्भात पाहणे. अधिक महत्वाचे ठरेल.

चंदनशिव यांच्या कथेतील निवेदन हे प्रमाण भाषेत न येता. स्थानिक बोलीतून, संवादाच्या भाषेतून येते. त्यामुळे उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे कथेतून आलेले ग्रामीण जीवन आणि परिसर जीवंतपणे एकजीवपणे उभा राहण्यास मदत होते. "तात्या सानपानं वळंवळं महिपतीला कळंवला आणलं व्हतं. सोबत मालकाला द्याला मनून आणल्याला वानवळ्यानं वझं टकुऱ्यावर व्हतं. पोजवळ भाजलेल्या हुळ्याची पिशवी अन् अन् चांगल्या चांगल्या गावरान उसाची रसदार कांडकी बांधऱ्याली मोळी त्याच्या बगलेत दिली व्हती. अन् तसंल वझं घेऊन महिपती दावं लावल्यागत पाय वडीत बापाम्हांग मन मारून निघाला व्हता... शेतात पिकल्यालं कोनच बी पीक पहिल्यांदा या दुकानात वानकाळा मनून आणलं जायचं. निवडक, गोड आंब्याच्या करंड्या गुन्हाळात वाड्यातल्या बाईनं अगर धाकल्या–थोरल्या मालकांनं नावानं हाक मारून काई सांगितलं. तर त्या त्या कुणब्याला धन्य धन्य झाल्याचं वाटायचं."[४] वरील निवेदनातून महिपती या कथा नायकाच्या मनातील प्रस्थापित व्यवस्थेविरूध्दचा राग, तगमग अत्यंत सहजरित्या व्यक्त होते हे जाणवते. खालील निवेदनामधून सुध्दा निवेदनासाठीची सहज भाषाशैली लक्ष वेधून घेते.

''तसा चांगला मुहूर्त गाठून सिरपतीनं टपरी सजवून उभी केली. दुसऱ्या एका टपरीवाल्याच्या सल्ल्यानं डेकोरशन केलं. सामानाची मांडामांड केली. 'बळीराजा पान स्टॅल' ची रंगीत पाटी 'हार' घालून लावून टाकली. इठ्ठल रूक्मिणीची तसबीर आडम्होरं लावून डोळं मारणाऱ्या नटनट्यांची आरास मांडली. अन् मागचा–पुढचा इच्चार न करता, मन मारून सिरपती तात्याराव सानप पान ठेल्यावर बसला. मन लावून, डोळं झाकून त्यानं उदबत्ती पेटविली इठलाला हात जोडले... तसं गिऱ्हायिक आलं. हिकडं–तिकडं नव्या टपराला न्याहाळीत खास आवाजात बोललं, '..... पान लगाव बे जल्दी...' ...जिभीला चुना लागून चर्का बसवा, तसंच त्याचं बोलणं सिरपतीला झोंबलं... पर हातानी पानं उचलली. त्यातलं पाणी फडकाविल, मांडीवरच्या फडक्यावर पानं पुसून घेतली .... अन् आपुआप चुन्याची काडी पानाच्या पाठीवर फिरू लागली. पानावर चुना जसजसा पसरत चालला, तसतसं काळीजच काळीजच होरपळत राह्यलं. सम्दं आंग भाजल्यागत वाटायलं...'' निवेदनाप्रमाणेच संवादासाठी भास्कर चंदनशिव बोलीभाषेचा सहजरित्या वापर करतात. त्यामुळे त्यांच्याकथेतील प्रत्येक पात्र कथेत सहज वावरतांना, बोलताना दिसते. यातून त्या प्रत्येक पात्राचे स्वभाववैशिष्टये, त्यांचे परस्परातील नाते स्पष्टपणे वाचकांना लक्षात येते.

उदा. ''न्हेमी न्हेमीच लेकराला काय मनून हेटाहीत आसताव? सरकारचंच मढं बसंलय....'' असं म्हणून पाय आपटीत रकमा तणतणत बाहीर गेली. रकमाचा एक पक्का समज झाला व्हता. अन् त्यो समज तिचा तिच्यापुरता खरा बी व्हता.

''मरी आली, हये सरकार निस्ताच शिका मन्तंय. अन् शिकून तरी हया पोरांची काय वाट लावतंय... !'' ''ही मास्तरं निस्तीच पोसणं लावलंय. काई धंद्या–पाण्याचं शिकवुनी काय...?''



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

"शिकलं नी हुकलं मनावं. अन् व्हट आवळून बसावं – दुसरं काय हाय तर...?'' तसं आता वी रकमा वाटकूळ बोलत राहयली.

वरील संवादावरून रकमा या पात्राने विचारविश्व लक्षात येते. खूप सारे शिक्षण घेवूनही बेकार म्हणून मिरवणारे अनेक तरूण तिने पाहिलेले आहेत हे लक्षात येते. यासोबतच सरकारने व्यावसायिक शिक्षण देवून तरूणांना पायावर उभे केले पाहिजे. त्यामुळे त्यांच्यात निराशा येणार नाही. ते आपले भविष्य उज्वल करतील ही रकमाची तगमग वरील संवादातून सहजरित्या लक्षात येते.

भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील प्रतिमा, रूपक, अलंकार अभ्यासणे हा एक स्वतंत्र भाग होवू शकतो इतका तो सहज आणि समृध्द आहे. अनेक अर्थपूर्ण व वैशिष्टयपूर्ण सहजरित्या आलेल्या प्रतिमांमुळे कथेची उंची, भाषाशैली अधिक समृध्द होते. उदा. "घंटी वाजली, शाळा सुटली अन् तुंबून धरल्यालं पाणी फुटावं, तसं दारतोंडून पोरं वाहात सुटली. शाळेच्या समद्या पटांगणात चुरमुरं उधळल्यागत झालं. घोळक्या–घोळक्यानं रस्तं तुंबत चाललं.'' किंवा "उपोषणाचा आजचा चवथा दिवस व्हता. आता समद्या अंगाचाच चोथा झाल्यागत सिरपतीला वाटत व्हतं. नव्या गाडग्यागत आतल्या आतून सगळंच पाझरून गेल्यावनी झालं व्हतं. पडला पाय उचलू वाटत नव्हता, का तोंडावरली माशी हाणायचं आवसान उरलं नव्हतं.. .. व्हट वाळून जिभीचं सुकलेलं पान तोंडात मरून पडल्यागत झालं व्हतं.''

वर आलेल्या विविध प्रतिमा, अलंकारातून ग्रामीण भागातील माणसांच्या बोलण्याच्या लकबी, शब्दप्रतिमा याची चुणूक पहायला मिळते. भास्कर चंदनशिव कथेच्या अनुषंगाने या सर्व प्रतिमांचा सहजरित्या वापर करून आपल्या कथेला अधिक अर्थपूर्ण व वैशिष्टयपूर्ण साकार करतात. यामुळे त्यांची कथा भाषिकदृष्टया संपन्न होते. त्यांच्यातील सर्जनशील सशक्ततेची साक्ष पटते. एकूणच प्रा. भास्कर चंदनशिव यांची समग्र कथा मराठी कथेला, साहित्याला समृध्द करते असे ठामपणे म्हणता येईल.

संदर्भग्रंथ

१ प्रा. प्रल्हाद लुलेकर, मराठी साहित्य प्रवाह, बीड
२ डॉ. आनंद यादव, मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिकेशन, पुणे.
३ डॉ. केशव तुपे, प्रतिष्ठान, नोव्हेंबर–डिसेंबर २००६ आणि जानेवारी–फेब्रुवारी २००७
४ भास्कर चंदनशिव, अंगारमाती, साकेत प्रकाशन, औरंगाबाद





# २. बहिणाबाईच्या कवितेतील अहिराणी बोलीभाषा

प्रा. भैरवी कावरे
स्व. मदनगोपाल मुंधडा महाविद्यालय, चांदुर रेल्वे, जि. अमरावती.

मराठी साहित्यविश्वातील कलाकृती व कलावंत यांनी आपआपल्या लेखनशैली व जीवनमुल्याच्या मांडणीमुळे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याला काळ अथवा अन्य सीमाची मर्यादा नसतात त्या कलाकृतीतील मुल्य हीच त्याची ओळख असते. सामाजिक आशया बरोबरभाषीक दृष्टीकोनातुन ती महत्त्वूर्ण ठरते.भाषा ही व्यक्तीपरत्वे,जाती जमाती व भौगोलीक संदर्भनीय ती बदलत असते, बदल हा तिच्या जिवतंपणाचे लक्षण आहे. साहित्याच्या अविष्काराची भाषा हे एक माध्यम आहे. त्यामुळे ही भाषाही फक्त माध्यमापूरती मर्यादीत न राहता सामाजिक, सांस्कृतीक जीवनाची यथासांग ओळख करुन देते.

कविताहा आदिम असा वाङ्‌मय प्रकार असुनमनुष्याचा पहिला भावयुक्त हुंकार म्हणजे कविता होय जेव्हा माणूसपण प्राप्त झाले या माणूसपणाचा अविष्कार करावा असे वाटू लागले तेव्हा त्याने पहिल्यांदा जी अभिव्यक्ती केली ती कवितेमध्येच असली पाहिजे असे मानले जाते.अर्थात कवितेचे पहिलेरूप गीतात्मक म्हणजे गेय असावे असे म्हणायला काही हरकत नाही. आदिमानवाने ज्या भावना प्रगट केल्या असतील त्या गाऊन व नाचून केल्या असाव्या हे उघड आहे.म्हणूनच सर्व भाषांमध्ये काव्याला प्रदीर्घ अशी परंपरा असल्याचे दिसते. लीपीचा शोध लागण्यापूर्वी किंवा लेखन रूढ होण्यापूर्वी मौखिक रूपात असंख्य अविष्कार झालेले असणार हेही उघड आहे.

महाराष्ट्रामध्ये विदर्भ प.महाराष्ट्र,मराठवाडा,खानदेश हे विभाग आहेत त्या प्रत्येक प्रादेशीक विभागाची स्वतंत्र बोली आहे. त्यापैकी खानदेशी अहिराणी ही बोली आहे त्यांचा जीवन जगण्याचा अपरीहार्य घटक म्हणून ती भाषा व्यक्त होते. अहिराणी ही एक मराठीची उपबोलीभाषा आहे. महाराष्ट्रामध्ये प्रामूख्याने जळगांव, धूळे, नंदूरबार या जिल्हात ही बोलीभाषा बोलली जाते जवळपास ९५: खानदेशी अहिराणी बोलतात. अहिराणी भाषेत लेखन करणारे अनेक लेखक आहेत. नि.रा. पाटील यांनी खानदेशी भाषेवर आधारित 'लेवा गण बोली' भाषेचा शब्दकोष तयार केला आहे. तसेच डॉ. रमेश सुर्यवंशी यांचा अहिराणी भाषेतील पहिला शब्दकोषम्हणून प्रसिध्द आहे. तसेच डॉ. बाळासाहेब मुंजाळ, डॉ.म.सु.पगारे, डॉ. प्रा.डॉ.उषा व्ही. सावंत यांची सुद्धा अहिराणी बोलीमध्ये मोठया प्रमाणात लिखाण केले आहे.

आपण म्हणतो, दर बारा कोसावर भाषा बदलते ते खरेच आहे. प्रत्येक भाषेची आपआपली वेगवेगळी ठेवण आहे. अहिराणी बोली भाषेतील साहित्य संम्मेलन, चर्चा सत्र, परिसंवाद मोठया प्रमाणात घडुन येतात. त्यामुळे अनेक बोलीतील कलावंत आपल्या कलाकृतीतुन नवचैतन्य व नवपालवि फुटत आहे असे म्हणता येते.



Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2018

SPECIAL ISSUE - 50

## Literature : New Trends & Tendencies

## साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह

## साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह



अतिथी संपादक :

डॉ. आर. एच. गुप्ता

प्राचार्य,

संत मुक्ताबाई कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव

मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर

सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,

कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला. जि. नाशिक.

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018


| | | | |
|---|---|---|---|
| | विचार प्रवाह | | |
| 66 | कादंबरीच्या आशयाला नवा आयाम देणारी — चकवा कादंबरी | डॉ. माधव कदम | 354 |
| 67 | अहेर कथा संग्रहात अभिव्यक्त स्त्री व्यथा | संभाजी बाबाराव सावंत | 357 |
| 68 | रा.रं.बोराडे यांच्या कादंबरीतील ग्रामसंस्कृती | डॉ. ताराचंद एन. बिंदवाल | 361 |
| 69 | स्त्रियांच्या कवितेतील बदलते अन्वायार्थ | डॉ.कैलास इंगळे | 366 |
| 70 | ग्रामीण कादंबरी : सामाजिक संघर्षाचा अन्वयार्थ | पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन | 369 |
| 71 | आधुनिक साहित्यात आदिवासी काव्याचा प्रवाह | सुरकुले अनिता सोमनाथ | 372 |
| 72 | दलित आत्मकथन : उपरा | डॉ. दीपक निवृत्ती बावस्कर | 378 |
| 73 | मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. भारती वेंडाळे | 386 |
| 74 | दलित स्त्रियांची आत्मकथने: आशय आणि अभिव्यक्ती | डॉ.युवराज धबडगे | 389 |
| 75 | नाट्यसादरीकरणातील नवे प्रयोग : काही निरिक्षणे | डॉ. संदीप कडू माळी | 392 |
| 76 | दलित नाटकातील दलितत्व | मेघा पंढरीनाथ बोरोले | 398 |
| 77 | लोकसाहित्यातील लोककला | अनंत किसन वराडे | 402 |
| 78 | ललिता गादगे यांच्या कथेतील ग्रामीण स्त्रीजीवन | वळवी कवित्रा सिपू | 405 |
| 79 | मराठी ग्रामीण कादंबरी आणि कृषिअर्थव्यवस्था | डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 409 |
| 80 | दलित साहित्य ते आंबेडकरी साहित्य : एक विकसित प्रवाह | रविकिरण बसंतराव सदानशिव | 414 |
| 81 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणविषयक विचार | प्रमोद मनोहर राऊत<br>गणेश पी. सूर्यवंशी | 419 |
| 82 | ओवी चे स्त्री जीवनातील स्थान | ज्योती शरद इंगळे | 427 |
| 83 | साहित्यप्रकार : मध्ययुगीन कविता | डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | 430 |
| 84 | आदिवासी कविता : वास्तवतेचा प्रखर अविष्कार | डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | 435 |
| 85 | स्त्रीवादी संकल्पनेविषयी | सौ. कविता भागवत | 439 |




'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 86 | समीक्षा : संकल्पना, स्वरूप आणि मूल्यमापन | डॉ. सौ. सुषमा विश्वरत्न तायडे. (अहिरे) | 441 |


हिंदी विभाग

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

# आदिवासी कविता : वास्तवतेचा प्रखर अविष्कार

**प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे**
**मराठी विभाग प्रमुख**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई**

१९६० च्या नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी प्रवाह उदयास आले. या सर्वांनी त्या त्या समाजघटकांना सामावून घेत त्यांच्या व्यथा-वेदना, अन्याय-अत्याचार, हक्क-अधिकारांची बाजू ठामपणे मांडली. या अनुषंगाने आदिवासी प्रवाह अर्थात आदिवासी साहित्याने या मातीतील, समाजातील मूळ, आदी माणूस समाज प्रभावीरित्या अधोरेखित केला व मराठी साहित्यात मै ालिक भर घातली. यात एकूणच साहित्यात आदिवासी कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरली. आदिवासी साहित्यातील ती एक वैभव लेणे म्हणून नावरूपास आली. १९९० नंतर ही कविता आधिक आशयघन झाली. तिच्यात नवपरितर्वन आले. तिला सामाजिकतेची व वास्तवतेची झालर प्राप्त झाली. अन्यायाविरोधी बंड करून आपली ठाम भूमिका मांडू लागली. आपल्या हक्काची भाषा बोलू लागली. आपली स्वत:ची भाषा, सांस्कृतिक वेगळेपणा जपून तिने स्वतंत्र भाषाशास्त्र, सौंदर्यशास्त्र निर्माण केले. यामध्ये प्रामुख्याने विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, डॉ. उत्तमराव घोंगडे, वाहरू सोनवणे, रवि कुरसंगे, पुरूषोत्तम शेडमाक, प्रा. वामन शेळमाके, रामचंद्र जंगले, वसंत कन्नाके, बाबाराव मडावी, उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कविता आत्राम, सुनिल कुमरे, कुसुम अलाज, डॉ. अलका हिवाळे अशी खुप मोठी यादी यामध्ये नोंदवता येईल. तत्पूर्वी आदिवासी कवितेचा पाया घालण्याचा महत्त्वपूर्ण कार्य पहिला प्रतिनिधीक काव्यसंग्रह मोहोळ ने केले. महाराष्टातील आदिवासींचा पहिला प्रतिनिधीक काव्यसंग्रह म्हणून त्याची नों द झाली. १९८२ साली वणी येथे भरलेल्या साहित्य संमेलनात हा संग्रह प्रसिद्ध झाला. यामध्ये विनायक तुमराम, प्रभू राजगडकर, भुजंग मेश्राम, रवि कुरसंगे आर्दीनी काव्यलेखन केले.

'विनायक तुमराव' यांचा 'गोंडवन पेटले आहे' हा महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह आदिवासी साहित्याला बळ व दिशा देणारा ठरला. कविता लेखनामागील उदेदश स्पष्ट करताना ते म्हणतात, "वेदनेला शब्द देण्याचा हा माझ ा प्रयत्न. ज्यांच्यासाठी माझे शब्द ऐकवटले त्यांना त्या शतकाचे आक्रंदन कळले पाहिजे. त्यांच्या सामाजिक वाटचालीत आढळून येणारे कमालीचे शैथिल्य दूर झाले पाहिजे हीच या काव्यामागची भावना. आदिवासी समाजाची वेदना, दु:ख, उपेक्षा प्रखरपणे त्यातून व्यक्त झाली. वर्णभेद, जातीची दाहकता अजूनही कमी होताना दिसत नाही. केवळ शाब्दिक पातळीवर समानता, मानवतेची गोडवे गायली जातात प्रत्यक्षात मात्र हे चित्र आढळत नाही", अशी खंत व्यक्त करतात.

**आसवांच्या पाण्याने, आम्ही जाळत आहोत**
**स्वप्नांचे दिवे, उपेक्षेच्या भयाण अंधारात**
**वर्णजातीच्या सुसाट वादळात**
अग्रस्थानी ठेवले आहे. समाजातील, माणसा माणसातील प्रश्न, भेदभाव, जातीभेद, धर्मभेद, स्त्रियांच्या बद्दलचे दृष्टीकोण, वेद, मनुस्मृतील नियमावली या साऱ्या अमानवतावादी बाबी कायमच्या नष्ट करावयाच्या असतील तर विवेकी विचारसरणी अंगीकारणे, बाळगणे काळाची गरज आहे, याबाबतचे फुले यांनी या अखंडाची रचनेतून केलेले चिंतन खूपच महत्त्वाचे आहे.

विवेकी करीना जप अनुष्ठाने।।
पोकळ अर्पण।। निर्मिकास।।
विवेकी करीना दीन रंजल्यास।।
त्यांस भाकरीना।। काव्या ज्ञानी।।
विवेकी भजेना धातू दगडास।।
म्हणेना शूद्रास।। तुम्ही नीच।।
सद्विवेकावीण करीत तळमळ।।
पाखंडी निवळ।। जोती म्हणे।।

कुळंबिन म्हणजे शेतात राबणारी स्त्री शेतकऱ्याची सहचारिणी. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत प्रचंड काबाडकष्ट उपसणारी ही माऊली थकत नाही, ढळत नाही, कष्टाचा येनला वसा सोडीत नाही. अशा कष्टरुपी माऊलीला सम्पूर्ण आयुष्यात कष्टाशिवाय पदरात काहीच लाभत नाही. मात्र यावेळी एक विशिष्ट वर्गातील स्त्री अर्थात (भटीण) अशा काबाड कष्टापासून कोसो दूर असते. हा दोन स्त्रीयांच्या जगण्यामधील प्रचंड विरोधाभास महात्मा फुले यांनी अतिशय अभ्यासपूर्णरीत्या टिपला आहे.

यातून फुले यांची कुळंबिनीबद्दलची आस्था, तिच्या कष्टाळूपणाबद्दलचा आदरभाव सहजपणे प्रकट होतो तर भटीण बद्दलचा, तिच्या ऐतखाऊ जगण्याच्या प्रवृत्तीविषयीचा नाराजीचा सूर स्पष्टपणे जाणवतो. यासोबतच ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे, शेती व शेतकरी यांच्यातील असलेल्या कष्टपूर्ण व्यवहाराचे वास्तववादी चित्रण खूपच प्रभावीपणे, ओघवत्या स्वरूपात आले आहे.

कोंबडा आरव होता प्रात:काळी।।
वसे जातेपाळी।। शूद्रजाया।।
गाण्याचा धिंगाणा भ्रतार उठतो।।
वईलास नेतो।। चरावया।।
अरुणोदय होता करी रांगळ।।
वाही पाटवर।। केरमह।।
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

मात्र याउलट भटीणची जीवनशैली पुढील प्रमाणे मांडतात–

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]

संदर्भ ग्रंथ :
१. महात्मा फुले यांचे समग्र साहित्य – [illegible] महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२. [illegible] – डॉ. [illegible] – स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
३. फुले–आंबेडकरी वाङ्मय : [illegible] भूमिका – संपा. डॉ. [illegible] – [illegible] प्रकाशन [illegible] औरंगाबाद.

ℶℶℶ



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2021

Special Issue 263 (B)

# अनुवादित मराठी साहित्य




अतिथी संपादक -
डॉ. वनमाला गुंडरे (रेड्डी)
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

विशेषांक कार्यकारी संपादक
डॉ. दिलिप भिसे व डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal Is Indexed In :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

INTERNATIONAL RESEARCH

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
March-2021


| | | | |
|---|---|---|---|
| 28 | आफ्रिकेतील कृष्णवर्णियांच्या वेदना व्यक्त करणारे आत्मकथन : 'काळे गाणे' | डॉ. नानासाहेब यादव | 137 |
| 29 | कोकणची लोकसंस्कृती : लोकसाहित्याच्या संदर्भातला महत्त्वाचा अनुवाद | डॉ. संदिप भुयेकर | 142 |
| 30 | 'रिल्केची दहा पत्रे' मधील कलाकृतीविषयक दृष्टीकोन | डॉ. एम. ए. कन्हळे | 147 |
| 31 | भारतीय भाषामधून मराठी भाषेत स्त्री नाटयलेखिकांनी अनुवादित केलेल्या नाट्यकृती | डॉ. शिवाजी जगतवाड | 151 |
| 32 | 'कुरल' : सानेगुरुजी यांची श्रेष्ठ अनुवादित साहित्यकृती | प्रा. दिलीप भिसे | 154 |
| 33 | 'लीळा चरित्रातील' भाषा अनुवादाचे शैक्षणिक महत्त्व | प्रा. हिरामण पुजदेकर | 159 |
| 34 | साने गुरुजी व यशवंत मनोहर यांच्या प्रत्येकी एका कवितेचे भाषांतर | डॉ. मुकुंद राजपंखे | 162 |
| 35 | अनुवाद : संकल्पना, स्वरूप व प्रकार | प्रा. अर्चना काटकर - सोनवणे | 165 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the p on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the paper responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can rep these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Edi*

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 263 (B) : अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2021

# 'कुरल': सानेगुरुजी यांची श्रेष्ठ अनुवादित साहित्यकृती

प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे
मराठी विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' असे प्र. के. अत्रे यांनी साने गुरुजींचे केलेले वर्णन अगदीच यथायोग्य आहे. आयुष्यभर देशप्रेम, सामाजिक कळवळा, मानवता, आपुलकी, जिव्हाळा, त्याग, नैतिकता या मूल्यांच्या बळकटीकरनासाठी साने गुरुजी चंदनापरी झिजले. एक थोर स्वातंत्र्य सेनानी, समाजसुधारक, साहित्यिक म्हणून साने गुरुजी आपल्या सर्वांच्या मनात आज घर करून आहेत. आत्यंतिक संवेदनशील मनाचे थोर साहित्यिक म्हणून साने गुरुजी यांची साहित्यजगतात असलेली ओळख सर्वश्रुत आहे... त्यांचे एकूणच साहित्य प्रेमाने, संवेदनशीलतेने संस्काराने भारलेले आहे. साने गुरुजी यांची एकूण ग्रंथसंपदा ही शंभराच्या ही अधिक आहे. 'श्यामची आई' हे त्यांचे सर्वात लोकप्रिय व प्रचंड प्रमाणात वाचलेलं पुस्तक होय. याशिवाय त्यांची इतर सर्व ग्रंथसंपदा ही अतिशय सखोल तत्त्वज्ञान, विचार व्यक्त करते. जगण्याचं नव भान देऊ पाहते. अशी समृद्ध साहित्यसंपदा वाचल्यानंतर वाचणारा तृप्त होतो. असा हा महान लेखक वाचकांसाठी, समाजासाठी अन्य भाषेतील जे काही सुंदर आहे. मानवतेला, माणुसकीला, माणसांच्या सर्वांगीण विकासाला प्रेरणादायी आहे. आवश्यक आहे ते ते सर्व आपल्या स्वभाषेत अर्थात मराठी भाषेत जाणीवपूर्वक अनुवादित प्रयत्न करतात. जगातील अशा उत्कृष्ट सतरा कलात्मक ग्रंथाचा अनुवाद त्यांनी आपल्या खास शैलीत केला आहे. या सर्व अनुवादित साहित्यकृतिना त्यांच्या प्रेमळ, व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्श लाभला आहे. परिणामी या साहित्यकृती अतिशय समृद्ध व वाचनीय झाल्या आहेत, याबाबत शंका नाही. जसे की, डॉ. फॅन्ड्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञाच्या 'द स्टोरी ऑफ ह्यूमन रेस' या पुस्तिकाचे त्यांनी सर 'मानव जातीचा इतिहास' असे अतिशय महत्त्वाचे भाषांतर केले आहे. इंग्रजीतील अनेक महत्त्वाचे ग्रंथ साने गुरुजी यांनी केलेल्या अनुवादामुळे मराठी वाचकांना परिचित होऊ शकले आहेत. सोबतच तामिळ भाषेतून अनुवाद झालेले 'कुरल' हे त्यांचे एक सुंदर अनुवादित पुस्तक. प्रसिद्ध तामिळ लेखक 'तिरुवल्लुवर' यांच्या काव्यग्रंथाचा अतिशय सुंदर अनुवाद त्यांनी साधला आहे. या अनुवादित पुस्तकांना देखील त्यांच्या लेखनातील सर्वत्र दिसून येणारे भारतीय मूल्य आवर्जून लाभलेले आहे. असे प्रत्ययास येते. त्यांच्या अनुवाद साहित्याचं एक फार मोठे व अर्थपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे "करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयांचे" अशा सर्जक हेतूंनी प्रेरित होऊन साने गुरुजींनी ह्युगोच्याला मिझरावलचे 'दुःखी', 'फाउस्टचे' 'नदी शेवटी सागराला मिळते', 'लेपलाईटरचे मिरी' अशी सोपी रुपांतरे संस्कारक्षम बालवाचकांसाठी केली. स्वीकारलेल्या उद्दिष्टांच्या मर्यादेपर्यंत ही रूपांतरे यशस्वी आणि लोकप्रिय देखील ठरली आहेत." १

नरहर कुरुंदकर त्यांच्या अनुवादाचा विषयी म्हणतात, "अनुवादात त्यांची आवड लक्षात येते. ते प्रामुख्याने भावनिक नाहीत ; तर वैचारिक व धार्मिक महत्त्व असलेले आहे. हार्ड रियलिझम त्यांना आवडतो. जीवनातील सर्व सुख-दुःख पाहणार ते लेखक आहेत. ज्यांनी जीवनातील सुखदुःख बघून काही उदात्ततेचा स्पर्श ठेवलेला आहे, त्याकडे त्यांची ओढ आहे. वैचारिक साहित्यात स्नेहभाव सेवेचे महत्त्व आहे. जीवनात सगळ्यात सौंदर्यावरचं प्रेम आणि जीवनात ज्याच्या ठिकाणी उदत्तता दिसेल, त्याच्या समोर नम्र होण्याची त्यांची प्रवृत्ती आहे." २

आपला भारत देश अनेक राज्य, संस्कृती, समाज संस्कृतीचा सुंदर समूह आहे. राज्याची निर्मिती हे प्रामुख्याने भाषिक रचनेवरून झालेली दिसून येते. या भाषिक अस्मिता अधिक टोकदार होऊ नये. त्यातून



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

भारतीय ऐक्य धोक्यात येऊ नये, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला तडे जाऊ नयेत, म्हणून साने गुरुजी यांनी प्रांतभारती ही चळवळ उभी केली. त्या त्या राज्याची भाषा आणि त्यातील साहित्य हे श्रेष्ठ आहे. या धाग्यातून राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट व्हावी हा ध्यास साने गुरुजींनी कायम घेतलेला दिसतो.

'कुरल' ग्रंथाचा कर्ता हा 'तिरुवल्लुवर' आहे. गावामध्ये दवंडी पिटणे, निरोप पोहचविणे हा त्याचा पारंपरिक उद्योग. अशा व्यक्तीने निर्माण केलेले हे मौलिक काव्य एखाद्या ज्ञान पंडिताला ही लाजवेल असे आहे. तामिळ भाषेत या ग्रंथाला तामिळ वेद म्हटले जाते. या ग्रंथात एकूण १३३ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायात दहा कविता अशा एकूण १३३० कविता ह्या ग्रंथात आहेत. प्रत्येक कवितेची रचना दोन चरणाची आहे. या शब्दाचा अर्थच मुळी दोन चरण असा आहे. . अशा केवळ दोन ओळीत अतिशय गंभीर व विशाल अर्थ काठोकाठ भरलेला आहे. प्रस्तावना मध्ये साने गुरुजी म्हणतात "कुरलमधील कल्पना इतकी सुंदर, उपमा, अभिनव विचार यांची उदाहरणे किती द्यावीत. या १३३० कविता म्हणजे सारे अष्टपैलू हिरे आहेत. प्रत्येक कविता म्हणजे घासून पुसून ठेवलेला हिरा. हे एक शब्द कमी अधिक करता येणार नाही. इकडचा तिकडे करता येणार नाही." ३ असा हा अथांग अर्थ सांगणारा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ साने गुरुजींनी मराठी भाषिकांसाठी उपलब्ध करून दिला. त्यातील ज्ञान, मूल्य, जगण्याला बळ देणारे विचार वाचकांना दिले. या ग्रंथाचे जर्मन, इंग्रजी तसेच लॅटिन भाषेत सुद्धा भाषांतर झाली आहेत. साने गुरुजी यांनी हे भाषांतर श्री. एम. एस. अय्यर यांनी केलेल्या इंग्रजी ग्रंथावरून केले आहे. सानेगुरुजी म्हणतात की, "कुरल वाचून आपल्या लक्षात येईल की, भारतीय संस्कृती सर्वत्र एकच आहे. या विशाल देशाचे हृदय एकाच रक्ताने भरलेले आहे. एकाच नाडीचे ठोके सर्वत्र आहेत. आपण इतर प्रांतीय भाषातील वाङ्मय वाचले म्हणजे आपणास कळून येईल की, प्रादेशिक अंतर असले तरी मनाने आपण सारे जवळच आहोत, एक आहोत. थोर विचार-द्रष्टे जगाचे असतात. तिरुवल्लुवर हा केवळ तामिळनाडूचा नाही, तर तो भारताचा आहे, एवढेच नव्हे, तर सर्व जगाचा आहे. साऱ्या मानवजातीला उन्नत करण्यासाठी त्याने लिहिले. जातीने अस्पृश्य धंद्याने कोष्टी; परंतु विचारांचे सोज्ज्वळ माणिकमोती देणारा हा तिरुवल्लुवर मन मोहून घेतो." ४

कुरल ग्रंथाचा प्रारंभ ईश्वर स्तुती, प्रभू स्तुतिपासून होतो. ईश्वराचे सामर्थ्य, ईश्वराचा आशीर्वाद आणि ईश्वराने निर्माण केलेल्या नीतीनियमांचा आदर करणारा हा ईश्वराचा खरा भक्त असतो, असे कवीने म्हटले आहे. 'अष्टगुण, संपन्न अशा या प्रभूच्या चरणांना वंदन करीत नाही. त्या चरणांपुढे डोके लवत नाही, ते डोके नसून मोके आहे, असे सडे बोल ते व्यक्त करतात. तसेच प्रभुचे स्तवन मनापासून करणारे ते भक्त धन्य, भल्याबुऱ्या कर्मांची फळे त्यांना भोगावी लागणार नाहीत, ते मुक्त होतील... (पृष्ठ २३)

पर्जन्यमान, पाऊस त्याचे आगमन याविषयी खूप सुंदर विचार या ग्रंथात वाचायला मिळतात, जसे की, 'न चुकता येणारी ही पर्जन्यवृष्टी पृथ्वीचे धारण करते, पर्जन्यवृष्टी म्हणजे अमृत असते... 'आकाशाने प्राणी पाठविले नाही, तर या विशाल पृथ्वीवर दया, तपस्या ही दिसणार नाही... आकाशातून सरी न येतील तर हे हिरवे गवत ही वाढणार नाही.... अशी अतिशय नाजूक आणि काव्यात्मक काव्यरचना या ग्रंथातून हरेक पृष्ठावर प्रकटलेली दिसून येते... (पृष्ठ २४)

सदाचार अर्थात चांगले वर्तन ही खूप महत्त्वाची बाब आहे. हे ओळखून कवीने या विषयाच्या अनुषंगाने खूप छान विचार मांडले आहेत. "मत्सर, क्रोध, लोभ आणि कठोर वाणी यांचा त्याग कर. सदाचार संपादनाचा हा राजमार्ग आहे." "सदाचाराने जो आनंद मिळतो. तोच खरा. बाकीचे आनंद आणि बाकीचे सुखे ही शेवटी रडवतात." (पृष्ठ २६)

कौटुंबिक जीवन जगणारा, आदर्श जीवन जगणारा हा इतरांना दिशा देणारा असतो. "यथा योग्य वागणारा गृहस्थाश्रमी मनुष्य मनुष्यातील देवच होय." (पृष्ठ २७) अशा अतिशय कमी शब्दातून त्यांनी नैतिक गृहस्थाश्रमी मनुष्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. सद्गुणी पत्नीचे सुख, तिच्या सोबतचा संसार लाभणे भाग्य असते, नव्हेतर संसारी व्यक्तीचे जगणे सुंदर होऊन जाते. असे विचार या ग्रंथातून येतात. चांगली संतती असणे



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
March-2021

ही जगण्याची अजून एक महत्त्वाची प्रेरणा. आपली संतती अधिक शहाणी, हुशार तेवढे घरात सुख असते. आपल्या मुलांनी आपल्या होऊन मोठे व्हावे, असे प्रत्येक आईवडिलांना वाटत असते. तर पुढे ते असेही म्हणतात, "पुत्र जन्माला आला एवढ्याने ही मातेला आनंद होतो; परंतु मुलांची कीर्ती ऐकून तिला जो आनंद होतो, त्याला सीमा नाही." (पृष्ठ २९)

आळशी प्रवृत्ती आयुष्य उध्वस्त करते. कधीही भरून न येणारे नुकसान आपल्या अंगी भिनलेल्या आळशी प्रवृत्तीतून होऊ शकते, ही जाणीव व्यक्त करणारया खूप सुंदर रचना या कवितेतून वाचायला मिळतात. जसे की, "तुमचे कुल म्हणजेच तुमचा चिरंतन प्रकाश, स्थिर नंदादीप, परंतु आलस्याच्या विषारी वाऱ्याने हा दिवा मालवला जाईल." (पृष्ठ ८४) म्हणून पुरुषार्थ जागृत ठेवून कायम उद्योगी व प्रयत्नशील असणे, हे खरे मनुष्य पणाचे लक्षण आहे. "अशक्य समजून कोणत्याही कार्यापासून मागे नको वळू. तुझे प्रयत्न कोणतीही गोष्ट प्राप्त करून घ्यायला तुला समर्थ करतील." देवाला शरण न जाता जे अखंड यत्नशिल असतात, ते दैवाला फजित करतात." (पृष्ठ ८५) आपले भाग्य, आपले सामर्थ्यवान निर्माण आपल्या हाती असते. जे काही करायचे असते ते केवळ आणि केवळ आपणालाच करावयाचे असते. ईश्वर हा एक केवळ आपल्या सोबत असतो एकूणच तत्परता, कार्यशीलता मनुष्याच्या अंगी निर्माण म्हणून मांडलेले हे विचार अतिशय प्रभावी आहेत. या सर्वांसाठी आपणाला सज्जन माणसांची ओळख करून घ्यावी लागेल अशा माणसांबरोबर मैत्रीचे धागे अधिक घट्ट करावे लागतील. अशी मैत्री करत असताना सुद्धा सावधगिरी बाळगणे अतिशय आवश्यक आहे. ही मैत्री कुणासोबत असावी, यासंदर्भात त्यांची विधाने पाहणे आवश्यक आहेत. "खऱ्या योग्यतेच्या माणसांची निष्ठा जर तुला मिळू शकली तर अत्यंत दुर्मिळ असा एक ठेवा तुला मिळेल." "तुझ्याहून मोठ्या योग्यतेचे जर तुझे मित्र झाले तर त्यांच्यापुढे इतर सारी सामर्थ्ये फिकी पडतील असे थोर सामर्थ्य तू मिळविलेस असे म्हणता येईल." (पृष्ठ ६७)

सानेगुरुजी स्वतः त्यागाची मूर्ती होते. आयुष्यभर देशासाठी, समाजासाठी त्यांनी केलेला त्याग, केलेले कार्य, अद्वितीय आहे. म्हणून त्यागाचे आयुष्य जगणे जरी कठीण असले तरी ते जगले पाहिजे, यानंतर त्यातून मिळणारा अलौकिक आनंद हा अद्भुत असतो. अशा आनंद प्राप्तीसाठी त्याग किंवा आसक्ती असता कामा नये. "आसक्ती न सोडणाऱ्याला चिंता चिकटून बसेल, दुःख त्याला घेरील. ती त्याला कधीही सोडणार नाही." (पृष्ठ ५७) निस्वार्थी असणे, निःसंग असणे, हेच मनुष्याचे खरे व्रत आहे. "आनंद हवा असेल तर निःसंग हो. सर्वसंगपरित्याग केल्यावर तुला अपार आनंद मिळेल" (पृष्ठ ५७) असा आनंदी राहण्याचा विचार, थोर संतांनी सांगितलेला विचार त्या ग्रंथात अनुभवयास मिळतो.

साने गुरुजी यांच्यावर गांधीवादाचा प्रचंड प्रभाव पहावयास मिळतो गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकून जगण्याचा वागण्याचा अतिशय काटेकोर प्रयत्न साने गुरुजींनी आयुष्यभर केला. महात्मा गांधीजीप्रमाणे 'अहिंसा' हे मूल्य साने गुरुजींनी आयुष्यभर जपले. या ग्रंथात या संदर्भात अतिशय मौलिक गोष्टी, विचार वाचायला मिळतात.. जशा की... "कधीही कोणाला थोडीसुद्धा पीडा न देणे हे खरोखरच फार मोठी गोष्ट आहे." "अहिंसा सर्वोत्तम सद्गुण आहे; हिंसेसंगे सारी पापे येतात." " हिंसेवर जगणाऱ्यांना विचारवंत पिशिताशन करणारे असे म्हणतात." (पृष्ठ ५५) "जो क्रोध वश होतो, तो मृत्यूवश होय; परंतु ज्याने क्रोधाचा त्याग केला तो संत होय." "तुझ्या बाबतीत झालेले शेकडो अन्याय अनंत अग्निज्वालेप्रमाणे जरी तुला जाळीत असले तरीही तू रागवशील तर फार चांगले." (पृष्ठ ५३) असा अतिशय टोकाचा परंतु माणूसपणाला शोभणारा आणि एकूणच मानवजातीच्या प्रगतीसाठी आवश्यक असणारा विचार या विधानातून व्यक्त होतो.

खरे बोलणे, कायम सत्याची बाजू घेणे, सत्य आयुष्यभर जपणे, हे अतिशय महत्त्वाचे पैलू असतात. "ज्याच्या हृदयात असत्याचा लवलेशही नाही, तो सर्वांच्या हृदयाचा सम्राट होतो." असत्याची ओळख ही नसणे याहून माणसाची कीर्ती दुसरी नाही, याहून अधिक मुलाचा अलंकार नाही." "जे खरे महात्मे असतात, ते सत्याच्या प्रकाश आलाच प्रकाश मानतात, इतर प्रकाशाना ते मानीत नाहीत." "या जगा[illegible]नी पुष्कळ वस्तू पाहिल्या; परंतु सत्याहून थोर दुसरी वस्तू पाहिली नाही." असे सत्याची बाजू घेणारे, सत्याचा ध्यास व्यक्त करणारी खूप सुंदर विधाने या ग्रंथाचे खरे सौंदर्य म्हणून साकार होताना दिसतात.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

दांभिकपणा, कपटीपणा हा समाजातला दुर्दैवी दोष आहे. जो घालवणे खूप आवश्यक आहे. हा विचार करून ग्रंथामध्ये ढोंगीपणाबद्दल, कपटपणाबद्दल व दंभपणाबद्दल अतिशय प्रभावीपणे मांडणी केली आहे. "ढोंगी माणसाचे ढोंग पाहून शरीरातील पंचमहाभूतांची तत्वे हसू लागतात." साधूपणाच्या आवरणाखाली जो पापे करतो, तो झुडपात लपून पाखरांना फसविणाऱ्या पारध्याप्रमाणे आहे." बाण सरळ दिसतो; परंतु त्याला रक्ताची तहान असते; वीणा वक्र असली तरी मधुर संगीत पसरवते, म्हणून बाह्य रागरंगावरून परीक्षा न करता कृतीवरून करावी," असा मौलिक सल्ला, उपदेश या ग्रंथात दिसून येतो. निष्काम सेवाभाव, कार्यतत्परता, भुतदया या गोष्टी समाजात असणे अतिशय आवश्यक असते. यातून समाजामध्ये प्रेम, शांतता, कार्यतत्परता सेवाभाव, आपुलकी, जिव्हाळा, संवेदनशीलता या गोष्टी वाढीस लागतात. यासंदर्भात या ग्रंथातून आलेले लहान लहान परंतु अर्थाने अतिशय महान शब्दफुले अनुभवणे एक आनंद वाटतो. "काठोकाठ भरलेले गावांमधील ते तळे पहा; जगावर प्रेम करणाऱ्या माणसाचे वैभव त्याप्रमाणे असते." "थोर माणसे निरपेक्ष उपकार करीत असतात; मेघाच्या उपकाराची फेड हे जग कशाने बरे करील?" (पृष्ठ ४४) "दुसऱ्यापासून स्वीकारल्यामुळे स्वर्ग मिळत असला तरी तो नको आणि दात्याला जरी स्वर्गात मज्जाव झाला तरी दान देणे हा थोर गुणच समजावा." "याचकाच्या मुखावर समाधानाचे हास्य पाहिल्याशिवाय दात्याच्या हृदयाला खरा आनंद होत नाही." "जो मनुष्य सर्वांना दिल्यावर स्वतः खातो, त्याला भूकेचा भयंकर रोग कधीही शिवणार नाही." (पृष्ठ ४५)

विवेक हा मानवाचा सर्वात महत्त्वाचा पैलू... प्रत्येकाने विवेकी असणे, विवेकी वागणे जाणीवपूर्वक जपले पाहिजे. हे माणसाला, माणुसकीला खूपच फायदेशीर ठरेल. ज्यांच्याकडे विवेकाची श्रीमंती असते, तो मनुष्य सर्वात श्रीमंत. तो स्वतः सुखाने आयुष्य जगत असतो आणि दुसऱ्यालाही आनंद देण्याचा हरघडी प्रयत्न करीत असतो. असा विवेक सर्वांच्या अंतरंगात खोलवर संचारित रहावा म्हणून कवीने आवर्जून विवेकाबद्दल छान रचना केली आहे, "जीवनातील समाधान आणि शांती, जीवनातील आनंद आणि सौंदर्य विवेकामुळे असतात. ज्यांच्याजवळ विवेक नाही, धीर नाही, ते पृथ्वीला भार आहेत." विवेक-देवतेचे स्वरूप किती रमणीय आहे!हे जग कोणामुळे नित चालत असेल तर तिच्यामुळे होय." (पृष्ठ ८१)

समाजात जगताना, वावरताना, प्रत्येकाने काही तत्वे, काही दृष्टिकोन, काही मूल्य काही नियमावली स्वतःला घालून घेणे खूप आवश्यक असते. त्यामुळे स्वतःबद्दल प्रश्न निर्माण होणार नाहीत. संकटाचा सामना करण्याची वेळ खूप कमी येईल व दुसऱ्यालाही आपल्यामुळे त्रास होणार नाही तर त्यांचेही जगणे, वागणे आनंदात, सुखासमाधानात जगणे सहज होईल. अशा सर्व गोष्टींचा विचार करून या ग्रंथामध्ये काही गोष्टी आवर्जून सांगितलेल्या आहेत. जशा की, "आपल्या शक्तीचा जो विचार करीत नाही, प्रमाणात राहत नाही, तो जरी वैभवात दिसला तरी त्याचा नाश होईल. त्याचा मागमूस ही राहणार नाही." "मनाची शुद्धता आणि कृतीची निर्मलता पवित्र संगतीवर अवलंबून असतात." " ज्यांची मने विशुद्ध, त्यांची संतती ही विशुद्ध असते. ज्यांनी भल्यांची संगती धरली, त्यांची सर्वतोपरी भरभराट होते." "सत्संगतीहून दुसरा मोठा मित्र नाही, वाईट संगतीमुळे जितके संकटे येतात तितकी कशानेच येत नाहीत." "दुसऱ्यांनी आपला उपहास करू नये, असे ज्यांना वाटते त्यांनी विचार केल्याशिवाय कोणत्याही कार्यास प्रवृत्त होऊ नये." (पृष्ठ ६८,६९)

अशी एका पाठोपाठ एक वाचनीय, मूल्य गर्भ शब्दरचना या ग्रंथात ठायी ठायी अनुभवता येते. मनुष्याच्या भावनेला, कृतीला, सामर्थ्याला, आत्मविश्वासाला बळ देणारी, पाठबळ देणारी ही चिंतनीय निर्मिती. सर्व लहान लहान कविता वाचणाऱ्या प्रत्येकाचे मन मोहून घेण्यात यशस्वी होतात... "आजच्या या गंभीर सामाजिक परिस्थितीत शिक्षक-पालक व मुलं यांना एकाच वेळी संबोधित करायला आणि या तिन्ही घटकांना अधिक संवेदनशील आणि प्रेमळ बनवायला सानेगुरुजी हेच एकमेव औषध आहे आहे." ५ असे हेरंब



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

कुलकर्णी यांनी म्हटले आहे, हे साने गुरुजी यांच्या कुरल या अनुवादित ग्रंथाकडे अथवा त्यांच्या इतर कोणत्याही ग्रंथ निर्मितीकडे पहिले असता कुलकर्णी यांचे उपरोक्त विधान यथार्थ आहे, हा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

संदर्भ :

1. चंद्रशेखर जहागीरदार, सर्जनशील साहित्याचा अनुवाद, समाज प्रबोधन पत्रिका. जाने-फेब्रु-मार्च, २०२० पृष्ठ-५
2. नरहर कुरुंदकर, साहित्यिक साने गुरुजी पृष्ठ-३३
3. साने गुरुजी, कुरल, रिया प्रकाशन, कोल्हापूर, प्रस्तावना, पृष्ठ-५
4. साने गुरुजी, कुरल, रिया प्रकाशन, कोल्हापूर, प्रस्तावना, पृष्ठ-१७,१८
5. हेरंब कुलकर्णी, शिक्षकांसाठी साने गुरुजी मनोविकास प्रकाशन, प्रथमावृत्ती १९ जुलै २०१७, पृष्ठ-१७

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

FEBRUARY 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

# B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL




संपादक

डॉ. जगदीश साबू | डॉ.शिवाजी नागरे | डॉ.श्रीकृष्ण काकडे

This Journal is Indexed in
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 41 | गोरबंजारा लोकसाहित्यातील जीवनमूल्ये आणि जाणीवा **नेमीचंद चव्हाण** | 201 |
| 42 | नवजाणिवांच्या साहित्यातील वेगळेपणा: बंजारा स्त्रीउर्जेची हेळसांड **डॉ. विजय जाधव** | 209 |
| 43 | रक्त आटवणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांची परवड : मास्तर मातीचे **प्रा.डॉ. राजकुमार मुसणे** | 214 |
| 44 | नवोदोत्तर मराठी ग्रामीण कवितेचे बदलते स्वरूप **प्रा. डॉ.शरद वाघोळे** | 220 |
| 45 | मराठी साहित्य प्रवाहात जनसाहित्याचे योगदान **प्रा.डॉ. दिनेशचंद्र की. राऊत** | 223 |
| 46 | जागतिकीकरण आणि ग्रामीण समाजव्यवस्था **डॉ. अनंता सूर** | 227 |
| 47 | मराठीतील निवडक नव्वदोत्तरी स्त्री लेखिकांची कथासृष्टी : एक चिकित्सक अभ्यास. **प्रा डॉ स्वाती दीपक दामोदरे** | 233 |
| 48 | स्त्रीवादी साहित्याचे नव्याने आकलन **प्रा. डॉ मीनाक्षी पुंडलिक पाटील** | 238 |
| 49 | २००० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील बदलते जीवन संदर्भ **प्रा. डॉ. सुर्यकांत हरिश्चंद्र गित्ते** | 242 |
| 50 | एकविसाव्या शतकातील मराठी कथा **प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे** | 247 |
| 51 | संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील 'स्त्री' प्रतिमांचे वैशिष्ट्ये **श्री. संदिप कडूभाऊ तांबे** | 253 |
| 52 | संत साहित्यातील समाज प्रबोधन व नवमूल्यजाणिवा : एक शोध **प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे** | 258 |
| 53 | एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी साहित्यातील बदलते स्त्रीजीवन **डॉ.सुवर्णा रा. गाडगे** | 262 |
| 54 | स्त्रीवादी साहित्यातील बदलते स्त्रीजीवन **प्रा. नितेश रा. थोरात / प्रा. डॉ. माधुरी म पाटील** | 268 |
| 55 | नवजाणिवांचा साहित्यातील आविष्कार **प्रा.डॉ. गजानन गोपळराव हेरोळे** | 272 |
| 56 | संत चोखामेळा यांचे साहित्यातील समाजदर्शन **डॉ.विनोद अवधूतराव कोकणे** | 275 |
| 57 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातील बदललेल्या मूल्यांचा प्रभाव (दलित भटक्या—विमुक्त आणि आदिवासी) **प्रा.डॉ.कल्पना गोरले** | 278 |
| 58 | बदलत्या कृषी संस्कृतीचा आलेख : सदानंद देशमुख यांची कादंबरी **प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे** | 281 |
| 59 | २१ व्या शतकाच्या बदलत्या परिप्रेक्षातील ग्रामीण कादंबरी **प्रा.डॉ.विनोद नामदेव इंगळे** | 284 |




Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.572 Issue NO, 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308 February, 2022

# बदलत्या कृषी संस्कृतीचा आलेख : सदानंद देशमुख यांची कादंबरी

**प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे**
मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई
मो. ९८२२६७३६६०

सदानंद देशमुख हे मराठी साहित्यातील विशेषतः ग्रामीण साहित्यातील अतिशय महत्त्वाचे कथाकार, कादंबरीकार, कवी म्हणून सर्व परिचित असलेले नाव. ग्रामीण जीवन, शेतीमाती, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जीवनातील बदलती परिस्थिती या सर्वांचा अतिशय सखोल विचार करणारे सदानंद देशमुख हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. लचांड, उठावण, महालूट, रगडा, खुंदळधास, गाभूळगाभा हे वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'गावकळा' हा ग्रामीण जीवनाचा वास्तव वेध घेणारा महत्त्वाचा कवितासंग्रह. यासोबतच तहान, बारोमास आणि चारीमेरा या ग्रामीण जीवनाचा वेध घेणाऱ्या तीन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त आहे. यानिमित्ताने सदानंद देशमुख हे वैशिष्ट्यपूर्ण कादंबरीकार म्हणून सर्वांना परिचित झाले. समीक्षक, वाचकांनी यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून भरभरून प्रतिसाद दिला. एकविसाव्या शतकात आधुनिक तंत्रज्ञान यातून शेती संदर्भात झालेले बदल दिसून येतात. सरधोपट कथानके कादंबरीत आढळत नाही अनेक लहान-मोठ्या घटना प्रसंग ची गुंतागुंत या कादंबरीत प्रभावीपणे पहावयास मिळते. पात्रांच्या मानसिक भाव स्थितीचे. त्यांच्या भावभावनांचे सखोल चित्रण कादंबरीची बलस्थाने आहेत. रूपकं, ओव्या, म्हणी, वाक्प्रचार यातून समकालीन बदलते भाषिक रूप प्रकट होते. कादंबरीतील वातावरण या घटकातून अधिक प्रभावीपणे व्यक्त होते. निसर्गाची मांडणी, प्राणिमात्रांचे चित्रण वाचकांना वास्तव अनुभव घेण्यास या कामी येतात. एकंदरच बदलत्या ग्रामीण जीवनाचा भीषण चेहरा यांच्या कादंबरीमध्ये पहावयास मिळतो.

मागील काही वर्षात शेती व्यवसायात कळत नकळत यांत्रिकी धर्माचा प्रभाव वाढत गेला त्यातून नवे प्रश्न नवी आव्हाने निर्माण झाली सहकार्य समंजसपणा विश्वास समाधान याची जागा असूया द्वेष स्पर्धा मानसिक अस्वास्थ्य भ्रष्टाचार यांनी घेतला शेतीत प्रचंड काबाडकष्ट करण्याची मानसिकता इच्छाशक्ती आहे मात्र त्यास योग्य न्याय मिळत नसल्यामुळे शेती क्षेत्रात उदासीनता दाट होऊ लागली.

कृषिप्रधान शेतात क्षेत्रात शेतकरी शेती हा घटक कायमच प्रचंड शोषित प्रश्नांकित राहिला आहे आहे यापेक्षा अधिक दुर्दैव वेळ काय म्हणता येईल काळ बदलला परिस्थिती बदलली इतर क्षेत्रात विकासाची पहाट दिसू लागली आणि क्षेत्रातील प्रश्न मार्गी लागले परंतु शेतकरी शेती संदर्भातले प्रश्न मात्र कमी व्हायला तयार नाही अगदी सामान्य माणसापासून ते अधिकारीवर्ग सहकार क्षेत्रापासून शासकीय यंत्रणेने पर्यंत शेती शेतकऱ्याबद्दलचा दृष्टीकोण आहे तसाच शोषित राहिला हा सर्व संदर्भ लक्षात घेऊन सदानंद देशमुख यांनी शेती शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात जनजागृती व्हावी कृष्णा मिटण्यास सातबारा लागावा शेतकऱ्याच्या प्रश्नासंदर्भात विचारमंथन सुरू व्हावे खरीखुरी वास्तव परिस्थिती सर्वांच्या दृष्टीस पडावे या तळमळीने शेती शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात आपल्या तीन कादंबऱ्या साकार केल्या तहान, बारोमास, चारीमेरा या तीनही कादंबरीमधून शेतकऱ्याच्या वास्तव प्रश्नांची दखल घेत शेतकऱ्यासंदर्भात सरकारमध्ये सकारात्मक पावले उचलण्याचे नितांत गरज आहे, असा दृष्टिकोन व्यक्त होतो. अन्यथा ही व्यवस्था उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर येऊन ठेपली आहे. शेतीत राहण्याची मानसिकता वरचेवर कमी होत आहे. शेतीमधून इतर क्षेत्रात स्थलांतर होण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ज्यांना हे सर्व पेलवत नाही. आर्थिक विवंचना सहन होत नाही. या सर्वातून बाहेर पडणे अशक्य वाटते. तेव्हा ही मंडळी जीवनाला संपवतात, आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. यातून ते स्वतःला उद्ध्वस्त करतात. सोबतच कुटुंबालाही उद्ध्वस्त करून जातात.. यातून कुटुंबाचे प्रश्न मिटत तर नाहीतच उलट ते अधिकाधिक विकट होत जातात. कुटुंबाचा प्रमुख, कर्ताधर्ता पुरुष गेल्याचे दुःख तर असतेच सोबतच पुढील सर्व प्रशांना, दुःखांना सामोरे जाण्याची अतिशय कठीण वेळ बायकालेकरांना येते. या सर्व प्रश्नांकडे अतिशय जिव्हाळ्याने बघण्याची दृष्टी सदानंद देशमुख यांची जाणवते.

कधीकाळी काहीसे सुखी आयुष्य जगत असलेला, समाजात पत-प्रतिष्ठा, आर्थिक सधनता असलेला शेतकरी वर्ग अलुतेदार-बलुतेदार त्यांच्या माध्यमातून शेतीचे कार्य पार पाडून आपले जगणे आनंदात जगत होता, परंतु परिस्थिती बदलली, काळ बदलला, उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरणाचा प्रभाव सर्व व्यवस्थेवर झाला. यातून शेतीसंदर्भात एकूणच ग्रामीण जीवनात प्रचंड परिवर्तन झाले. यांत्रिकीकरणाचे वारे ग्रामीण जीवनात घट्ट पाय रोवून वाटचाल करू लागले. शेतकरी अथवा भल्यामोठ्या जमीन मालक असलेल्या शेतकऱ्यास यंत्राच्या आश्रयाला



Scanned with CamScanner

जाणे भाग पडले. पूर्वी कमी खर्चात होणारी शेती आज प्रचंड खर्चाच्या कचाट्यात सापडली. पीकपाणी अधिक होऊनही सर्व गरजा भागवणारे आर्थिक गणित झाले सुटता सुटेना अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यातून परिस्थिती अधिक सुपीक, विकसित सधन होण्याऐवजी ते अधिकाधिक ढासळत गेलेली शेतीचा खर्च वाढला. शेती कसण्यासाठी अधिकचा पैसा खर्च होऊ लागला. यातून हवालदिल झालेला शेतकरी खर्चाचे. प्रश्नाचे खड्डे बुजवता बुजवता हतबल झाला. याउलट शेती व्यवस्थेमध्ये पूर्वी मजूर म्हणून बताईदार म्हणून काम करणारा वर्ग जमीन कसून शेतीच्या कार्यापासून दूर गेला. एकप्रकारे स्वतःहून त्याने शेतीपासून स्वतःला वेगळे केले. स्वतःच्या नव्या वाटा चालणे त्यांनी स्वीकारले यातून त्यांचा अधिक विकास झाला. प्रगती झाली, आर्थिक सधनता आली. वेळप्रसंगी या वर्गाच्या दारात शेतीच्या संदर्भात मदतीमाठी शेतकऱ्याला येणे भाग पडले. अशी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण मांडणी सदानंद देशमुख यांनी या कादंबरीच्या माध्यमातून केली आहे.

सदानंद देशमुख यांनी बारोमास कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनातील दारिद्र्य पाणी प्रश्न शेतकऱ्यांचे होणारे लूट ग्रामीण भागातील बेकारी, अंधश्रद्धा, अज्ञान, निसर्गाचा लहरीपणा आणि भ्रष्ट व्यवस्था यांचे प्रभावी चित्रण केले आहे. ओला, कोरडा दुष्काळ, अवकाळी पाऊस, निसर्गाचा लहरीपणा, नापीकता, कर्जबाजारीपणा, शेतमालाला न मिळणारा हमीभाव, बँका-सावकारांची कर्ज, आर्थिक पत नसलेला शेतकरी असे अनेक प्रश्न शेतकरी संदर्भात उपस्थित होतात. या सर्वांचा अतिशय मार्मिक वेध या कादंबऱ्यांतून घेतला गेला आहे. ग्रामीण समाजाचे प्रश्न वाढून गुंतागुंत अधिकच वाढत गेली. नवीन सुधारण्यावरोबरच नवे प्रश्न, समस्या निर्माण झाल्या. ग्रामीण जीवनातील राजकारण, भ्रष्टाचार, अनैतिकता मूल्यांचा ऱ्हास, शिक्षणाचे बाजारीकरण, जीवघेणी स्पर्धा, सुशिक्षित बेरोजगार यासारख्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यांनी केली.

सदानंद देशमुख यांची 'तहान' कादंबरी दुष्काळी भागातील पाणीप्रश्न अतिशय गंभीरपणे हाताळते. पाणीप्रश्नाचा गैरफायदा घेणारे, राजकारण करणारे संधिसाधू लोक या कादंबरीत ठायीठायी आढळतात. तसेच महामार्गावरील बदलत्या खेड्याचे चित्रण आधुनिकीकरणाचे परिणाम, राजकारण्यांचा हस्तक्षेप, सरकारी योजनेतील भयंकर भ्रष्टाचार, शासकीय कर्मचाऱ्यांचे सुखलोलुपता, भ्रष्ट मानसिकता, यांत्रिकीकरणाचा सर्व घटकावर झालेला परिणाम, पर्यावरणाची झालेली हानी या सर्वातून ग्रामीण जीवनात निर्माण झालेले बकाल स्वरूप 'तहान' कादंबरीतून अतिशय प्रभावीपणे साकार होते.

ग्रामीण साहित्य तथा मराठी साहित्यात 'बारोमास' ही मैलाचा दगड ठरलेली कादंबरी म्हणता येईल. शेतकऱ्याच्या जीवनाची शोकात्मिक गाथा या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी प्रकट केली आहे. शेतकऱ्याच्या दुःखांचा. प्रश्नांचा वेग किती झपाट्याने वाढत जातो, हे एकनाथ तनपुरे या इतर पात्राच्या माध्यमातून दाखवली आहे. गुणवत्तेचे उच्चशिक्षण घेऊनही पाहिजे अशी संधी भेटत नाही. पर्यायाने त्याला शेती क्षेत्राकडेच वळावे लागते. व पर्यायाने शेतकऱ्यांचे जीवन त्यांचे दुःख, दारिद्र्य शोषण या सर्व बाबींचा सामना करताना त्याची प्रचंड कुतरओढ होते. यासोबतच ग्रामीण भागातील विविध घटना, प्रसंग, लोकजीवन, सणवार, रितीरिवाज, परंपरा रूढी या सर्वांचे अतिशय जिवंत चित्रण कादंबरीमध्ये पहावयास मिळते. बरोबर कादंबरीचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण जीवनामध्ये जागतिकीकरण. खाजगीकरण. उदारीकरण याचा झालेला शिरकाव. त्यातून प्रभावित झालेले ग्रामीण जीवन, कृषी व्यवस्थित झाले प्रचंड बदल, याचा शेतकऱ्यावर, शेतमुजरावर झालेला एकूणच प्रभाव कादंबरीमध्ये प्रभावीपणे पाहावयास मिळतो. म्हणूनच प्रा. प्रदीप राऊत म्हणतात की, ही कादंबरी म्हणजे "शेतकऱ्यांच्या वेदनेचे जणू एक आद्य शिल्पच मानावे लागेल. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त या वैदर्भीय कादंबरी मधील नायकांच्या माध्यमातून कादंबरीकार सदानंद देशमुख यांनी समस्त शेतकऱ्यांची शोकांत गाथाच व्यवस्थेपुढे ठेवलेली दिसते "

सदानंद देशमुख यांची तिसरी अतिशय महत्त्वाची कादंबरी 'चारीमेरा' ही होय. चारीमेरा म्हणजे शेताचे बांध, दोन शेतामधील सीमारेषा राखण्याचे कार्य बांधामुळे पार पडते. कादंबरीच्या शीर्षकातून शेतकऱ्याचे आयुष्य शेतीबांधाच्या आत बंदिस्त असल्याचे सूचित केले आहे. कष्ट, ओढाताण, समस्येचे बांध शेतकऱ्याला सुटू शकत नाहीत. प्रयत्नातून, विचारातून हे बांध कमी केले जाऊ शकतात. मात्र तसे होत नाही याचा अतिशय वास्तवदर्शी वेध सदानंद देशमुख यांनी चारीमेरा कादंबरीमध्ये घेतला आहे. बांध या पद्धतीने शेतीला बंदिस्त केले जाते. त्याच आशयाने शेतकऱ्याला ही बंदिस्त केले जाते. त्याचे जगणे मरणे शेती मातीशी निगडित असते. याचा अतिशय सूचक वेध कादंबरीत घेतला आहे. या कादंबरीचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे कादंबरीचा नायक उदेभान हा जीव जडलेल्या मुलीशी कौटुंबिक विरोधामुळे लग्न करू शकत नाही, मात्र पुढे तो आपल्या कन्येस प्रेमविवाह करण्याची संमती देतो. हे बदलत्या सकारात्मक सामाजिक जीवनाचे सूचन आहे, असे म्हणता येते. डॉ. दत्ता घोलप यांनी चारीमेरा कादंबरीचे स्वरूप नेमक्या शब्दात मांडताना म्हटले आहे की, "भारतीय समाज व्यवस्थेतील शेतीसारख्या महत्त्वाच्या घटकाचे वर्तमान समाजवास्तव कितीही भयप्रद, दुःखीकष्टी, नकोसे असले, तरी ते आहे त्या परिस्थितीत दाखवावेच लागते, नवभांडवली काळात भारतीय समाजात विकासाचे ढोलताशे आणि नागरी मध्यमवर्गीय तुताऱ्या उंचस्वरात



Scanned with CamScanner

वाजताहेत. मात्र इथली शेतीव्यवस्था मरणासन्न झाली आहे. आपल्याच समाजाचा एक मोठा घटक समूह कोणत्या पातळीवरील जीवन जगतो आहे. चंगळवादी भरभराटीच्या काळात कितीही नकोशी असले तरी ते आपले वास्तव आहे भारतीय समाजव्यवस्थेचा हा दुखरा कोपरा कसा आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न सदानंद देशमुख यांनी 'चारीमेरा' कादंबरीतून केला आहे. भारतीय शेतीची दुरवस्था नव्वदोत्तर काळात कोणत्या टोकावर आली याचा कलात्मक शोध घेतला आहे." थोडक्यात सदानंद देशमुख यांच्या तीनही कादंबऱ्या ग्रामीण समाजजीवनाचा सर्वांगीण आलेख मांडण्यात यशस्वी ठरल्या आहेत.

संदर्भग्रंथ:

१. ग्रंथवेध संपा. डॉक्टर भास्कर शेळके. शब्दालय प्रकाशन. श्रीरामपूर, पृष्ठ -148
२. मराठी कादंबरी आशय आणि अविष्कार, डॉ. दत्ता घोलप, अक्षरवाग्मय प्रकाशन पुणे पृष्ठ- 153



Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
October, 2021

# ग्रामीण कथेतून चित्रित होणाऱ्या ग्रामीण समस्या

प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे
मराठी विभाग प्रमुख,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा एक महत्वाचा प्रवाह म्हणून ओळखला जातो. ग्रामीण साहित्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण निसर्ग, शेती, ग्रामीण माणूस, कष्टकरी माणूस, त्याचं जगणं, त्यांचे प्रश्न, यांच्या समस्या, निसर्ग आणि माणूस यांचे घट्ट नाते या सर्वांचे वास्तव चित्रण प्रगत होताना दिसते. ग्रामीण माणसांच्या समस्या हा सामाजिक अंगाने करावयाचा अभ्यास म्हणून ओळखला जातो, मात्र ग्रामीण साहित्य ही साहित्यनिर्मिती सुद्धा प्रामुख्याने ग्रामीण माणसाचा आनंद शोधण्याऐवजी ग्रामीण माणसाचे दुःख मुख्यत्वेकरून शोधताना दिसते. कारण ग्रामीण जीवन अतिशय कष्टमय स्वरूपाचे कार्य आहे, जगणं आहे. तेव्हा स्वाभाविकपणे ग्रामीण जीवनामध्ये सुख, आनंदापेक्षा अधिकाधिक दुःख, प्रश्न आणि समस्या यांचा अधिक वावर दिसतो. अतिशय तजेलदार आलेले पीक रात्रीतून उद्ध्वस्त झालेले आहे. मोठ्या मुसळधार वादळ- पावसामुळे नेस्तनाबूत होतं. खूप आलेले पीक जेव्हा बाजारात विकण्याचा प्रयत्न होतो तेव्हा त्याची कवडीमोल किंमत केली जाते म्हणजेच पीकपानी खूप पिकले हे महत्त्वाचे नसून शेतकऱ्यांना त्या माध्यमातून किती आर्थिक प्राप्ती होते, लाभ होतो. हे महत्त्वाचे आहे याही पलीकडे भूमिहीन अनेक कुटुंबे ग्रामीण भागात आपले वास्तव्य व्यतीत करत असतात. मजूर कष्टकरी असा फार मोठा वर्ग ग्रामीण परिसरात जीवन जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. अशा अनेक प्रश्नांना साकार करण्याचे, वाचा फोडण्याचे काम ग्रामीण साहित्य करत असते. या ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कथा, ग्रामीण कविता संख्येने कमी का होईना पण ग्रामीण नाटकाने फार मोठी भूमिका पार पाडली आहे. या शोधपेपरच्या अनुषंगाने ग्रामीण कथेमध्ये नव्याने लेखन करू पाहणारे कथाकार अर्जुन डोईफोडे यांचा अवकाळी हा एकच कथासंग्रह अभ्यासाच्या दृष्टीने घेतला आहे. या कथासंग्रहाचे 'अवकाळी' शीर्षकच शेतकरी वर्गाचे आणि ग्रामीण जगण्याचे, ग्रामीण प्रश्नांचे सूचकपणे दर्शन घडते. या कथासंग्रहमध्ये एकूण 14 कथा लेखकांना एकत्रित केलेले आहेत. त्या प्रत्येक कथेमधून ग्रामीण जीवनाचा वास्तववादी वेध घेतलेला आहे. ग्रामीण जीवन किती झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे आणखी नव्याने प्रश्न निर्माण होऊन ग्रामीण माणसाचे जगणे अधिकाधिक कशाप्रकारे असह्य होत आहे, याचे चित्रण करण्यामध्ये हे कथाकार यशस्वी ठरले आहेत. त्यांची पहिली कथा 'मदत' या शीर्षकाची या कथेमध्ये दुष्काळामुळे, शेतीचे नुकसान झाल्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांची करून कहाणी येते. त्याला शेती व आयुष्य उभारणीसाठी आर्थिक आर्थिक मदतीची गरज असते, परंतु त्यास मदत करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही, परिणामी आर्थिक ओझ्याखाली दबलेला शेतकरी आत्महत्यासारख्या दुर्दैवी पाऊल उचलतो. पुढे त्याच्या कुटुंबाचे कशाप्रकारे वाताहत होते. त्याच्या पत्नीला कशा पद्धतीने वासनाधुंद समाजाची नजर झेलत आयुष्य व्यतीत करावे लागते. त्याचप्रमाणे स्वतःला सावरत, धीर देत सरकारच्यावतीने मिळणारी तोडकी मदत देण्यासाठीचे दिरंगाई ते मिळवण्यासाठी दुःख बाजूला सारून तहसीलच्या हेलपाटे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची पत्नी असे खूप सारे प्रश्न ही कथा चित्रित करते

'सालगडी' कथेमध्ये डोईफोडे यांनी शेतीतील मजुरांची घटणारी संख्या त्याचा परिणाम शेती कार्यावर व उत्पन्नावर कसा होतो, याचे अतिशय सूचकपणे वर्णन केले आहे. 'सालगडी' म्हणजे एका विशिष्ट करारानुसार वर्षभरासाठीचा शेतात काम करणारा मजूर परंतु अशाप्रकारे सालगडी ठेवण्यासाठीच या विविध अडचणी समस्या या कथेत आज चित्रित झाले आहेत. यासोबतच गरिबीमुळे पूर्ण होत नाहीत. चंगळवादी प्रवृत्ती अधिक बळावते. त्यातून अनैतिक व्यवहार जन्म घेतात या सर्वांचे अतिशय मार्मिक चित्रण त्यांच्या कथेतून येते सासू आणि सून यांच्यातील दुरावा हेवेदावे या नात्यातील तुटलेपण हा अतिशय सार्वत्रिक दिसणारा प्रश्न ग्रामीण कथेमधून अनेक वेळा येताना दिसतो. काही वेळा सासू-सुनेचा छळ करताना दिसते तर काहीवेळा सून-सासूची ससेहोलपट करताना



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

दिसते. सासमध्ये मरण होते ते घरातील पुरुष मंडळींचे कोणाची बाजू घ्यावी हा यक्षप्रश्न यांच्या समोर उभा राहतो. यासंदर्भात चित्रण करणारे 'अनसामाय' ही कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे.

ग्रामीण भागांमध्ये शेती व्यवस्थेमध्ये पाणी मुबलक असले विजेची सुविधा व्यवस्थित असली निसर्गाने साथ दिली तर शेतकऱ्यांना भरभरून भरभरून पीक येतं त्यातल्या त्यात योग्य भाव मिळाला तर आर्थिक प्राप्ती मोठ्या प्रमाणात होते. यातून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांनी स्वतःचं जगणं, आपल कुटुंबाचं जगणं समृद्ध करायला हवं. परंतु एक असा मोठा वर्ग आढळतो की, जो या आर्थिक सुबकतेतून अधिक व्यसनाधीन होतो. दारू, गांजा, मटका तमाशा या चक्रात अडकून प्रचंड कष्टातून निर्माण केलेला पैसा हातोहात उधळून टाकतो. स्वतःचं आयुष्य उद्धवस्त करायला पुढे-मागे पाहत नाही. ही प्रचंड मोठी समस्या ग्रामीण स्तरावर मोठ्या प्रमाणात आढळते. त्याचा परिणाम ग्रामीण माणूस, शेतकरी अथवा शेतमजूर यांचे आयुष्य दिवसेंदिवस अधिक सुखी, आनंदी होण्याऐवजी प्रचंड दुःखाच्या खाईत लोटले जाते. या प्रश्नावर चित्रण करणाऱ्या खूप साऱ्या ग्रामीण कथा ग्रामीण कथाकार लिहिताना दिसतात.

'कर्जबाजारीपणा' ही एक मोठी समस्या ग्रामीण भागात, शेतकऱ्याच्या आयुष्याला जखडलेली दिसते. शेतीच्या कार्यासाठी, प्रगतीसाठी तो कर्ज घेतो किंवा आपल्या कुटुंबाच्या कार्यासाठी कर्जबाजारी होताना दिसतो. हे घेतलेले कर्ज सरकारी असते. तर काही वेळा खाजगी सावकाराकडून घेतलेले असते. परंतु दुर्दैवाने शेती नीट पिकत नाही किंवा योग्य भाव मिळत नाही परिणामी कर्जबाजारीपणा संपत नाही. उलट तो वाढत जातो. स्वाभाविकपणे हे कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याचे अख्खे आयुष्य जाते. जो शेतकरी या समस्येला तोंड देऊ शकत नाही किंवा तोंड देण्याची क्षमता, संयम संपतो त्यावेळी तो स्वतःला संपवून घेतो. आत्महत्या करतो अशा प्रकारे आत्महत्या आणि कर्जबाजारीपणा यातील सहसंबंध चित्रित करणाऱ्या अनेक कथा ग्रामीण कथाकार यांनी लिहिल्या आहेत. शहरी जीवनापेक्षा ग्रामीण जीवनात माणसांमध्ये रूढी-परंपरा, मान-सन्मान, खानदानीपणा, घरंदाजपणा किंवा आपल्या कुळाला बट्टा लागू न देणे यास प्रचंड महत्त्व दिले जाते. त्यामुळे परिस्थिती कशीही असो अंतरजातीय लग्न अथवा आंतरधर्मीय संबंध मान्य करायला ग्रामीण मानसिकता आजही तयार होत नाही. त्यातून दुर्दैवाने काही घडले तर एकमेकांचा जीव घेण्यासाठी ही मंडळी आतुर झालेली दिसून येते. या संदर्भातला संघर्ष अनेक ग्रामीण कथांचा मुख्य विषय होताना दिसतो. आपल्या देशातील राज्यातील शेती प्रमुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. पाऊसपाणी हवामान चांगले असेल तर शेतकऱ्यांच्या पदरात भरभरून पडते. मात्र या पावसाने दगा दिला तर मात्र प्रचंड समस्या शेतकरी वर्गासमोर समोर उभे राहतात. कोरडा दुष्काळ केवळ शेतीसाठीच नव्हे तर मनुष्य व पशुपक्ष्यांसाठी प्रचंड हाहाकाराचा ठरतो. त्यातल्यात्यात ओला दुष्काळ प्रचंड नुकसान करून जातो. नजरेत भरणार पीक, प्रचंड उत्पन्न देऊ पाहणारे पीक एका रात्रीतून अवकाळी पावसामुळे वादळ वाऱ्यामुळे डोळ्यासमोर उद्ध्वस्त होताना दिसतं. तेव्हा शेतकरी, शेतीवर अवलंबून असणारा प्रत्येक घटक उध्वस्त होतो. पाऊस कमी झाला तरी प्रश्न आणि पाऊस प्रचंड झाला तरी प्रश्न, समस्या या शेतकऱ्यांच्या पदरी पूजलेल्या आहेतच. यांचेही चित्रण करणाऱ्या अनेक ग्रामीण कथा निर्माण होताना दिसतात.

गावपातळीवरचे राजकारण हा एक मुख्य अभ्यास विषय आहे. खुन्नस, संघर्षाने राजकारण हे चित्र गावोगाव आढळते. स्वाभाविकपणे हा विषय ग्रामीण कथेचा भाग होताना दिसतो. आपल्या दैनंदिन कामात अधिक रस घेऊन आपल्या जगण्यात आनंद शोधण्यापेक्षा ही ग्रामीण माणसे राजकारणाच्या प्रक्रियेत अधिक रस घेताना दिसतात. आपला अनमोल वेळ या राजकारणात देतात. यातून गावपातळीवर आयुष्यभरासाठीचे शत्रुत्व निर्माण होताना दिसते. म्हणजेच ग्रामीण स्तरावरील घाणेरडे राजकारण ही एक मुख्य समस्या आज प्रत्येक गावागावात पहावयास मिळते.

इंग्रजी माध्यमांच्या शाळेचे लोन खेड्यात पोहोचलेलं दिसतं. त्याचा थेट परिणाम जिल्हा परिषद शाळा बंद होताना दिसतात व त्याची आर्थिक परिस्थिती कमजोर आहे, अशी मंडळीदेखील भरमसाठ फी भरून, तालुक्याच्या ठिकाणी घर करून लेकरांना इंग्रजी माध्यमात शिकवण्यासाठी धडपड करताना दिसतात. त्यांची ही धडपड प्रामाणिक असली, लेकरांच्या भविष्यासाठी सुकर असली तरी यातून निर्माण होणाऱ्या शेतीविषयक समस्या, आर्थिक समस्या, कौटुंबिक समस्या शैक्षणिक समस्या असं खूप मोठा परिणाम नव्याने पहावयास मिळतो. या सर्व समस्यांचे प्रश्नांचे सूक्ष्म आणि गंभीर चित्रण करणाऱ्या अनेक ग्रामीण कथा नव्याने निर्माण होताना दिसत आहेत.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
October, 2021

संदर्भ सूची –

१. प्रा. अर्जुन डोईफोडे,, 'अवकाळी', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
२. विजय जाधव, 'दाखला', शब्द पब्लिशिंग हाउस, सिडको, औरंगाबाद.
३. कदम आनंद, 'गावाकडचे गाडी', प्रचीत प्रकाशन, नांदेड, प्र. आ. २००६.
४. रा. र. बोराडे, 'वानवळा', प्रतिमास प्रकाशन, परभणी, प्र. आ. २००३.
५. अर्जुन डोईफोडे, 'उसतोडणी', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## October -2021

ISSUE No- (CCCXXII) 322

**२१ व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या 'समकालीन सामाजिक समस्या'**

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. D. B. Tanduljekar**
Executive Editors
**I/C Principal**
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed

**Dr. Sanjay Surewad**
Editor
Head, Dept. of Soc.
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

October-2021

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Department of Sociology,
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar Publications

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

**UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X**

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

**MAH MAR 34737/13/1/2009-TC**

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-२)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

**डॉ. शिवाजी हुसे**

● अतिथी संपादक ●

**डॉ. युवराज धबडगे** — मराठी विभागप्रमुख

**प्रा. नागेश बोन्तेवाड** — मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

**मूल्य : ३०० रुपये**

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17. | **लोककवी-वादळवारा वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील डॉ.आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक तत्वज्ञान : एक अनुभवाधिष्टीत अभ्यास**<br>- प्रा.डॉ. विजयकुमार जी.वावळे | 63 - 68 |
| 18. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान**<br>- प्रा. डॉ. गणेश मालटे, भागवत भास्करराव पाटील | 69 - 71 |
| 19. | **वामनदादा कर्डक यांच्या गीतातील रमाई आणि सावित्रीबाई फुले**<br>- प्रा. गौतम गायकवाड | 72 - 80 |
| 20. | **कविंचे महाकवी : वामनदादा कर्डक**<br>- प्रा. डॉ. संतोष हंकारे | 81 - 85 |
| 21. | **वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी विचार**<br>- प्रा. डॉ. संदीप कडू माळी | 86 - 88 |
| 22. | **वामनदादा कर्डक यांचे जीवन कार्य आणि आंबेडकरी चळवळीतील योगदान**<br>- सखाराम बाबूराव शिंदे | 89 - 92 |
| 23. | **शाहीर वामनदादा कर्डक व्यक्ती आणि कार्य**<br>- डॉ. विठ्ठल केदारी | 93 - 95 |
| 24. | **वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान**<br>- डॉ. काकासाहेब रामराव सुरवसे | 96 - 100 |
| 25. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>- प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 101 - 105 |
| 26. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान**<br>- पल्लवी भगवान साबळे | 106 - 109 |
| 27. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>- डॉ. अनिल बळीराम बांगर | 110 - 114 |
| 28. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>– संतोष विलास दिवे | 115 - 118 |
| 29. | **लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य**<br>- पंढरीनाथ हरी मोकळे | 119 - 121 |
| 30. | **वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मय**<br>- प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव | 122 -125 |
| 31. | **वामनदादा कर्डक यांच्या गीतकाव्यातून येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>- डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी | 126 - 129 |
| 32. | **प्रगमनशील समाजभान व्यक्त करणारा लोककवी : वामनदादा कर्डक**<br>- प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 130 - 134 |




Scanned with CamScanner



# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता

**- प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे**
मराठी विभागप्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड
मो. ९५७९६२२०६०

---

मनहात्मा गौतम बुद्ध, जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या दलित चळवळीला, दलित साहित्याला समृद्ध करण्याचे आणि वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रबोधनकार शाहीर वामनदादा कर्डक यांनी केले. आपले संपूर्ण आयुष्य आपले सुखदुःख, आपला संसार, स्वार्थ बाजूला सारत वामनदादांनी आपल्या कविता-गीतांमधून दलित चळवळीला सातत्याने क्रियाशील ठेवले. यातून सामाजिक जागृती घडवून आणली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, कार्य दलित, वंचित, शोषितांना समजले पाहिजेत म्हणून अविरत प्रयत्न केले. केवळ महाराष्ट्र नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश या राज्यातील अनेक शहरांमध्ये त्यांनी भटकंती करत गीताच्या माध्यमातून विचार पेरण्याचे, प्रसार करण्याचे महान कार्य केले. त्या त्या राज्यातील शोषितांचे दुःख, व्यथा वेदना भावपूर्ण शब्दातून गायन रूपातून ताला-सुरात लोकांच्या पुढे मांडल्या प्रसंगी त्यांनी काही रचना हिंदी भाषेतून सादर केल्या. एक प्रकारे हे सर्व कार्य प्रचंड झपटल्यागत होते, असे दिसून येते.

वामनदादा यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी प्रचंड आस्था, अभिमान होता. मूकपणे शोषित आयुष्य जगणाऱ्या दलित, वंचित समाजास जागृत करण्याचे, त्यांना आत्मभान प्रदान करण्याचे सर्व श्रेय ते बाबासाहेबांना देतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अथवा त्यांच्या कार्याबद्दल असलेली श्रद्धा, आदर वामानदादानी आपल्या अनेक गीत-कवितांमधून प्रांजळपणे व्यक्त केला आहे, जसे की...

मी भीमाचा बाळ आहे, मी भीमाचा बाळ...
मी भीमाचा बाळ आहे, मी रमाचा बाळ...

किंवा

'उद्धरली कोटी कुळे,भीमा तुझ्या जन्मामुळे,
एक ज्ञान ज्योतीने, कोटी कोटी ज्योती तळपतात तेजाने,
तुझ्या धरतीवरती अंधार, दूर तो पळे -भीमा तुझ्या जन्मामुळे'

किंवा

फुले-आंबेडकर तारतील तुम्हाला
दुजे सारे मारतील तुम्हाला



Scanned with CamScanner

लोकशाहीच्या सर्व सुखापासून
दूर कायमचे सारतील तुम्हाला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'महू' जन्मस्थळ. प्रत्येक वंचितांसाठी, दलितांसाठी श्रद्धास्थान आहे. मनातील एक अढळस्थान आहे. तेथील प्रत्येक वस्तूचा स्पर्श, गंध प्रेरणा देणारा, नवी ऊर्जा देणारा वाटतो. यासंदर्भातील आदरपूर्वक भावना व्यक्त करणारी वामनदादा यांची खालील रचना वौशिष्ट्यपूर्ण आहे..

भिमा तुझ्या महुला जाऊन काल आलो
तू जन्मल्या ठिकाणी राहून काल आलो
तू रांगालास जेथे, तेथेच मान झुकली
ती धूळ मी कपाळी, लावून काल आलो.

बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तिमत्व वंचित, शोषितांचे कैवारी होते. त्यांचे एकूण कार्य, व विचार सर्वसामान्य जनतेला, अन्यायग्रस्त माणसाला, मूक समाजाला जगण्याची दिशा देणारे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे ठरले... या अर्थाने ते युगपुरुष होते, मूकनायक होते... कित्येकांच्या जगण्याची, विचाराची, कार्यांची प्रेरणा मिळाली...वामनदादा कर्डक यांचेही प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होते. 'भीमवाणी' या कवितेतून वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलचा कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे... माझ्या गीतांचा उगम त्यांच्या वाणीतून झाला, असे आदरपूर्वक नमूद करून वामनदादांनी बाबासाहेबांनी अंगिकारलेला व मानवी कल्याणासाठी सांगितलेला मार्ग प्रत्येकाने स्वीकारला पाहिजे, म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले.

भीमवाणी पडली माझ्या कानी / तीच वाणी ठरली माझी गाणी
ह्या भीम पथाने जाता / चिंता न जीवाची आता
गाऊन भिमाची गाथा / सुखवावी जनता माता...

म्हणूनच वामनदादांची गीते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्याची प्रतिबिंबे आहेत, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या महापुरुषांचा विचार तळागाळातील सर्वसामान्यांना वंचितांना, शोषितांना देणे, त्यांच्या जगण्याचे उन्नयन करणे, माणूसपण निर्माण करणे, धर्मविरहित, जातीविरहित, अन्यायविरहित समाजव्यवस्था निर्माण करणे हे वामनदादाच्या कविता-गीतांचे मुख्य उद्दिष्ट राहिले आहे, हे स्पष्टपणे दिसून येते.

या संदर्भात कवी यशवंत मनोहर यांची प्रतिक्रिया ही फार बोलकी आहे, ते म्हणतात, वामनदादा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा चालता-बोलता संदेश वाहक होय. तसेच वामानादादांच्या सक्रिय योगदानाबद्दल त्यांचे गौरोद्गार उल्लेखनीय आहेत. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या लढ्यात ज्या अनेक स्त्री-पुरुषांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यात दलित शाहिरी परंपरेतील एक महत्त्वाचे शाहीर म्हणजे वामनदादा कर्डक होय."

यासोबतच वामानदादांनी गौतम बुद्ध, कबीर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, यशोधरा, शाहू महाराज अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू या महापुरुषांच्या कार्य तसेच राष्ट्रवाद माणूसपण, सुखी समृद्ध, अन्याय विरहीत समाजनिर्मिती, स्त्रियांचे सामर्थ्य, वास्तव परिस्थिती, निसर्गाच्या रूपाची विविधता आपल्या कवितेमधून प्रभावीपणे व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे लोकांना समजेल, कळेल अशा साध्यासोप्या भाषेमध्ये ते व्यक्त होताना दिसतात. म्हणूनच त्यांची गीते दलित समाज, सर्वसामान्य, शोषित, कष्टकरी माणूस यांच्या ओठावर आजही रेंगाळताना दिसतात. दादांची गीते-कविता ऐकल्यानंतर आजही एक वेगळी प्रेरणा मिळते, एकमेकांसोबत अतिशय प्रेमाने, एकोप्याने नांदणारा, वागणारा समाज वामनदादा कर्डक यांना अपेक्षित होता. जे झाले ते विसरून जाऊन तुटत असलेले दुवे सांधून एकतेने वागले पाहिजे, हा आग्रह फार महत्वाचा आहे, आजही या उदात्त विचाराची आवश्यकता आहे, हे आवर्जून जाणवते.

सांगू किती मी दादा, एकतेने येथे नांदा
यारे सारे भाऊ भाऊ, एकतेने येथे राहू
तुटले दुवे हे सांधा, एकतेने येथे नांदा...



Scanned with CamScanner

हे बंधुत्व नष्ट होण्यात, समाजात, माणसामाणसात दुफळी निर्माण होण्यात हिंदू धर्माचा स्वार्थासाठी केलेला वापर कारणीभूत आहे, यातून निर्माण झालेली स्वार्थी संस्कृती कारणीभूत आहे एक थोर, एक नीच, एक माणूस श्रेष्ठ, एक कनिष्ठ असा भेदच मुळात चुकीचा आहे. आपण सर्व एक आहोत, हा नवा विचार देणारी नव संस्कृती आपणास निर्माण करावी लागणार आहे. म्हणून ते बंधुत्व विसरलेल्या संस्कृतीला, धर्माला नकार देतात. हा नकार खालीलप्रमाणे प्रकट होतो...

नको हिंदुत्व बंधुत्व नाही इथे
नीच गणले कुणा, थोर कोण इथे
संस्कृती आंधळी ही लुळीपांगळी..

माणुसकीला, माणसाला गौण लेखणाऱ्या धर्म, संस्कृतीला नकार देऊन बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्या धर्माची वाट निवडली. म्हणून सर्व ठीकठाक झाले असे म्हणता येणार नाही, यातून धर्म-जातीजातील संघर्ष पूर्णपणे संपला असेहीनाही. काटेरी वाट अजूनही संपली नाही. भेदाभेदाची दरी अजून संपली नाही. आजही वागताना, वावरताना जपून पाऊले टाकावी लागतील. सावध राहून आपले आयुष्य जगावे लागेल. संघर्ष कधी उद्भवेल हे सांगता येणार नाही... अशाप्रकारे एकूणच परिस्थितीचा किती बारीकसारीक अभ्यास वामानदादा यांना होता, हे या गीतातून स्पष्ट होते... ते म्हणतात...

जपुन पडू दे पाय पोरा
जपून पडू दे पाय
लय वळणाची वाट
वनाची जणू काटेरी हाय...

एकाने हसावे, लाखोने रडावे, असे विश्व आता, येथे ना उरावे, असे विश्व निर्माण करण्यासाठी आपणाला ही माणुसकीची, मानवतेची लढाई आपणाला लढावी लागणार आहे. भलेही यात आपल्याला जीव देण्याची अथवा जीव घेण्याची वेळ आली तरी चालेल...हा संघर्ष, ही लढाई आता अटळ आहे... मात्र ही लढाई आपण माणुसकीने लढायची... ही अट वामनदादांच्या माणुसकीचे दर्शन घडवून जाते... 'माझ्या जीवनाच गाणं' या आपल्या आत्मचरित्रात वामनदादा यांनी म्हटले आहेच की, "माझं गाणं माणसांची मनं जोडणार आहे, हे तोडणार नाही."

आधी माणुसकीने लढू
नाही याची शिखरे चढू
जरी आडवे आले कढू
रणी पाडू अथवा पडू

संत ज्ञानेश्वरांनी पसायदानाच्या माध्यमातून समस्त जगाच्या कल्याणासाठीचे दान मागितले अगदी त्याच पद्धतीने, निर्मल भावनेने वामनदादांनी मागितलेले दान निश्चितच मानवतावादी आहे, हे जाणवल्याशिवाय राहत नाही..

भिकारी होऊनी दारी, तुझ्या मी दान मागावे
दीनांच्या चाकरीसाठी, तुझे इमान मागावे
उपाशी जीव हे कोटी, त्यांची भूक भागावे
मनाच्या मंदिरी थोडे, तयांना स्थान मागावे

सामाजिक विषमतेचे अतिशय टोकदार वर्णन वामनदादा कर्डक आपल्या गीत-कवितेमधून करतात. घोट घोट पाण्यासाठी तरसणारी व्यवस्था, समाजव्यवस्था माणुसकीला काळिमा फासणारी आहे. पाणी पाजून अन्याय-अत्याचार करण्याची मूक संमती देणारी दुर्बल मन्नोव्यथा खालील कवितेतून सूचकपणे व्यक्त होते.

पाणी वाढ गं
लय नाही मागत
भर माझं इवलसं गाडगं
पाणी वाढ गं...



Scanned with CamScanner

काळाने केलं काळ
जातीचं विणलं जाळं
पाण्याच्या घोटासाठी तळमळते माझं बाळ...
पाज आम्हाला पाणी
अन मग डोळे फाड गं...

'आम्ही तुफानातील दिवे' ही वामनदादा कर्डक यांची एक अतिशय सुंदर आवेशपूर्ण अशी रचना. प्रारंभीच्या काही ओळींमधून मानव मुक्तीसाठी, स्वातंत्र्यासाठी संघर्षाची भाषा बोलणारे वामनदादा कवितेच्या शेवटी शेवटी अत्यंत सयंमाची, त्यागाची भूमिका व्यक्त करतात. संघर्ष कोणासाठीच फलदायी नसतो, समता, बंधुतेचे नाते खऱ्या अर्थाने सुख, आनंद देणारे असते म्हणूनच ते सदा सर्वकाळ सर्वांनी सुखी असावे, नांदावे ही अपेक्षा व्यक्त करतात.

जळू परंतु धरती उजळू
प्रकाश येथे असाच उधळू
सदा चांदणे सुखी नांदणे
हेच आम्हाला हवे
तुफानातले दिवे
आम्ही तुफानातले दिवे

'वंदन माणसाला' या गीतांमधून वामनदादानी माणुसकी, मानवता, मानवी मूल्य यांची खूप सुंदर मांडणी केली आहे स्वत:चा शुल्लक स्वार्थ साधण्यासाठी माणुसकीची होळी करून पोळी भाजणारे लोक खूप घातक असतात. कष्टाला योग्य किंमत न देणे, आर्थिक शोषण करणे, रूढी, परंपरेचे बंधने लादून मुस्कटदाबी करणे या सर्व गोष्टी सामाजिक सुखाला बाधा आणणाऱ्या असतात. याचा परिणाम गरिबी, दारिद्र्य, गुलामीत होऊन माणूसपनाचे जगणे हिरावून बसते, वाटी केवळ दु:ख अन दु:खच येते. ही सर्व परिस्थिती बदलावयाची असेल तर माणसाने माणसावर प्रेम करणे आवश्यक आहे, प्रत्येक माणसाला वंदन करणे आवश्यक आहे.

मानवतेची करून होळी | भाजू नको रे पोळी
पिकेल पोळी तुझी बिचारी | जळेल जनता भोळी
कोणी बनविले धनी कुणाला | कोणी बनविले दास
कष्टकऱ्यांच्या गळी बांधला | कुणी गुलामी फास
जीर्ण पिढीचे नको | रुढीचे बंधन माणसाला
वंदन माणसाला | वंदन माणसाला

आजवर झालेले शोषण, झालेला अन्याय, अत्याचार, गुलामी लादण्यात समाजातील उच्च वर्ग, आर्थिकदृष्ट्या प्रबळ वर्ग, रूढी, परंपरा, जात, धर्म जितके कारणीभूत आहेत, तितकेच कारणीभूत परस्परविरोधी व्यवस्था, परस्परांमधील हेवेदावे, वाद-तंटे ही या परिस्थितीला कारणीभूत आहेत परस्परांमधील एकी, एकजूट, एकमेकांबद्दलचा विश्वास, प्रेम अधिकाधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला गेला नाही. याबाबत विचार करणे आवश्यक आहे. जणू हा विचार व्यक्त करण्यासाठी 'आवळा आताही मुठ' ही कविता वामनदादा यांनी लिहिली असे जाणवते.

नाही आता तात आपुला
नको रिकामा हात आपुला
करू न कोणी घात आपुला
अशी असावी जूट...
भले आपुले मुठीत आहे
एक दिलाच्या जुटीत आहे



Scanned with CamScanner

नाश आपुला फुटीत आहे
बाकी सारे झूट..

परस्परांमध्ये प्रेमाचे, स्नेहाचे बंध, संबंधनिर्माण होऊन नवी व्यवस्था, नवी रचना, नवे अवकाश निर्माण व्हायला हवे. यातून समाजतला प्रत्येक घटक आनंदी, सुखी, आयुष्य जगेल. यासाठी प्रामुख्याने महापुरुषांनी सांगितलेला विचार आचरणात आणणे आवश्यक आहे. विषेशतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, बंधुता, मानवता, न्याय या सर्वांचा विचार करून समाजामध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण होईल, यासाठी अविरत प्रयत्न केले. हा विचार अमलात आणून नवसमाजव्यवस्था निर्माण होणे काळाची गरज आहे, असा आशावाद व्यक्त करणाज्या वामनदादा कर्डक यांच्या सर्वच रचना समाज परिवर्तनासाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच प्रा. गौतम गायकवाड यांनी वामनदादांच्या गीतांचे महत्त्व विषद करतमा म्हटले आहे की, वामन कर्डक यांची गीते ही दलित चळवळीबरोबर विकसित झालेली आहेत. समाज जीवनात होणाऱ्या उलथापालथीची नोंद करीत ती प्रवास करतात. ही गीते बदलत जाणाऱ्या चळवळीची गाणी आहेत, मग ती नामांतर चळवळ असो, गायरान जंगलातील जमिनी चळवळ असो, एक गाव एक पाणवठा असो, मंडल आयोग असो, महिला आरक्षण चळवळ असो, अशा विविध प्रसंगावर भेदक भाष्य वामनदादानी केले आहे. 'तर प्रा. अविनाश डोळस यांनीही वामानादादांच्या कार्य, व्यक्तिमत्वाचे मूल्यमापन करताना म्हटले आहे की, 1970 पर्यंत वामनदादा म्हणजे आंबेडकरी समूहाच्या, स्वतःच्या मनातील भाव-भावना, दुःख, आनंद व्यक्त होणारा मुखडा बनला. ज्यांनी बाबासाहेबांना पाहिले नाही, अशा तरुण पिढीला तर तो बाबासाहेबांच्या विचारांचा व कृतीचा इतिहास सांगणारा भाष्यकार मिळाला

एकंदरपणे असे म्हणता येते की, दलित चळवळ, दलित साहित्य, दलित समाज यांच्या उन्नतीसाठी गीत-कवितांच्या माध्यमातून प्रामाणिकपणे कार्य करतानाच लोककवी वामनदादा कर्डक यांनी समस्त माणूस, मानवी व्यवस्था हीच जणू माणुसकी, मानवता, बंधुता, या मुल्यांचा कायमस्वरूपी स्वीकार करून जगली,वागली, नांदली पाहिजे अशी व्यापक भूमिका मांडून एक उत्तम, संवेदनशील कवी, गीतकार, गायक, मानवतावादी साहित्यिक म्हणून तमाम जनतेच्या मनात कायमस्वरूपी घर करण्यात कमालीचे यशस्वी ठरले आहेत, असे म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ:**

1. प्रा. गौतम गायकवाड, 'लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांचा आस्वाद, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
2. गायकवाड माधवराव, जाधव सागर, संपा. 'महाकवी वामनदादा कर्डक समग्रवांगमय' खंड.२ अलोक संबोधि प्रकाशन, यवतमाळ.
3. डॉ. जोंधळे, प्रा. केशव वसेकर, 'गीत वामनाचे' प्रतिभास प्रकाशन, परभणी.

◆◆◆◆◆

Scanned with CamScanner

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक
# विशेषांक

Scanned with CamScanner

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati

Website – www.aadharsocial.com Email – aadharsocial@gmail.com.

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 20 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्ये डॉ.आर.व्ही. मोरे | 74 |
| 21 | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे | 78 |
| 22 | यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचे महत्त्वपूर्ण योगदान डॉ.ज्योती रामराव रामोड | 82 |
| 23 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान सौ.सुगंधा परेश जाधव | 85 |
| 24 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सहकार विषयक विचार डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे | 89 |
| 25 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका प्रा.डॉ.देवर्षी मुकुंद अरविंद | 92 |
| 26 | यशवंतराव चव्हाण यांच्या अर्पणपत्रिकेतील वेणूताई विषयीची कृतज्ञता प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 99 |
| 27 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान प्रा.मनोज बबनराव देवकर | 102 |
| 28 | राजकीय सामाजिकरणातून घडलेले नेतृत्व – यशवंतराव चव्हाण प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत | 105 |
| 29 | व्दैभाषिक राज्यातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान प्रा.सांगळे भाऊसाहेब खंडु | 109 |
| 30 | यशवंतराव चव्हाणांचे ग्रामिण सामाजिक विकासामधील योगदान प्रा.बी.एच.चौगुले | 112 |
| 31 | यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य सचिन सहादू घायतडके | 117 |
| 32 | 'यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक क्षेत्रातील कार्य' प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी | 120 |
| 33 | महाराष्ट्राचे भाग्यविधाता मा. यशवंतराव चव्हाण डॉ संजय गोपाळराव ठवळे | 124 |
| 34 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य एक अभ्यास डॉ.जयदीप रा.सोळुंके | 128 |
| 35 | यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वावर भारतीय स्वातंत्र्य लढयाचा प्रभाव प्रा. डी. एन. रिठे | 133 |
| 36 | यशवंतराव चव्हाण यांची रसिकता व साहित्य चिंतन प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 136 |
| 37 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान डॉ.शिवाजी सोमला पवार | 143 |
| 38 | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक व आर्थिक विचार डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम | 149 |
| 39 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान डॉ. संजय सागरु सपकाळ | 153 |




10/189

Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 299 (CCXCIX )

ISSN : 2278-9308

July, 2021

# यशवंतराव चव्हाण यांची रसिकता व साहित्य चिंतन

**प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे**

मराठी विभाग प्रमुख,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

मो.नं.९८२२६७३६६०

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, धुरंधर राजकारणी, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, कर्तव्यदक्ष प्रशासक, संवेदनक्षम माणूसप्रेमी असे विविध व्यक्तिमत्वाचे पैलू असणारी व्यक्ती म्हणजे मा. यशवंतराव चव्हाण. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक जडणघडणीत थोर नेते मा. यशवंतरावजी चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी एका गरीब अशिक्षित शेतकरी कुटुंबात झाला. यशवंतरावांच्या बालपणीच वडिलांचे छत्र हरपल्यामुळे यशवंतरावांची जडणघडण झाली ती आई विठाबाई यांच्या सहवासात आणि देवराष्ट्र या त्यांच्या मामाच्या गावी. कोणताही राजकीय वारसा नसताना यशवंतरावांनी स्वकर्तुत्वाच्या जोरावर आपला राजकीय प्रवास चढत्या क्रमाने केला. राज्याची व केंद्राची अशा दोन्ही कारकीर्द त्यांनी यशस्वीपणे पेलल्या. यशवंतराव चव्हाणांची राजकीय, सामाजिक, आर्थिक , शैक्षणिक या सर्व मुलभूत घटकावरील विचारसरणी मार्गदर्शक ठरली. त्यांनी अनुभवलेल्या राजकीय , सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या विचारांवर असलेला दिसून येतो. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या विचारातून, निर्णयातून आणि कर्तुत्वाने समृद्ध महाराष्ट्र घडविला.

शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक दृष्टीकोनातून न बघता शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे. मानवी भांडवल हि राष्ट्राची संपत्ती असते. मानवी साधन संपत्तीशिवाय राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही. मानवी प्रगती हि शिक्षणात सामावलेली आहे. महाराष्ट्रात औद्योगिक प्रगती, आर्थिक विकास जितका महत्वाचा तेवढाच शिक्षणाचा प्रसार आणि विस्तार होणे हे महत्वाचे आहे असे शिक्षणाबद्दल यशवंतराव चव्हाणांचे विचार होते.

यशवंतराव चव्हाणांनी समतोल प्रादेशिक विचार, औद्योगिकीकरणाचा विचार, कृषी उद्योगांचा विस्तार, शिक्षणाचा विस्तार, समाजवाद , आर्थिक समस्यांशी संबंधित विचार, आर्थिक विकासाबाबत जे काही विचार त्यांनी मांडलेले आहेत त्यावरून त्यांचा आर्थिक दृष्टीकोन परिपक्व झालेला दिसून येतो. त्यामुळे आर्थिक विकासाविषयीचे त्यांनी मांडलेले विचार महत्वाचे ठरतात. थोडक्यात यशवंतराव चव्हाणांनी मांडलेले आर्थिक विचार प्रामुख्याने सर्व प्रकारच्या आर्थिक घटकांना एक नवी दिशा देणारे व आर्थिक समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी आणि सर्वस्पर्शी होते. असामान्य बुद्धिमत्ता, चारित्र्य संपन्न राजकारणी, सामान्य जनतेविषयी आत्मीयता यातून पदाला प्रतिष्ठा मिळवून देणारा नेता हि त्यांनी समाजमनातील खरी ओळख आहे. एकंदरीतच यशवंतराव चव्हाण यांचे ध्येयवादी, कुशल नेतृत्व, विधायक मार्गदर्शन सर्वांना प्रेरणादायी ठरते.



Scanned with CamScanner

- संशोधनाची उद्दिष्ट्ये :
  1. यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे.
  2. यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
- संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी मुख्यत्वे दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी विविध ग्रंथ, एम.फिल., पीएच.डी. चे प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध, विविध वर्तमानपत्रे , साप्ताहिके,मासिके, संदर्भ ग्रंथ, विविध संकेत स्थळे या द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

- यशवंतराव चव्हाणांचे शिक्षण विषयक विचार:

यशवंतराव चव्हाणांना समृद्ध महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार म्हटले जाते. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करताना त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. आजच्या स्पर्धात्मक युगातही त्यांचे शिक्षणविषयक विचार अत्यंत परिणामकारक व प्रभावी असे आहेत. त्यांनी कृषी शिक्षणाविषयी, उच्च शिक्षणाविषयी, तांत्रिक शिक्षणाविषयी, सैनिकी शिक्षणाविषयी, मुलभूत शिक्षणाविषयी मौलिक विचार मांडले आहेत.

1. कृषीविषयक शिक्षण

कृषी शिक्षणाविषयी यशवंतराव चव्हाणांचे विचार व्यापक स्वरूपाचे आहेत. त्यांच्या मते, कृषी शिक्षणाची आपल्या देशात नितांत आवश्यकता आहे. शेतकरी आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शिक्षणाने शहाणे केल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्याला कृषिविषयक शास्त्रीय ज्ञान असणे आवश्यक आहे. याचाच अर्थ आधुनिक पद्धतीने शेती करणे आणि त्यासाठी जे काही शेतीचे शास्त्र आहे त्याचा अभ्यास करणे व ते समजावून घेणे हे अत्यंत गरजेचे आहे. कारण शेती हि ज्ञान व विज्ञानावर आधारित असते. शेतीच्या क्षेत्रात ज्ञानाची विशेष गरज आहे. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांनी कृषी विद्यापीठांसारख्या तंत्रशुद्ध शेतीविषयक प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था उभारल्या. यशवंतराव चव्हाणांच्या मते, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला उच्चशिक्षणाचा अधिकार आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना उच्चशिक्षण गावात , तालुक्याच्या ठिकाणी मिळाले पाहिजे याबाबत ते आग्रही होते. त्यासाठी त्यांनी आग्रहाने शिवाजी विद्यापीठ व मराठवाडा विद्यापीठाची स्थापना आपल्या कार्यकाळात केली.

सैनिकी शिक्षण :

यशवंतराव चव्हाणांच्या मते, सैनिकी शिक्षण हे स्वहित व राष्ट्रहिताच्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. त्यामुळे तरुण पिढीच्या जीवनात शिस्त, आज्ञाधारकपणा, कामाविषयीची निष्ठा, वक्तशीरपणा हे गुण विकसित होतात. त्यामुळे तरुणांना महाविद्यालयीन शिक्षणापासूनच सैनिकी प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना देश रक्षणाचे शिक्षण मिळाले नाही तर या विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने स्वइच्छेने एन.सी.सी. चे शिक्षण घेण्यासाठी पुढे आले पाहिजे याबाबत ते आग्रही होते. त्यामुळे तरुण वर्गामध्ये चारित्र्य, बंधुभाव, आदर्श सेवाभाव,नेतृत्व गुण यांची वाढ होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी यशवंतराव चव्हाणांनीभारतातील पाहिले सैनिकी स्कूल सातारयात सुरु केले.



Scanned with CamScanner

3. मातृभाषेतून शिक्षण :

यशवंतराव चव्हाणांनी भारतात असणाऱ्या त्रिस्तरीय शिक्षण पद्धतीचा सांगोपांग विचार केला. मातृभाषा हेच शिक्षणाचे मध्यम असावे असा ठाम विचार त्यांनी मांडला. याचे कारण म्हणजे त्यांच्या मते, परकीय भाषेत शिक्षण घेतल्यामुळे माणसाची बौद्धिक वाढ खुंटते. अशा व्यक्ती स्वदेशापासून दूर जातात. त्यामुळे प्रांतिक भाषांना शिक्षणात महत्व द्यावे याबाबत त्यांचे विचार ठाम होते. शासनाने सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे यासाठी त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. शिषण प्रसाराचा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविण्यासाठी त्यांनी ई.बी.सी. सवलत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क माफी, शिष्यवृत्ती, ग्रामीण भागात शाळा -कॉलेज सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देणे असे विविध कार्यक्रम शिक्षणाच्या प्रसारासाठी व विस्तारासाठी त्यांनी राबविले.

यशवंतराव चव्हाणांच्या मते, देशाच्या औद्योगिक प्रगती इतकेच शैक्षणिक प्रगती महत्वाची आहे. शिक्षण म्हणजे फक्त सामाजिक गरज म्हणून नाही तर ते आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन आहे. देशातील मानवी संपत्ती हि कौशल्यपूर्ण असेल तरच आर्थिक विकास होऊ शकतो व पर्यायाने देशाचा विकास होऊ शकतो. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांनी शैक्षणिक क्षेत्रात कृतीशील प्रयत्न केलेले दिसून येतात.

- यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार:

यशवंतराव चव्हाणांच्या मते, शैक्षणिक प्रगती हे आर्थिक विकासाचे साधन आहे. आर्थिक विकासाबाबत यशवंतराव चव्हाणांचे विचार स्पष्ट होते. त्यांच्या मते, आर्थिक विकास घडून येण्यासाठी नियोजन अतिशय महत्वाचे असते. कारण एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक, राजकीय पद्धती कोणतीही असली तरी त्या देशाने आर्थिक विकासातील नियोजन करणे आवश्यक असते आणि असे झाले नाही तर त्या देशाला आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे शक्य होणार नाही. विशेषतः अविकसित देशाला नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करणे अत्यंत आवश्यक आहे. थोडक्यात, यशवंतराव चव्हाणांच्या मते, नियोजन केल्याशिवाय आर्थिक विकास साधने अवघड आहे. त्याचप्रमाणे आर्थिक विकास करत असताना देशामध्ये निर्माण झालेली विषमतेची दरी कमी करणे आवश्यक आहे. थोडक्यात, समतोल आर्थिक विकास घडून यावा हे त्यांचे ठाम मत होते.

यशवंतराव चव्हाणांनी आर्थिक विकासासाठी कृषी उद्योगांच्या विकासाला प्राधान्य दिलेलेल दिसून येते. कृषी क्षेत्रात ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत जसे कि, अन्नधान्याचा प्रश्न , भूमिहीन शेतमजुरांचा प्रश्न, ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर इ. समस्या केवळ उपाययोजना करून सुटणाऱ्या नाहीत. या समस्या सोडविण्यासाठी एकाच मार्ग आहे ते म्हणजे भारतात कृषी उद्योगांचा विकास करणे. कृषी उद्योगांच्या आधारे आर्थिक विकास साधणे.

- निष्कर्ष :

1. यशवंतराव चव्हाण यांच्या मते, शिक्षण हे आर्थिक विकास साध्य करण्याचे एक प्रभावी साधन आहे. अविकसित देशात मुबलक परमात उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाला सधन करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरे कोणते साधन नसल्यामुळे मानवी भांडवलाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे.
2. शिक्षणाविषयी आधुनिक व वास्तव विचार यशवंतराव चव्हाणांनी मांडले. त्यांच्या मते, समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण होय.



Scanned with CamScanner

3. यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाच्या अनिवार्यतेबरोबरच त्यांनी शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्यावर भर दिला.
4. आर्थिक विकासाचे पायाभूत घटक म्हणजे शेती, औद्योगिकीकरण याबाबत यशवंतरावांनी मौलिक विचार मांडले.आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी कृषी शिक्षणाची गरज, शेतीचे आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण इ. सारख्या शेतीच्या विकासासाठी मौलिक शिफारशी केल्या. थोडक्यात, त्यांनी शेतीविषयक प्रश्नांना शास्त्रीय आधार देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे रोजगारनिर्मिती व देशाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकरणात वाढ करण्याचे विचार मांडले. समतोल औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिकीकरणाचे महत्व विशद केले.
5. यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार समाजवाद, शेती, औद्योगिकीकरण या घटकांना बळकटी देणारे होते. त्यामुळेच यशवंतरावांचे विचार अर्थव्यवस्थेला समृद्ध करण्यास उपयुक्त ठरणारे आहेत.
6. यशवंतराव चव्हाणांना कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी आपला राजकीय प्रवास चढत्या क्रमाने केला. त्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत जनतेच्या तसेच देशाच्या विकास व समृद्धीच्या दृष्टीकोनातून महत्वाचे योगदान दिले.

संदर्भ :

1. भोरे भरत,(२०१५) यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय व सामाजिक विचार एक अभ्यास. पीएच.डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ
2. चव्हाण यशवंतराव " सह्याद्रीचे वारे" प्रकाशक विनोदराव, संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी १९६२.
3. चव्हाण यशवंतराव "युगांतर" अ. अं. कुलकर्णी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, मे. १९७०
4. कांबळे उत्तम, " यशवंतराव चव्हाण नाव महाराष्ट्राचे शिल्पकार", सकाळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १ मे२०१२, पृ.४१.
5. उढान उल्हास,(२०१५), यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण : शैक्षणिक विकासाचा विशेष संदर्भ. पीएच.डी. शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
6. www.google.com.
7. www.eSakal.com

Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## August Special Issue II



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Prin.Dr.Shivdas Shirsath

Scanned with CamScanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | अजय मारोती पाटील | 1-4 |
| 2 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | श्री.काचगुंडे हनुमंत<br>प्रा. डॉ.दिलीप ज्ञानोबा भिसे | 5-9 |
| 3 | जागतिकीकरण व आदिवासी लोकगीते | श्री.भगत किशोर बाबुराव<br>प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | 10-13 |
| 4 | जागतिकिकरण व आदिवासी लोकनृत्य | प्रा. डॉ.पंजाब शेरे | 14-17 |
| 5 | "मराठी लोकसाहित्यातील गोंधळ एक लोककला" | प्रविण शंकर सोलनकर | 18-22 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.राजू मोतेराव | 23-27 |
| 7 | पारपांरिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेंचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.संजय सुरेवाड | 28-33 |
| 8 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | सारिका संदिपान फरांडे | 34-37 |
| 9 | जागतिकीकरण आणि दलित कविता | शारदा किशन धामणगांवकर | 38-41 |
| 10 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककथा | प्रा.डॉ.शोभा डहाळे | 42-45 |
| 11 | जागतिकीकरण आणि गोमंतकीय आदिवासी जीवन | डॉ.स्नेहा सुवास प्रभु महांबरे | 46-52 |
| 12 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.सुपारे यु.पी. | 53-58 |
| 13 | आदिवासी बोलीभाषा | डॉ.विठ्ठल केदारी | 59-61 |
| 14 | स्वातंत्र्याच्या क्षितिजावर उगवलेला शौर्यतारा : भगवान बिरसा मुंडा | डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे | 62-66 |
| 15 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा. पंडित मोरे | 67-71 |
| 16 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वाल्मिक शंकर आढावे | 72-78 |
| 17 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली : आव्हाने व उपाय | प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ | 79-87 |
| 18 | मराठी आदिवासी कविता आणि बोली | प्रा.डॉ.गोविंद काळे | 88-91 |
| 19 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वसुमती पी.पाटील | 92-95 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.लालबा दुमटकर | 96-100 |
| 21 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा.डॉ.देविदास खोडेवाड | 101-104 |
| 22 | वैश्वीकरण और आदिवासी लोक–कथा: हिंदी साहित्य के संदर्भ में | अशोक बाळू पाटील | 105-109 |
| 23 | आदिवासी लोकगीत और जनजागरण | वनिता कुमारी डोडियार | 110-113 |


Scanned with CamScanner

# जागतिकीकरण आणि आदिवासी बोली

10/119

**श्री.काचगुंडे हनुमंत,**
एम. ए. मराठी, बी. एड्.

**प्रा. डॉ.दिलीप ज्ञानोबा गिरी**
मराठी विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रस्तावना :**

भारतात 1990 च्या सुमारास उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाला सुरुवात झाली. विशेषतः जागतिकीकरणामुळे मानवी जीवनात, सामाजिक, सांस्तिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातआमूलाग्र बदल घडून आले, समाज सुधारणेला वाव मिळाला, एकप्रकारे परिवर्तनास सुरुवात झाली. अशा या जागतिकीकरणाची व्याख्या इथे पाहणे संयुक्तिकहोईल. ''जागतिकीकरण म्हणजे जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक,आर्थिक,औद्योगिक, व्यापारी,सांस्तिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' या व्याख्येवरून लक्षात येते की, जागतिकीकरणामुळे एखादे नव्हेतर जवळपाससर्वच क्षेत्रे प्रभावित झालीआहेत. आपसुकपणे आदिवासी समाज, संस्ती, भाषा हे घटक जागतिकीकरणाच्या, नागरीकरणाच्या परिघापासून अलिप्त राहणे शक्य नव्हते. जरी आदिवासी जमात ही डोंगरात–दऱ्याखोऱ्यात,जंगलात राहणारी जमात होती, आहे प्रत्यक्ष प्रत्यक्ष नागर संस्तीपासून कोसो दूर असलेल्या आदिवासी समाजाला त्यांच्या भाषेला संस्कृतीला आधुनिकीकरण, जागतिकीकरणाचा स्पर्श लाभला. त्यांची बोलीभाषा,त्यांचे राहणीमान,त्यांचे सण–उत्सव एकूणच त्यांची संस्ती नागर संस्तीपेक्षा वेगळी आहे. आदिवासी जमातीने स्वतः जीवन जगण्याची कला विकसित केली, म्हणूनच आपण त्यांना 'निसर्गपूजक' असे म्हणतो.

**जागतिकीकरण आणि आदिवासी बोली :**

भाषा तज्ज्ञांच्या अंदाजानुसार अस्तित्वात असलेल्या जवळजवळ सहा हजार भाषांपैकी बाविसाव्या शतकापर्यंत दोन हजार भाषादेखील टिकणार नाहीत. तीन हजार भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचा युनेस्कोचा अहवाल जाहीर झालेला आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासीसह सर्व उपेक्षितसमाजघटकांना सोबत घेऊन एक नवी सांस्तीक क्रांती घडविण्याच्या महान प्रकल्पाचा भाग म्हणून आदिवासी भाषा व बोलीच्या विशेष अभ्यासाचे प्रयत्न उभे राहिले पाहिजेत.आपल्या देशामध्ये 1652 मातृभाषा असल्याची नोंद जनगणनेच्याच्या अहवालात घेण्यात आलेली आहे. यापैकी 300 आदिवासी मातृभाषा आहेत .सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी चार भाषिक गटात मोडणाऱ्या भाषा भारतात बोलल्या जातात ,असे निरीक्षण नोंदविले आहे .

१. इंडो–आर्यन

2. द्रविडीयन



Scanned with CamScanner

३.मुडारी

४.तीबेटो बर्मन.

1991 च्या जनगणनेनुसार काही प्रमुख आदिवासी भाषा व बोली बोलणाऱ्या व्यक्तींची संख्या पुढीलप्रमाणे आहे.या संख्येवरून लक्षात येते की, आदिवासी भाषा बोलीभाषा बोलणारा वर्ग आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. यातील बहुतेक भाषांना लिपी नाही मात्र काही भाषांनी रोमन अथवा देवनागरी लिपीचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे या भाषाच्या माध्यमातून त्या त्या आदिवासी समाजाची लोकसंस्.ती जीवन पद्धती आचारविचार यांना अक्षर रूपात स्थान मिळाले आहे. मात्र ज्या भाषांना लिपी नाहीत अशा भाषा आजही मौखिक स्वरूपात आपले अस्तित्व टिकून आहेत. मात्र काळाच्या ओघात आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहात या भाषांचे अस्तित्व दिवसेंदिवस काहीसे धूसर होत आहे. त्यामुळे या जागतिकीकरणाच्या काळात या भाषांच्या पुढे व आदिवासी समाजाच्या पुढे आपल्या भाषेचे अस्तित्व, आपली लोकसंस्.ती, जीवनपद्धती टिकवणे अवघड झाले आहे. अशा आदिवासी भाषा बोलणारा समूह व ती भाषा बोलणारी भाषिक संख्या खालील प्रमाणे दिली आहे.

गोंडी 1258883, माडीया 80436,मुरिया 16556,खोंड197732,कोरकू465073,कोया170994,कोलामी 98281,पारधी 33683,मुंडा413894,मुंडारी 861378,संथाली 4915808, भिलोरी 1891109, हलबी 533839,मिशिंग 390583,मिरी 390537,मिझो 537627,पावरा 122078,वडवी 19067,कोई 641662,मनिपुरी 1270038,बोडो 1201957,गारो 671908,खासी 700047,त्रिपुरी 694940, सावरा 273168.

अशाप्रकारे आदिवासीच्या अनेक बोलीभाषा आज अस्तित्वात आहेत. आदिवासी भाषा समूह विश्वव्यापक, अतिप्राचीन व समृद्ध आहे. वयाने मराठीहून निश्चितच मोठा पण दुर्दैवाने दुर्लक्षित व उपेक्षित आदिवासी बोली भाषा व मराठी भाषा यांच्या उगमाचा शोध घेतल्यास प्राचीन कोण? आधी कोण? असे प्रश्न उद्भवतात. डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, "आदिवासीच्या बोलीभाषा शब्दसंपत्तीतिचे आगार आहेत, परंपरेने या संपत्तीचा वारसा आदिवासी साहित्यास लाभला आहे. या शब्दधनाची गुंतवणूक करण्याचे किमान कसब आदिवासी साहित्यिकांनी संपादित केले पाहिजे. आपल्या पूर्वजांनी कमावलेल्याया धनाची राखण करण्याचे दायित्व त्यांनी निभावले पाहिजे. आदिवासींच्या बोली भाषेतील आगळ्यावेगळ्या अनुभवविश्वातील शब्दसामर्थ्याचा गौरव करीत असताना सद्यस्थितीही लक्षात घ्यावी लागते. दुर्दैवाने आदिवासी बोलीभाषांच्या विकासाकडे भाषाशास्त्रज्ञ फारसे गंभीर नाहीत. आणि त्या बोली भाषांचा दैनंदिन व्यवहारात त्या बोलीभाषा त्या बोलीभाषांचा दैनंदिन व्यवहारात जाणीवपूर्वक वापर करणारा वर्ग त्यांना लाभला नाही. किंबहुना सुशिक्षित आदिवासीसमाजाकडूनच या भाषांची उपेक्षा होत आहे." विनायक तुमराव यांनी व्यक्त केलेली खंत रास्त आहे. या सर्व विचारांचा नक्कीच विचार झाला पाहिजे. कारण लाखो वर्षाचा भाषिक इतिहास,



Scanned with CamScanner

शब्दसंग्रह भाषाशैली काही वर्षात नष्ट होत असेल तर ही निश्चितच गंभीर बाब आहे. या सर्वांचे जतन, संकलन करून ठेवणे ही काळाची गरज आहे तसेच आदिवासी समाजाच्या, बांधवांच्या अस्तित्वाची जपणूक करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.

भाषा ही मोठ्या समुदायाकडून वापरली जाते .परंतु बोलीभाषेचा विचार केला असता ही भाषा मर्यादित आणि त्या त्यागटापूरतीच स्वतंत्र बोली असते. त्यामुळे आदिवासी समाजाची बोली भाषा टिकवायची असेल संस्ृती टिकवावी लागेल. त्यासाठी त्या तया समुहातील लोकांनी जाणीवपूर्वक त्या भाषेचा वापर केला तरचतिचे अस्तित्व टिकून राहील अन्यथा त्या आदिवासी समाजातील बोलीभाषा, लोकसंस्ृतीचा नाश व्हायला वेळ लागणार नाही.

आदिवासी जमातीची ज्याप्रमाणे संस्ृती वेगळी आहे. त्याचप्रमाणे आदिवासी जमातीची भाषा, शब्दकळा वेगळ्या आहेत. त्यांची बोलीभाषा वेगळी आहे. परंतु त्यांची स्वतंत्र अशी लिपी नाही. त्यांच्या जीवनातील सर्व व्यवहार याच बोलीभाषेतून केले जातात. आदिवासीचे साहित्य मोठ्या प्रमाणात आहे. परंतु ते मौखिक स्वरूपातच आहे. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत केले जाते. प्रवाहित केले जाते. संस्ृती क्षेत्राला ही आदिवासी जमातीचा मौखिक वारसा लाभला आहे. संगीत, चित्राची थोर परंपरा आदिवासी समाजाने जोपासली आहे. या कलाकारांनी आधुनिक कालखंडात जागतिकीकरणाला आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी लोकांची ही लोककला आजघडीला टॅटू या नावाने ओळखली जाऊ लागली आहे. आज ही फॅशन संपूर्ण जगात सुरू झाली आहे. याचे मूळ आदिवासी जमातीत पाहायला मिळते.

जागतिकीकरणाचा आदिवासी क्षेत्रात शिरकाव होत गेला. जेणेकरून आदिवासीचे जीवन उद्ध्वस्त होण्यास सुरुवात झाली. जागतिक बाजारपेठानी त्यांच्या वाडवस्तीस्थानावर आक्रमणे करून त्यांचा मालकी हक्क संपुष्टात आणला.जंगल ही आदिवासींची मालकीची, हक्काची राहण्याची जागा पण तीच आता नष्ट होऊ लागली.  खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे मुक्त अर्थव्यवस्थेचे मूलतत्त्व बनले. परिणामी शासनाने जंगले ताब्यात घेण्यास सुरुवात केली, पिढ्यानपिढ्या पासुन जंगलात राहणाऱ्या आदिवासींना जंगलाच्या बाहेर काढण्याचा सपाटा सुरु झाला. याचा थेट परिणाम आदिवासी समाज विस्थापित होण्यात झाला.  त्यांनी पोट भरण्यासाठी शहरात आसरा घेतला.तिथल्या संस्ृतीशी त्यांना जवळून घेणे भाग पडले. परिणामी आदिवासी समाजाने स्वतःची संस्ृती व भाषा बाजूला सारत पोट भरण्यासाठी, शहरीकरणाची, जागतिकीकरणाची भाषा स्वीकारली. याचा थेट परिणाम त्यांच्या भाषेवर, बोलीभाषेवर, दैनंदिन जगण्यावर झाला.

दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे महत्व वाढले. शिक्षण दारोदार पोहचले. तळागाळातील समाज शिकू लागला. जो समाजशिक्षणापासून पिढ्यानपिढ्या वंचित होता, तोशिक्षणाच्या



Scanned with CamScanner

प्रवाहात आला. शिक्षणाची भाषा ही प्रमाण भाषा होती, असते. त्याही पुढे जात जागतिकीकरणामुळे इंग्रजी सारख्या परक्या भाषेला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत गेले. याचाही प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम अन्य समाज घटकासोबत आदिवासी समाजावर त्यांच्या भाषेवर झाला. तेव्हा अशा आदिवासींच्या बोली नष्ट होण्यापाठीमागे जागतिकीकरणासोबतच अन्य कारणेही आहेत. त्यांचा ढोवळ विचार खालीलप्रमाणे...

1. जागतिकीकरणामुळे आदिवासींच्या जीवन व्यवहारात दळणवळणाची साधने वाढली. प्रवासाचे प्रमाण वाढले. यादरम्यान अनेक समाज बांधवांशी, वेगवेगळ्या भाषिकांची संपर्क वाढू लागला. परिणामी भाषिक व्यवहार करताना भाषा संकर अधिकाधिक वाढत गेला. याचाही थेट परिणाम त्यांच्या मूळ भाषेवर, बोलीभाषेवर झाला, असे दिसून येते.

2. खूप कमी आदिवासी भाषांना, बोलींना रोमन अथवा देवनागरी लिपीसारखी लिपी आहे मात्र बहुसंख्य आदिवासींकडे स्वत:ची लिपी नसल्याने त्या भाषेचे अस्तित्व संकटात असल्याचे दिसून येते. त्यामुळे काळाच्या ओघात अथवा जागतिकीकरणाच्या रेट्यात या भाषा नष्ट होतील की काय, अशी भीती वाटते आहे.

3. शहरापासून दूर अशा निसर्गाच्या सानिध्यात अथवा जंगलामध्ये आदिवासी समाजाचा मूळ निवास होता. त्या ठिकाणी आपला उदरनिर्वाह चालवणे, दैनंदिन जगणे पार पाडणे. आपली म्हणून एक संस्‍ती, जीवन पद्धती चालवणे हे आदिवासींच्या जगण्याचे मुख्य सूत्र होते. परंतु पुढील काळात जागतिकीकरण यासारखे आव्हान त्यात भर म्हणूनशासनाच्या उदासीन धोरणातून आदिवासींना जंगलातून बाहेर काढण्याचा प्रयत्न झाला. जंगल ही सरकारची मालमत्ता म्हणून घोषित झाली. परिणामी रोजगाराची प्रश्न समस्या निर्माण झाली परिणामी रोजगारासाठी पोट भरण्यासाठी आदिवासी समूह मोठ्या संख्येने शहराकडे जाऊ लागले. शहरात असरा शोधू लागले. मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करण्याचा ते प्रयत्न करू लागले. यातून नाईलाजास्तव त्यांना आपल्या मूळ भाषेचा बोलींचा त्याग करून शहरातील भाषा, त्या त्या व्यवसायातील भाषा स्वीकारणे भाग पडले. याचा मोठा परिणाम त्यांच्या भाषा व बोलींच्या अस्तित्वासंदर्भात निर्माण झाला .

4. जागतिकीकरण, आधुनिकीकरण, यांत्रिकीकरणातून निर्माण झालेल्या भौतिक सुखवादाच्या लालसेतून नव्या जगाची ओळख झाली. नवे जगणे अंगवळणी पडले. त्यातून नवीन भाषेचा स्वीकार अपरिहार्य ठरला. परिणामी आदिवासी भाषा, बोलीभाषा, आदिवासी संस्‍ती नष्ट होण्याची शक्यता अध‍िक वाढली.आजच्या तरुण पिढीला त्यांच्या बोलीभाषेतील हुम्मार–सोमवार, मुंगलवार –मंगळवार,बुध‍वार– बुधवार, विस्तरवार–गुरुवार ,हुक्करवार–शुक्रवार, तंवर–शनिवार ,हीतवार– रविवार, या शब्दाची ओळख असणे आवश्यक आहे.परंतु अशी बोली भाषेतील शब्द त्यांना येत नाहीत. त्यामुळेच काही वर्षात या बोली नष्ट होतील की काय?असा प्रश्न निर्माण झाला आहे.जागतिकीकरण एका



Scanned with CamScanner

बाजूने झपाट्याने औद्योगिकरणाचे जाळे पसरवत आहे. तरी देखील आदिवासी समाज स्वतःचे अस्तित्व टिकून आहे. त्यांच्या मूळ संस्तीचे जतन सध्या तरी होत आहे. परंतु येणारी नवतरुण पिढीने त्याचे जतन केले तरच तिचे अस्तित्व अबाधित राहील.

5. शिक्षणाचा प्रसार, प्रचार, आरक्षण धोरण नोकरीचा बॅकलॉग, रोजगाराची संधी यातून हिंदी, इंग्रजी भाषेला महत्व आले. अनेक आदिवासी बांधवांनी उच्च शिक्षण घेऊन नोकर्‍यांमध्ये प्रवेश केला या शैक्षणिक प्रवाहात आल्यामुळे इंग्रजी भाषा व इंग्रजीतील ज्ञानाची ओळख होऊन नवीन भाषेच्या संपर्काने आदिवासी आपली बोलीभाषा विसरत चालला आहे.

अशा अनेक कारणामुळे आदिवासी बोलींच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण होताना दिसून येत आहेत.जागतिकीकरणामुळे समाजाचा, देशाचा विकास होतोय पण काही आवश्यक बाबींचा, जुन्या विचार, संचिताचा, भाषा–संस्ती, मानवी मूल्य, जीवन विषयक मूल्य यासारख्या बाबींचा टिकाव होणेही गरजेचे आहे. ही बाब विसरता कामा नये. हे बाब त्या त्या समूहाने भाषिकांनी आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे त्यामुळे आज घडीला जागतिकीकरण आधुनिकीकरण खाजगीकरण यासारख्या गोष्टींचा सामना करतानाच जे टिकणे आवश्यक आहे त्याविषयी विचार होणे चिंतन होणे गरजेचे आहे यास पर्याय नाही

**संदर्भ ग्रंथः**


1. डॉ.गोविंद गारे,सातपुड्यातील भिल्ल, ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे– 30.
2. डॉ. माहेश्वरी गावित,आदिवासी लोक परंपरा,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद मार्च– 2015.
3. प्रा .डॉ .पुष्पा यशवंत गावित, आदिवासी संस्ती भाषा आणि साहित्यअथर्व पब्लिकेशन,जळगाव ऑक्टोबर –2014.
4. संपादक, डॉ.प्रमोद मुनघाटे,आदिवासी मराठी साहित्य :स्वरूप व समस्या, प्रकाषक अरूण पारगांवकर, पुणे.
5. डॉ. विनायक तुमराम,आदिवासी साहित्य :स्वरूप व समस्या, विजय प्रकाशन, नागपूर.
6. माहेश्वरी गावित,जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.


◆◆◆

Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## August Special Issue II



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Prin.Dr.Shivdas Shirsath

Scanned with CamScanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | अजय मारोती पाटील | 1-4 |
| 2 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | श्री.काचगुंडे हनुमंत<br>प्रा. डॉ.दिलीप ज्ञानोबा भिसे | 5-9 |
| 3 | जागतिकीकरण व आदिवासी लोकगीते | श्री.भगत किशोर बाबुराव<br>प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | 10-13 |
| 4 | जागतिकिकरण व आदिवासी लोकनृत्य | प्रा. डॉ.पंजाब शेरे | 14-17 |
| 5 | ''मराठी लोकसाहित्यातील गोंधळ एक लोककला'' | प्रविण शंकर सोलनकर | 18-22 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.राजू मोतेराव | 23-27 |
| 7 | पारपांरिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.संजय सुरेवाड | 28-33 |
| 8 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | सारिका संदिपान फरांडे | 34-37 |
| 9 | जागतिकीकरण आणि दलित कविता | शारदा किशन धामणगांवकर | 38-41 |
| 10 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककथा | प्रा.डॉ.शोभा डहाळे | 42-45 |
| 11 | जागतिकीकरण आणि गोमंतकीय आदिवासी जीवन | डॉ.स्नेहा सुवास प्रभु महांबरे | 46-52 |
| 12 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.सुपारे यु.पी. | 53-58 |
| 13 | आदिवासी बोलीभाषा | डॉ.विठ्ठल केदारी | 59-61 |
| 14 | स्वातंत्र्याच्या क्षितिजावर उगवलेला शौर्यतारा : भगवान बिरसा मुंडा | डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे | 62-66 |
| 15 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा. पंडित मोरे | 67-71 |
| 16 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वाल्मिक शंकर आढावे | 72-78 |
| 17 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली : आव्हाने व उपाय | प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ | 79-87 |
| 18 | मराठी आदिवासी कविता आणि बोली | प्रा.डॉ.गोविंद काळे | 88-91 |
| 19 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वसुमती पी.पाटील | 92-95 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.लालबा दुमटकर | 96-100 |
| 21 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा.डॉ.देविदास खोडेवाड | 101-104 |
| 22 | वैश्वीकरण और आदिवासी लोक–कथा: हिंदी साहित्य के संदर्भ में | अशोक बाळू पाटील | 105-109 |
| 23 | आदिवासी लोकगीत और जनजागरण | वनिता कुमारी डोडियार | 110-113 |


Scanned with CamScanner

# जागतिकीकरण व आदिवासी लोकगीते

संशोधक
**श्री.भगत किशोर बाबुराव**

मार्गदर्शक
**प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे**
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

जागतिकीकरणाची सुरूवात खऱ्या अर्थाने आर्थिक क्षेत्रात झाली. या आर्थिक बदलातून अनेक सामाजिकसांस्कृतिक व राजकिय बदल घडून एक नवीन व्यवस्था अस्तित्वात आली आहे.

जागतिकीकरणही एक सामाजिक प्रक्रिया आहे. तिच्या अंतर्गत सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेवर असणारे भौगोलिक प्रभाव दूरहोतात आणि भौगोलिक सीमा अनावश्यक आहेत याची जाणिव लोकांनाहोत असते.

**जागतिकीकरण म्हणजे :-** विभिन्न लोक आणि जगातील विभिन्न क्षेत्रामध्ये वाढत असणारी परस्परिकता आणि परस्पर निर्भरता म्हणजे जागतिकीकरणहोय. भारतामध्येसाधारणत: १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरूवात

झाली या जागतिकीकरणामुळे मानवी विकासाला पर्यायाने समाज परिवर्तनाला दिशा मिळाली असे म्हणता येईल. तसेच सामाजिक व सांस्कृतीक जीवनावर विशेष प्रभावित झालेले दिसते.

आदिवासी हा शब्द आद्य म्हणजे सुरुवातीपासुनचा, मुळचा या अर्थाने येतो. आदिवासी साहित्य व निसर्ग यांचा अन्योन्य संबंध आहे. कारण अरण्यात राहणारे, विशिष्ट भाषा बोलणारे, विशिष्ट जीवन पध्दती, परंपराने नटलेला जंगल दरी खोऱ्यात जीवन जगत असताना आपली धार्मिक व सांस्कृतिक मुल्ये जोपासणारा परंतु निरिक्षर असलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय. त्यांना भारतीय घटनेनुसार अनुसुचित जमाती म्हणुन ओळखले जाते. आदिवासी साहित्याला मौखिक परंपरा आहेही मौखिक परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडेहस्तांतरित झालेली दिसते.

**लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे डॉ. कमलाबाई देशपांडे यांच्या मते -**

"जसेसुचलेतसे रचले.
रूचले म्हणूनतसेठसले"

ब्रिटीकालीन गटे- लोकगीत सदैव टवटवीत असतात.कारण की निसर्ग प्रेरणेतून व मानवी जीवनातून आली आहेत.

**लोकगीत म्हणजे -**

१. अज्ञात व्यक्तीने रचलेले व समाजात मौखिक परंपरेनेसंक्रमित होणारेसंगीत

२. लोकगीत नवेही नसते व जूनेही नसते वनातील वृक्षाप्रमाणे त्याची मूळे भूतकाळात खोलवर रूजवलेली असतात पण तिला नित्य नूतन शाखा पुष्प फळे येतात. अशी गीते म्हणजे लोकगीते - व्ही विलियम्स.



Scanned with CamScanner

लोकगीतांची परंपरा बदलत्या काळाबरोबर नवा व जुना बदल आजही स्वीकरताना दिसते.विविध प्रसंगी म्हटली जाणारी आदिवासी जमातीचे गीते.

१. कौटुंबिक गीते

२. विधि गीते

३. फेरावरची गीते

४. देवा विषयीची गीते

५. कृषी विषयक व श्रम गीते

आदिवासी लोकगीते -

"डो टोनेम देवाके राजा रे राम रे || धृ||
डो धरतीय समन केलीजको, राजा रे राम रे
डो खेडा मुखा के लीजको, राजा रे राम रे
डो राम लक्ष्मण के लीजको, राजा रे राम रे"

हे आदिवासी लोकगीते कोरकू जमातीचे असून त्यांचा सर्वात महत्वाचा सण म्हणजेहोळीहा आहेहोळीचा उत्सव प्रसंगीसामूहिकनृत्य करून आनंद व्यक्त करतात.या सनाला देवाने हजर रहावे अशी आदिवासी प्रार्थना करतात.

"हौसीनी नवरा केला
खर्च बाई केला
दारूबाज पदरी पडला
काळणाच्या ओटीवर बाई गेला,
पहिलीची दारू त्यानं प्याला"

या लोकगीतात शहराच्या संपर्कातून उदभवलेल्या दारूच्या व्यसनावर टीका केलेली आहे. या गीतामध्ये नवरा चांगला नाहीही त्या स्त्रीचे दु:ख व्यथा या गीतातून व्यक्त झालेली आहे.

" वाई रोको की वाई
इस्कुलता वाई
मास्तरे वेतना अ, आ, उ, ऊ
वाता मास्तरी मम्मट वायो
सरकारना पगार पुण्यम तीनतीन
मा कब्बड बाहदूर कांते?"

आदिवासी मुले शाळेत जात नाहीत तेव्हा त्यांन आव्हान करण्यात येते की, तुम्ही शाळेत या सरकार जो पगार देतोते मास्तर फुकट खाते.या गीतातून शाळेत जाणे किती महत्वाचे आहे असेसांगुन समाज परिवर्तनासाठी शिक्षणाचे महत्व अधोरेखीत केले आहे.



Scanned with CamScanner

"आज्या पोयज्या कॉलेज शिके
बिना भोज सिकुली || धृ ||

१. बाहका वेवार, क्यो मा बेना वा आज्या
२. माहकी वेवार, क्यो मा बेना आज्या
३. पावहू वेवार, क्यो मा बेना आज्या
४. काकाहा वेवार, क्यो मा बेना वा आज्या
५. जीजीही वेवार, क्यो मा बेना वा आज्या

या गीतातून शिक्षणा बदलची जिदद् दाखवली आहे त्या मुलीलाशिक्षणाची आवड असूनही शिक्षण पूर्ण करता आले नाही.शिक्षण घेण्याच्या वयातच आईवडील व काकांनी लग्न केले त्याच बरोबर सोबतच्या मी उच्च शिक्षण घेत आहेत. याचे दु:ख त्या मुलीलाहोत आह. जागतिकीकरणाचे युगहे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणुन ओळखले जाते मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणामुळे मानवी जीवनामध्ये विकासात्मक परिवर्तन घडून आले आहे. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, कथागीते, विधिनाटये, लोकनाटये, म्हणी वाक्प्रचार इ समावेश होतो.लोकसाहित्याची निर्मितीसमूहाकडूनहोत असते.त्याचे वहन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अखंडितपणेसुरू असते.

औद्योगिकसंस्कृतिचा जसजसा विकास झाला तसतशीसामूहिक जीवन व्यवस्था कमकुवत झालेली दिसते. मानव व्यक्तीवादी झालेला दिसतो. आधुनिक जीवनात परंपरेने चालत आलेल्या अनेक गोष्टी विसंगत असल्या तरी, त्यांचे महत्व कमी झालेले दिसत असलेतरी आधुनिक जीवनात परंपरेतील काही गोष्टी अवशेष रूपात शिल्लक असतात. औद्योगिकरणामुळेसामुहिक जीवनपध्दती बदलली, व्यवसाय बदलले त्या बदलाबरोबर लोकसाहित्याच्या अविष्काराचे स्वरूप बदललेले दिसते. उदा:- १८५७ च्या युध्दातसामील झालेल्या अनेक क्रांतीकारकांच्या जीवनावर लोकगीत रचलेले दिसतात. आपल्या महाराष्ट्रा पुरता विचार केलातरसीमा भागातील लोकगीतांमध्येसंयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते.अनेक आदिवासींच्या गीतामध्ये बिरसामुंडा या आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनातील घटना प्रसंगाचे वर्णन आलेले आहे.लोकसाहित्यात गतकालीन जीवनाच्या चित्रणाबरोबरआजच्या जीवनातीलही अनेक संदर्भ येत असतात.

औद्योगिकीकरणाच्या नावाखाली मोठया प्रमाणात अरण्य नष्ट केली जात आहेत. त्याचा पर्यावरणावर परिणामहोत आहे.त्याच बरोबर आदिवासींच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहेत्यामुळे नागर समाज व आदिवासी समाज यांच्या त संघर्ष निर्माण होत आहे.समाजपरिवर्तनामध्ये शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. जाज प्रत्येकजण शिक्षण घेवून स्वत:ची प्रगती साधत आहे.ही शिक्षणाची गंगा आदिवासींपर्यंत पोहोचलेली आहे मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर नेत्रदिपक प्रगतीसाधलेली आहे. आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. काळाबरोबर मनोरंजनाचीसाधने बदललेली आहेत. उदा:- दुरदर्शन, मोबाईल इ. त्यामुळे समाज आपल्या सांस्कृतिक परंपरेपासून दूर जाताना दिसत आहे.पारंपारिक लोकसाहित्य, लोककला यांचे जतन व



Scanned with CamScanner

संवर्धन होणे गरजेचे आहे.या लोकलावर अनेक लोककलावंतांचे उपजिविकेचे साधन आहेत.हे लोककलावंत व लोककलांचे जतन, संवर्धन करूनहस्तांतरण करत असतात.परंतु या लोककलासमोर आज मोठी आव्हाने उभी आहेत.

१) पूर्वीप्रमाणे लोककलाविषयी लोकांमध्ये आस्था राहिलेली दिसत नाही.

२) लोककलांकडे बघण्याचा संकुचित दृष्टिकोनतयार झाला आहे.

३) लोककलावंतांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

४) जागतिकीकरणामुळे शहराबरोबरच आदिवासी वाडया, वस्त्या यांच्या जीवनावर विविध मनोरंजक साधनांचा परिणाम झालेला दिसतो. उदा:- चित्रपट, मोबाईल यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम आदिवासी लोककला, लोकसाहित्य पर्यायाने लोकगीतांवर झालेला दिसतो आजचे मानवी जीवन चौकटीत बंदिस्त झालेले दिसते.

या लोककलांचेअस्तित्वटिकवायचेअसेलतर शासनाने पुढाकार घेवून लोककला संवर्धनासाठी प्रोत्साहन देवून लोककलावंतांना मानधन द्यावे.लोककलावंतांच्या मुलांना शिक्षणामध्ये विशेष सवलत द्यावी.वेळोवेळी लोककला महोत्सवांचे आयोजन करण्यात यावे.यामुळे लोककलांना प्रोत्साहन मिळेल. शिक्षणामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये बदल झाला आहे.आदिवासी जमातीतीलतरूण शिक्षण घेवून नोकरी, व्यवसाय करत आहेत.नोकरीच्या निमित्ताने त्यांना घर सोडावे लागत आहे.शहरामध्ये गेल्यानंतरतरूण वर्ग शहरीसंस्कृतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत.त्यामुळे आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, लोकसाहित्य, लोककला यापासूनतो दुरावताना दिसत आहे.परंतू आपणच आपल्या संस्कृतिचे, लोकसाहित्याचे, लोककलांचे जतन, संवर्धन करणे गरजेचे आहे. अन्यथा वैशिष्टयपुर्णसंस्कृतिपासून आपण कायमचे दुरावले जाऊ.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. डॉ. गावित माहेश्वरी, आदिवासी लोक परंपरा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, मार्च- २०१५ .

२. डॉ. गारे गोविंद, सातपुडयातील भिल्ल, ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे- ३०.

३. डॉ. मुनघाटे प्रमोद, आदिवासी मराठीसाहित्य: स्वरूप व समस्या.

४. डॉ. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य स्वरूप व समस्या, विजय प्रकाशन, नागपूर.

५. डॉ. गावित माहेश्वरी, जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.


◆◆◆

Scanned with CamScanner

अभिसरण

ISSN-2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
**प्राचार्य डॉ. वसंत सानप**

कार्यकारी संपादक
**डॉ. गणेश मोहिते**

सहसंपादक
**डॉ. मनोहर सिरसाट**

नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा । अभिसरण - विशेषांक मे २०२२

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | विवरण | लेखकाचे नाव | पृ.कृ. |
|---|---|---|---|
| ०१ | झुंज तिची पाचटाशी मधील जीवन संघर्ष | प्रा.डॉ.रामनाथ वाढे | ०१ |
| ०२ | नव्वदोत्तरी कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी | प्रा. डॉ. देशमुख बिभीषण | ०५ |
| ०३ | लक्ष्मीकांत देशमुख एक वास्तववादी लेखक ('नंबर वन' क्रिडा क्षेत्रातील वास्तव) | किशोर बाबुराव भगत | १२ |
| ०४ | 'खेळ'चे नव्वदोत्तर काळात साहित्याच्या अभिवृद्धीतील योगदान | प्रा.डॉ.महादेव अंगद जगताप | १५ |
| ०५ | समकालीन जीवन जाणिवांचा सशक्त वास्तववादी आविष्कार करणारी नव्वदोत्तर मराठवाडी ग्रामीण कविता | प्रा .डॉ . राजकुमार किशनराव यल्लावाड | २० |
| ०६ | "प्रेरक ललकारी या नव्वदोत्तर नियतकालिकाचे वाड:मयीन व सामाजिक योगदान" | डॉ विनोद वासुदेव उपर्वट | २६ |
| ०७ | नव्वदोत्तर मराठी कवितेतील कृषी वेदना व विद्रोहाच्या पाऊलखुणा | डॉ. ज्ञानदेव राऊत | ३२ |
| ०८ | दलित कविता आणि कविवर्य वामन निंबाळकर | प्रो.डॉ.मनोहर सिरसाट<br>मीना अशोक अंभोरे | ४० |
| ०९ | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कथा: स्थिती आणि गती | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | ४७ |
| १० | नव्वदोत्तर मराठी महानगरीय कवींच्या कवितांमधून आविष्कृत होणारी आशयसूत्रे | प्रा. प्रवीण सदानंद गायकर | ५३ |
| ११ | नव्वदोत्तर ग्रामीण कविता | प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे | ५९ |
| १२ | स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील आंबेडकरी स्त्रीवाद: नवसाहित्य प्रवाहाच्या निमित्ताने | डा. रेखा कचरूजी मेश्राम | ६४ |
| १३ | नव्वदोत्तर मराठवाड्यातील ग्रामीण कविता : एक दृष्टिक्षेप | सौ.सारिका सूर्यकांत नरवडे | ६९ |
| १४ | नव्वदोत्तर मराठवाड्यातील ग्रामीण कथालेखन : स्वरूप आणि विशेष | श्रीमती.बालिका दगडू भागवत | ७४ |
| १५ | नव्वदोत्तर मराठी कविता : एक आढावा | प्रा.डॉ. सुनील मधुकर पवार | ७९ |
| १६ | समकालीन समाजवास्तव आणि मराठी कविता. (जागतिकीकारणाच्या विशेष संदर्भाने) | प्रा. विद्या सुर्वे बोरसे | ८६ |
| १७ | उमेश मोहिते यांचे भाकरी आणि कर्म आणि नव्वदोत्तर मराठी साहित्य | प्रा.डॉ. सोपान सुरवसे<br>प्रा.व्यंकटेश संजय राऊत | ९२ |
| १८ | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी | डॉ. बबन सिद्राम गायकवाड | ९५ |
| १९ | उत्खनन कादंबरीचे वेगळेपण | प्रा. डॉ. शिवाजी तुकाराम पाटील | ९८ |



Scanned with CamScanner

# नव्वदोत्तर ग्रामीण कविता

**प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,अंबाजोगाई
मो. ९८२२६७३६६०

कोणत्याही साहित्यामध्ये वेगवेगळ्या काळात,परिस्थितीमध्ये साहित्याच्या प्रेरणा, स्वरूप बदलते असते. 'साहित्य समाजाचा आरसा असते' असे म्हटले जाते. त्याचा अर्थ समाजातील बदलत्या जाणिवा, प्रेरणा समकालीन प्रश्न, समस्या या सर्वांचे चित्रण त्या त्या काळातील साहित्यातून उमटते, नव्वदोत्तर जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण शहरीकरणाचे सर्व स्तरावर परिणाम झाले, यातून शहरी जगण्या सोबतच ग्रामीण जीवनामध्ये सुद्धा प्रचंड परिवर्तन झाले. तंत्रज्ञानाचा शिरकाव खेड्यापाड्यापर्यंत पोहोचला. या सर्वांमध्ये काही प्रमाणात फायदा सोडला तर सर्वात अधिकाधिक मोठे प्रश्न शेती व्यवस्थेसमोर उभे ठाकले, हे नाकारता येत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांमध्ये अधिकच भर पडत गेली हे वास्तव आहेच. 'वेग, स्थिरता, समृद्धी आणि तरीही निश्चितता हे या काळाचं सूत्र आहे' हे पी विठ्ठल यांचे निरीक्षण महत्त्वपूर्ण आहे.

नव्वदोत्तर समाज जीवनात विशेष करून ग्रामीण भागात निर्माण झालेल्या स्थितीगतीचा बारकाईने विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. साहित्यक्षेत्रही यास अपवाद नाही. केवळ भारतच नव्हे तर जगभरातील कित्येक देशांमध्ये माणसांच्या, समाजाच्या स्वरूपामध्ये प्रचंड परिवर्तन घडून आल्याचे दिसून येते, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, शहरीकरण, वैश्वीकरण या सर्व संकल्पना एकापाठोपाठ एक संपूर्ण जगभर पर्यायाने आपल्याही देशांमध्ये आपल्याही ग्रामीण भागामध्ये विस्तार पावत गेल्या. त्यामुळे संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले. ग्रामीण माणूस. ग्रामीण वातावरण. ग्रामीण परिस्थिती. शेती, शेतकऱ्यांची परिस्थिती. जीवनामध्ये अनेक प्रश्नांची गुंतागुंत वाढत गेली. अस्मानी सुलतानी संकटाने अगोदरपासूनच जो शेतकरी कोलमडून पडला होता त्यावर या सर्व माध्यमातून आणखीनच प्रश्नांचा भडिमार होत गेला. या सर्वांचा अतिशय गंभीर परिणाम ग्रामीण साहित्यामध्ये दिसून आला त्यातल्या त्यात ग्रामीण कवितेवर हा प्रभाव अधिक जाणवला असे वाटते. या सर्वांचे चित्रण नव्वदोत्तर ग्रामीण कविता प्रभावीपणे करताना दिसते.

ग्रामीण कविता ही माणसाची कविता आहे. शेतकऱ्यांची कविता आहे. कष्टकरी शेतमजुरांची कविता आहे. बदलत्या ग्रामीण भावविश्वाचे अनेक अंगाने चित्रण करणारी ही कविता आहे. ग्रामीण माणसाच्या जीवनात प्रश्न निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला जाब विचारणारी कविता आहे. दुःख, प्रश्नाचे आघात सोसत आयुष्य व्यतीत करणाऱ्या माणसाची ही खरी कविता आहे. इंद्रजित भालेराव,जगदीश कदम. श्रीकांत देशमुख, शशिकांत शिंदे, हेमंत कांबळे, एकनाथ पाटील, सदानंद देशमुख, कैलास दौंड, संतोष पद्माकर पवार, प्रदीप पाटील, शंकर वाडेवाले, प्रकाश होळकर, लक्ष्मण महाडिक, केशव सखाराम देशमुख, ऐश्वर्या पाटेकर, कल्पना दुधाळ, बालाजी इंगळे, महेश मोरे, शिवाजी मरगीळ, पी विठ्ठल, ललित अधाने, केशव कटिंग, चंद्रशेखर मलकमपट्टे हे महत्त्वाचे कवी ग्रामीण जाणीवेतून कविता लिहिणारे आहेत. इंद्रजित भालेराव यांनी ग्रामीण कवितेला मंचीय कार्यक्रमातून तोंड फोडले. ग्रामीण पीकपाणी, आम्ही काबाडाचे धनी, या कवितासंग्रहातून शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या, हतबलता या बाबीवर प्रकाश टाकलेला दिसतो. केशव सखाराम



Scanned with CamScanner

देशमुख यांनी समकाळातील शेतकऱ्यांचे कष्ट करण्यारया माणसांचे जगणे नेमकेपणाने आपल्या कविता संग्रहातून मांडले. साधी सरळ भाषाशैली यामुळे देशमुखांची कविता थेट काळजाला भिडते. केशव देशमुख आपल्या कवितेत म्हणतात...

पाऊस पडू लागला की शेतकऱ्यांची स्वप्न
मालाच्या उत्पादनात प्रमाणे दुपटीतिपटीनं वाढत जातात
आणि
कोसळणाऱ्या विजांच्या आठवणी
शेतकऱ्यांना सावधानीचे पाठ पढवत असतात. किंवा
गाभ्यापर्यंत पोहोचलीय कीड / परिस्थितीच गेलीय हाताबाहेर
आसवांचे वाहाताहेत पाट / गप्प बसायचीही हद्द संपलीय...
मुळं खोदून फेकण्याशिवाय गत्यंतर नाही / निदान उद्याचा नवा गाभा तरी राहील सहीसलामत...

'बळीवंत','आषाढमाती' हे ग्रामीण जीवनासंदर्भात ग्रामीण संस्कृतीची मांडणी करणारे कवितासंग्रह श्रीकांत देशमुख यांनी लिहिले आहेत. एकाकी पडलेल्या शेतकऱ्याच्या दयनीय अवस्थेचे सूचक चित्रण करणारी त्यांची खालील कविता महत्त्वाची आहे.

माणिकचंद, स्टार, गोवा ऐतिहासिक गुटके गावोगाव
समूह संस्कृतीचे प्रतीक असणाऱ्या
पानठेल्यावर किंवा
विस्तार छाटलेले, निष्प्राण खोड, तसा तो बांधावर एकाकी...

ग्रामीण जीवनाचा सखोल आलेख मांडणारा महत्त्वाचा कवी म्हणून कैलास दौंड यांच्याकडे पाहावे लागते. वास्तवता, शून्यता, अस्वस्थता, आपुलकी, तळमळ या भावना यांच्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त होतात.

बालाजी मदन इंगळे हा एक सशक्त आणि ग्रामीण वास्तव निर्भिडपणे टोकदारपणे मांडणारा कवी म्हणून सर्वपरिचित आहे नव्वदोत्तर ग्रामीण कवितेला विविधांगी मस्त अनुभव देणारा हा कवी आहे शेतकऱ्यांच्या कष्टाची किंमत मिळाली पाहिजे म्हणून जा विचारणारा हा कवी आहे शासन पातळीवरून खूप मोठी मदत कार्य शेतकऱ्यां प्रति होणे आवश्यक असते रुद्र हे चित्र प्रचंड दुर्मिळ आहे. जखमेवर प्राथमिक मलमपट्टी करावी, अशा पद्धतीने शेतकऱ्यांच्या दुःखद परिस्थितीकडे, त्याच्या प्रश्नाकडे पाहिले जाते. कितीही प्रयत्न करून प्रश्न सुटत नाहीत. तेव्हा बालाजी मदन इंगळे चिंतनशील कवी आपल्या कवितेतून त्या सर्व शोषित घटकांना जाब विचारतो शेतकऱ्याला ही त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देतो. कवी लक्ष्मण महाडिक आपल्या 'घोषणांच्या बेमोसमी पावसात' या कवितेत लिहितात...

आज परागंदा झालीत माणसं, वांझ झालीत खेडी
अन् शहरांना तर दिवस गेले
खेड्याकडे चला म्हणणारे गांधीजी आज कुठे गेले.

लक्ष्मण महाडिक यांनी निर्माण केलेला प्रश्न वास्तव आहे चिंतनीय आहे.

अस्मानी सुलतानी संकटाने ग्रासलेल्या कृषिनिष्ठ जीवनाला आपले सर्वस्व मानून प्रचंड कावाडकष्ट करण्याची घाम गाळून स्वतःचे जगणे कस्पटासमान करणाऱ्या शेतकऱ्याला जेव्हा न्याय मिळत नाही कृष्णाचे प्रचंड प्रश्नाने समस्यांचे प्रचंड मोठं ओझं उतरता उतरत नाही. आयुष्यभर नशिबाच्या सोबतच दैववादाच्या



Scanned with CamScanner

जीवावर तो आपले आयुष्य जगत आलेला आहे. दुःखाच्या काळात काहीतरी मार्ग निर्माण व्हावा, कोणीतरी मदतीला धावून यावे, अशी भाबडी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे, मात्र असे चित्र निर्माणच होत नाही. अशावेळी स्वतःला संपवून या सगळयातून सुटका करून घेणारा आत्महत्यासारखा दुर्दैवी मार्ग पत्करणाऱ्या शेतकऱ्याचे भीषण, वास्तव चित्रण कवी महेश मोरे आपल्या 'गळफास' कवितेत करतात.

याच मातीला माहित- बापू गाळायाचा घाम
गळफास घेतानाही - नाही पावलेला राम

रवी कोरडे हा एक ग्रामीण जाणिवा प्रभावीपणे व्यक्त करणारा कवी. 'धूसरं झालं नसतं गाव' हा महत्त्वाचा कवितासंग्रह.

आंदोलने झाली/सरकार बदलून झाले/ योजना आल्या/
कृत्रिम पाऊस आला/ आरत्या झाल्या/ प्रार्थना झाल्या/
शिव्या देऊन झाल्या/ आत्महत्या झाल्या/ सगळे सगळे झालं/
तुझ्या मालाला भाव मिळविण्यासाठी बापा आता अजून काय करशील? किंवा
गावाची आठवण म्हणून मी इथं फार रमलो असेही नाही
किंवा मला गावाकडे जावं वाटतं असंही नाही
मी पुरता परागंदा माझ्याच मातीत
संध्याकाळी पांगलेल्या रांगोळीच्या रेषाप्रमाणे...

आपल्या गावाबद्दलची ओढ आणि गावाबद्दलची उदासीनता अशा दुहेरी द्वंद्वात सापडलेला, गाव सोडून शहरात पोट भरणारा ग्रामीण माणूस तिथल्या परिस्थितीने हतबल झाला आहे. शहरात स्थिरस्थावर व्हावे की गावाकडे परतावे असा पेच त्याच्यासमोर उभा राहिला आहे. अशा परागंदा झालेल्या ग्रामीण माणसाचे नेमकेपणाने चित्रण रवी कोरडे आपल्या कवितेतून करताना दिसतात. संतोष पद्माकर पवार यांची ग्रामीण कविता चिंतनीय आहे.

जुने बारव विहिरी आड कचऱ्यामधी दबून गेले
पाटीलकीच्या गढीमध्ये गाव सारे हगून गेले
गाव फुटले, वाटले गेले वस्तीवस्तीत
मखर राहिले बाकी देवाचे, एकटे तुकड्या वेशीत

ऐश्वर्या पाटेकर यांचा कृषिसंस्कृतीचा आलेख मांडणारी मांडणारा महत्त्वपूर्ण कवितासंग्रह 'भुईशास्त्र ' हा आहे. "जागतिकीकरणाचे जगण्याच्या सर्व स्तरावर दृश्य परिणाम झाले आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तरावर उमटलेल्या परिणामापेक्षा कृषिसंस्कृतीवर झालेले परिणाम हे भयंकर अशा स्वरूपाचे आहेत. नव्या नव्या शोधाने शेतीची उत्पादनक्षमता वाढली असली तरी शेतीमुळेच व्यापारभावही जोरात सुरू झाला. उत्पादनक्षमता वाढूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे ग्रहण काही सुटता सुटत नाही. ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारून चालणार नाही. 'भुईशास्त्र' मधील कविता हीच जाणीव तीव्र करतात." असे पी विठ्ठल नोंदवलेले निरीक्षण महत्त्वपूर्ण आहे.

एकूण कवितेत विशेषतः ग्रामीण कवितेत 'कल्पना दुधाळ' अतिशय महत्त्वाचे नाव. 'सिझर कर म्हणतेय माती' हा त्यांचा ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण कवितासंग्रह. उत्तम कांबळे यांनी कल्पना दुधाळ यांच्या कवितेची अचूक मांडणी केली आहे, ते म्हणतात "कल्पना दुधाळची कविता रानभर,

Scanned with CamScanner

मनभर तर असतेच शिवाय मातीच्या कणाकणानं वर गर्दी करू लागलेल्या जागतिकीकरण आणि त्याने आणलेल्या विषाणूपर्यंत ही पोहोचते.

गावातल्या मारवाड्याच्या इमारतीचे कौतुक होतं आणि बांधकरयांचे खणाचे घर डोळयात खुपतं
लठ्ठ सातबाराच्या पानगळी झाल्या /घरांपुरत्यासुद्धा जमिनी नावावर नाही राहिल्या...

केशव सखाराम देशमुख एक ग्रामीण चिंतनशील कवी 'पाढा','चालणारे अनवाणी पाय' आणि 'अथक ' व नव्याने प्रकाशित झालेला 'गाभा' हा कवितासंग्रह ग्रामीण जीवनाचा दुःखाचा गाभाच उकलत जातो. इतका प्रत्यय कारी आहे.यातील प्रत्येक कविता ग्रामीण परिस्थितीचं जळजळीत वास्तव मांडताना दिसते. शेतकऱ्याच्या अनुभूतीचे करूण दुःख मांडताना दिसते.

दुष्काळाची साय, शिवारी चढे, कुणब्याचे मढे, झाडाखाली ... किंवा
उघडा झालो, तमा नागवाही,जगण्याची ग्वाही, नाही बाकी...

प्रचंड राबराब राबून काबाडकष्ट करून सुखाने जगण्याची आशा, दिशा तर दूरच किमान जगण्याची याचना तो करत आहे. या प्रकारची प्रचंड, विषमता, खिन्नता, वैफल्यता केशव देशमुख नेमकेपणाने आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे तर काही कवितांमधून ग्रामीण भागातील भावकी दोन दवा गावातील राजकारणसोबत असलेली कमालीची कटुता मांडणाऱ्या कविता ग्रामीण जीवनातला आणखी एक भयावह वास्तव मांडून जातात, एका कवितेत त्यांनी हे चित्र रेखाटले आहे.

धुरा कोरुन भरत नाही पोट तरी, धुर्यासाठी युद्ध/ माणसे मरतात, रक्त सांडते/ धुरा मात्र जागच्या जागीच/ कधी कधी त्यांची कविता विचार मग्न होते आत्मभान प्राप्त करून दुःखाचे मूळ शोधते अशीही पिढ्यानपिढ्या किडलेली मुळातून पोखरुन पोकळ झालेली परिस्थिती बदलायची असेल तर
मुळं खोदून फेकणेशिवाय गत्यंतर नाही /निदान उद्याचा नवा गाभा तरी राहील सहीसलामत

असा सकारात्मक विचार करते. आपल्या पुढच्या पिढीला तरी चार सुखाचे क्षण नशिबी येतील, असा आशावादी विचार, परिवर्तनाची भाषा, ग्रामीण जगण्यातील आत्मचिंतन यातून व्यक्त होते, म्हणता येईल. ग्रामीण कवितेतील नंबर प्रश्नांचा वेध घेणारा विठ्ठल जाधव हे एक महत्वपूर्ण कवी त्यांची कविता अनुभवातून प्रकट होते ग्रामीण जीवनाशी मातीशी त्यांची असलेली घटना नाळ त्यांच्या प्रत्येक कवितेतून व्यक्त होते कोरडा दुष्काळ पावसाचा लहरीपणा त्यातून निर्माण होणारा पाण्याचा प्रश्न पीक पाण्याची होणारी वाताहत त्यांची यांची कविता करते.

कूस अजून रिकामी, टिपूस नाही पावसाचा
लाव्हा आत पेटला, घास पळवला तोंडाचा
किंवा
भेगामंदी काळयाआईच्या सारं भविष्य बांधलं
वर रक्ताळलं आभाळ, काय सांगत सकून...

एकंदरच नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कविता, ग्रामीण जीवनाचे, कृषिनिष्ठ परिस्थितीचे, शेतकरी, मजूर, कष्टकरी, तंत्रज्ञानाच्या प्रभावातून ग्रामीण जीवनातील बदललेले वातावरण कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासारखे अनेक प्रश्न, समस्यांचे चित्रण करणारे अतिशय समृद्ध, सकस चिंतनशील ग्रामीण कविता एकूण नव्वदोत्तर निर्माण झालेली दिसते.





**संदर्भ सूची :**

1.प्रतिष्ठान जुलै-ऑगस्ट 2015 वर्षे 63 वे अंक सहावा

2. मराठी कविता समकालीन परिदृश्य, पी. विठ्ठल कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

3.साहित्य आकलन आणि आस्वाद, डॉ. जगदीश कदम, संगत प्रकाशन, नांदेड

4.नव्वदोत्तरी मराठी साहित्य आणि समाज, डॉ. तुषार चांदवडकर,प्रा. चारुता गोखले, कुसुमाग्रज प्रकाशन नाशिक

Scanned with CamScanner

# ॥ अभिसरण ॥

Special Issue : May- 2022

ISSN : 2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा

: मुख्य संपादक :

**प्राचार्य डॉ. वसंत सानप**

कार्यकारी संपादक : डॉ. गणेश मोहिते

सह संपादक : प्रो. डॉ. मनोहर सिरसाट

: संपादक मंडळ सदस्य :

डॉ. बाबासाहेब कोकाटे
डॉ. बापू जाधवर
प्रा. माणिक भताने
डॉ. रवींद्र काळे
डॉ. शैलेश आकुलवार
डॉ. ईश्वर छानवाल
डॉ. सुरेश घुमटकर
प्रा. महारुद्र जगताप
प्रा. संदीप परदेशी

: सल्लागार समिती :

**डॉ. लक्ष्मीकांत देशमुख**
अध्यक्ष, ९१ वे अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, बडोदा

**डॉ. ताहेर पठाण,**
मराठी विभाग प्रमुख, अलीगढ मुस्लिम
विद्यापीठ, अलीगढ (उत्तरप्रदेश)

**डॉ. पृथ्वीराज तौर**
मराठी विभाग, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**डॉ. सुधाकर शेंडगे,**
प्रोफेसर, हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. रावसाहेब जाधव,**
प्राचार्य, पीपल्स कॉलेज, नांदेड

**प्रो. आनंद उबाळे**
इंग्रजी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. शाम सिरसाठ,**
प्रकुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. प्रकाश पवार,**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. अक्षय सरोदे**
इंग्रजी विभाग,
डॉ. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. सय्यद अझरुद्दीन,**
वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (वाणिज्य)

**डॉ. अण्णासाहेब गुरव**
अधिष्ठाता (वाणिज्य), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. संतोष दास्ताने**
समन्वयक, अर्थशास्त्र, विश्वकोश, निर्मिती मंडळ

• अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही.

Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

December Special Issue : III - 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | २००० नंतरची स्त्रियांची मराठी कविता | डॉ.समिता जाधव | 1-5 |
| 2 | नव्या प्रवृत्तीचे चित्रण करणारी कादंबरी | डॉ.गणेश मोहिते | 6-8 |
| 3 | २००० नंतरचे मराठी स्त्रीलिखित नाटके - एक आकलन | प्रा.डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे | 9-14 |
| 4 | ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे कथाकार भास्कर बडे | प्रा. डॉ. आर. एस. बडुरे | 15-18 |
| 5 | डॉ.पंजाबराव देशमुख व ग्रामीण साहित्य चळवळ: पुनर्विचार | डॉ.वासुदेव भाऊसाहेब ऊगले | 19-22 |
| 6 | २००० नंतरची मराठी कादंबरी : एक अभ्यास | प्रा.डॉ.रामहारी मायकर | 23-25 |
| 7 | इ.स. २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप | डॅाखाडप संजय बाबुराव | 26-30 |
| 8 | २००० नंतरच्या दलित कवयित्रींच्या कविता: स्वरूप व विशेष | डॉ.अंकुश रामराव काळे | 31-35 |
| 9 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप | प्रा.डॉ. आवारे सी.एस. | 36-40 |
| 10 | स्त्रीवादी कवितेतून व्यक्त होणारी सामाजिकता | डॉ.गणपती जोतीबा मोरे | 41-45 |
| 11 | दुर्लक्षित मुक्या माणसांचे दुःख बोलके करणारी कविता : न्हांगूळ आदार ईला | प्रा.डॉ. व्यंकटी पावडे | 46-51 |
| 12 | 'बारोमास' : शेतकऱ्या समोरील विविध आव्हाने | श्रीराम विलास तिडके | 52-54 |
| 13 | २००० नंतरच्या स्त्रीवादातून निर्माण झालेल्या कविता | प्रा.डॉ. लतिका महादेव कट्टीमनी | 55-61 |
| 14 | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेवर जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. पंडित मोरे | 62-65 |
| 15 | समकालीन वास्तवतेचा आलेख रेखाटणारी कविता : मी सार्वकालिक सर्वत्र | प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 66-70 |
| 16 | प्रौढ साक्षरता अभियानाची शोकांतिका मांडणारी कादंबरी : निशाणी डावा अंगठा | प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ | 71-75 |
| 17 | इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील 'अस्सल' ग्रामीणत्व | प्रा. वंदना शामराव खोराटे | 76-82 |
| 18 | २००० नंतरची ग्रामीण कथा | प्रा.संदीप परदेशी | 83-85 |
| 19 | जागतिकीकरण आणि समकालीन कविता | डॉ.दत्ताराम राठोड | 86-92 |
| 20 | दुष्काळाचे चित्रण करणारी कादंबरी पांढर | डॉ. छोटू देवपुरी पुरी | 93-99 |
| 21 | २००० नंतरच्या मनमौन कवितासंग्रहातील कृषिजीवन | डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 100-103 |
| 22 | आदिवासी कवितेतील बदलते जीवन | डॉ.विठ्ठल केदारी | 104-108 |
| 23 | शेती प्रश्नांना मुखर करणारी २००० नंतरची ग्रामीण कविता | डॉ.वैजनाथ पंडितराव कदम | 109-115 |
| 24 | गोठण कादंबरीतील भाषेचे स्वरूप | डॉ.सरला गोरे | 116-119 |
| 25 | 'पितळ' कथासंग्रहातून आलेले स्त्रीजीवन चित्रण | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | 120-125 |
| 26 | २१व्या शतकातील गतिमान कादंबरी | डॉ.दत्ताराम राठोड | 126-131 |
| 27 | २००० नंतरचे शेतकऱ्यांचे वास्तव जीवन आणि लेखक | डॉ. ज्ञानेश्वर को.गवते | 132-135 |
| 28 | 'वळंबा' या आत्मकथनातील संघर्षाचे स्वरूप | डॉ.ललिता मानसिंग गोपाळ | 136-141 |
| 29 | इसवी सन २००० नंतरच्या मराठी साहित्यातील बदलत्या जीवन जाणीवांमागील सामाजिक पार्श्वभूमी | डॉ निलेश एकनाथराव लोंढे | 142-148 |


Scanned with CamScanner

# समकालीन वास्तवतेचा आलेख रेखाटणारी कविता : मी सार्वकालिक सर्वत्र

प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे
मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

सभोवतालच्या समकालीन परिस्थितीचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि अशा खूप काही घटकांचे सूक्ष्म अवलोकन करून या संदर्भातील वास्तव मांडणी करणारा लेखक, कवी जेव्हा चिंतनशील साहित्य लेखन करतो. समकालीन गंभीर प्रश्नांना तो उजागर करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा खऱ्या अर्थाने ते साहित्य समकालीन जाणिवा व्यक्त करणारे साहित्य ठरते. आजघडीला मराठी साहित्यामध्ये, कवितेमध्ये पी. विठ्ठल हा कवी या संदर्भात महत्वपूर्ण लेखन करताना दिसतो. माझ्या वर्तमानाची नोंद, शून्य एक मी, मी सर्वकालिक सर्वत्र अशा मोजक्या काव्यलेखनातून लक्ष वेधून घेतले आहे. या तीनही महत्वपूर्ण कवितासंग्रहातून समकालीन बदलते वास्तव, समकालीन परिदृश्य टिपण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. आपल्या कविता निर्मिती सूत्राबद्दल ते म्हणतात, की "माझी कविता ही माझ्या जगण्याचा कोलाज आहे. मला माझं जगणं वगळून लिहिता येत नाही. सर्जनाचं किंवा विचाराचे केंद्र कधीच स्थिर असत नाही. काळानुरूप आपली अभिरूची आणि प्रतिसाद देण्याची रीत बदलते कारण काळ आणि त्या काळातल्या गोष्टी आपल्याला प्रभावित करू शकतात." (मी सर्वकालिक सर्वत्र पृष्ठ १३८) तसेच "माझ्या अवतीभवतीच्या माणसांनी आणि पर्यावरणानेच माझं अनुभव विश्व घडवल आहे. या माणसांना वर्तमान सलग्न ठेवून वाचकांना त्यांच्याशी एकरूप करून घेण्याचा माझा प्रयत्न असतो. पिढीदरपिढी वाढत जाणारे अंतर आणि आपल्या एकूणच जगण्यातली नष्ट होणारी संवेदना मला अधिक त्रासदायक वाटते. एकमेकांच्या सोबत राहूनही संभ्रमाचे जगणे आपण जगत राहतो. द्वेषाचे कुरवाळत राहतो. तत्वविचारांच्या पुस्तकी गप्पा आणि प्रत्यक्षातले जगणे याचा ताळमळ नसतो." ( मी सर्वकालिक सर्वत्र पृष्ठ १३४) यातून पी. विठ्ठल यांच्या संवेदनशील मनाची जडणघडण लक्षात येते. या माणुसकीच्या भावनेतून त्यांची कविता आकार घेते. एक सशक्त, महत्त्वाची कविता लिहून पी. विठ्ठल यांनी मराठी कवितेत मोलाची भर घातली असे म्हणता येते.

'मी सार्वकालिक सर्वत्र' या काव्यसंग्रहातील हरेक कविता समकालीन वास्तवतेचा गंभीर वेध घेते. समकालीन प्रश्न, वास्तव जाणिवा व्यक्त करणारी एक महत्त्वाची कविता 'मी या बाजूला आहे तो त्या बाजूला आहे' ही म्हणता येईल. सीमा वादावरून संघर्ष करणाऱ्या जगातील कोणत्याही दोन देशाची, तेथील माणसांची, सैनिकांची भावअवस्था, त्यांच्या मनातील घालमेल, संघर्ष खूपच ताकदीने या कवितेतून कथन केला आहे. शेजारील देश असूनही एका पावलावर त्यांची भूमी परंतु जाण्याची मुभा नाही, पाऊल टाकणे देखील अशक्य गोष्ट या सर्व गंभीर बाबींचा अतिशय सोप्या, सहज शब्दात कवीने वेध भावविवश



Scanned with CamScanner

[illegible] आहे.

मी या देशाचा नागरिक आहे; तो त्या देशाचा नागरिक आहे

माझा देश संपन्न आहे ; त्याचाही देश संपन्न आहे

दोघांच्यामध्ये एक अवाढव्य कुंपण आहे

पण दोघांचेही रक्त लाल आहे...

कुणी मला शहीद केले ; कुणी त्याला शहीद केले

माणूस म्हणून जगायचे दोघांचेही राहून गेले ! (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ २८, २९)

पी. विठ्ठल यांची 'सरकार' कविता वाचताना कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या सुप्रसिद्ध व आशयघन अशा 'सलाम' कवितेची आवर्जून आठवण येते. 'सरकार' म्हणून जनतेच्या आशीर्वादाने आकारास आलेली व्यवस्था किती दिशाहीन आहे, असते. कर्तव्यशून्य, भावनाशून्य बेजबाबदारपणाचा कळस गाठणारी, केवळ अनैतिक व्यवहारच आम्हाला करता येतो, याची पुन्हा पुन्हा जाणीव करून देणारी राजकीय व्यवस्था ही कविता अतिशय ताकतीने उभी करते. सरकार म्हणून सर्वाधिकार मिळाल्यानंतर राजकारणातील ही नेतेगिरी कशा पद्धतीने बेजबाबदारपणे वागते. मूलभूत कार्यांची पूर्तता करणे एवढी रास्त अपेक्षा सामान्य लोकांची असते. लहान-मोठे प्रश्न सुटले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांच्याकडून असते. सर्वांपुढचे प्रश्न आहे स्वतंत्र राहणे यापलीकडे दुसरे कोणतेही नाही. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार या गोष्टी प्राधान्याने प्राथमिकतापणे सोडविणे आवश्यक असते ; परंतु असे होत नाही. तेव्हा या व्यवस्थेविरुद्ध प्रचंड रोष, नाराजी निर्माण होते. सर्वांच्या मनातील प्रामाणिक भावना जणू 'सरकार' या कवितेमध्ये व्यक्त झाल्या आहेत असे वाटत राहते. जेव्हा तुम्ही माणूस व्हाल, माणूसपणा तुमच्यात भिनेल तेव्हा तुम्ही सरकार असल्याचे आम्हास जाणवत राहील. तुमचा आम्हाला रास्त अभिमान असेल, असा विचार कवी याठिकाणी व्यक्त करतो. एकप्रकारे भावनिक आवाहन करतो. माणूस होण्याची, माणूसपण जपण्याची अपेक्षा कवी या कवितेतून व्यक्त करतो

तुम्ही आस्तिक असता, तुम्ही नास्तिक असता

पण सरकार ! तुम्ही फक्त माणूस नसता

बघा माणूस होता आले तर... ! (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ १८ ते २७)

कोणतेही क्षेत्र असो या व्यवस्था या व्यवस्थेमधून राजकारणाला वगळता येत नाही. यासंदर्भात पी. विठ्ठल म्हणतात, की "राजकारणाशिवाय कोणत्याही घटकाचा, संस्कृतीचा विचार संभवत नाही. केवळ निवडणुका आणि सत्ता या क्षेत्रातच राजकारण असते असं नव्हेतर सामाजिक, सांस्कृतिक व अगदी कौटुंबिक पातळीवरही माणूस राजकारण करत असतो. आपल्यातील पुढारीपण मिरवत असतो. राजकारण ही एक वृत्ती आहे. त्याचा व्यापकतेने विचार करायला हवा मला असं वाटतं." (मी सर्वकालिक सर्वत्र,

पृष्ठ १३९) समकालीन भीषण परिस्थितीवर नेमकेपणाने व स्पष्टपणे भाष्य करणारी '...पण भीती संपली नाही' ही कविता एक अतिशय महत्त्वाची कविता म्हणता येईल. सत्य, वास्तव परिस्थितीची जाणीव करून देण्याऱ्याची गळचेपी कशी केली जाते, याचे अतिशय मार्मिक चित्रण या कवितेतून आले आहे.

आम्ही लेखकाला तंबी दिली / कवीला जेरबंद केले
विचारवंतांना गोळ्या घातल्या / त्यांचे श्राद्ध घातले
तरी कविता मेली नाही
पण भीती संपली नाही...! (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ ३५ )

'...पण भीती संपली नाही' ही ओळ या अंगाने ही खूप महत्त्वाची वाटते. खूपकाही सांगून जाते. मानवतेपेक्षा सत्तापिसासूपणा, धर्मांधपणा यातून काही मुठभर लोकांनी कूटपणे समाजामध्ये सामाजिक, आर्थिक गुलामगिरी लादून कायम सत्ता उपभोगली एक स्वतंत्र अनैतिक व्यवस्था निर्माण केली, तरीही एका बाजूला कायम भितीच्या सावटाखाली ही मंडळी वावरत राहिली. शोषित गटातून या व्यवस्थेला कायम विरोध झाला. अन्याय गुलामगिरी उलटून टाकण्याचे त्या त्या वेळी प्रयत्न झाले. या प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करताना अनेकजण चिरडले गेले यात अनेकजण हुतात्मा झाले, काहीजण प्राणाला मुकले तरीही हा संघर्ष कायम पेटता ठेवला. वैचारिक स्तर नेहमी उंचावत नेला. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे, असे कवीला वाटते.

'आदेश असा आहे की' ही कविता समकालीन राजकीय आणि शासकीय यंत्रणेचे एकांगीपण चित्रित करते. आधुनिकता विकास समृद्धीच्या नावावर आदिवासी, शेतकरी, गोरगरिबाला देशोधडीला लावणारे ही व्यवस्था किती भयावह आहे, अविचारी आहे याचे चित्रण करते. बेजबाबदारपणे जमीन आधीग्रहण करून त्यातून उद्भवणाऱ्या प्रश्नांची यत्किंचितही जाणीव न ठेवता सर्वांचे वाली म्हणणारे सरकार अथवा शासकीय यंत्रणा किती निर्दयीपणे कार्य करते याची प्रचिती या कवितेतून येते.

....म्हणजे जंगलाला आग लावली / झोपड्यांची राख रांगोळी केली
त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला / त्यांच्या निसर्गधर्माची विटंबना केली
आत्ता कोणत्याच आदिम संस्कृतीचे अवशेष येथे शिल्लक नाही
आता या जंगलातून समृद्धीचे सुसाट हायवे धावणारा आहेत ! (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ ३६,३७ )

संत तुकारामाच्या 'सुख-जवापडे दुःख पर्वताएवढे' या चिंतनाप्रमाणे आजचा माणूस चिंतेच्या भयावह कोलाहलात सर्वत्र आढळत आहे. ही चिंता स्वतः पासून निर्माण होऊ शकते. जगातील कोणताही घटक या चिंतेला कारणीभूत असू शकतो. या चिंतेला धर्म नसतो, रंग नसतो, वास नसतो, कोणतीही लिपी नसते. जशी हवा सगळीकडे प्रदूषित आहे तसी ही चिंता सर्वत्र भरून गेली आहे, असा महत्वपूर्ण विचार करणारी 'चिंतेचा भयार्थ कोलाहल असतो सर्वत्र' ही एक महत्त्वाची कविता आहे. समकालीन जीवनातील

माणूस मुक्त जग पाहत आहे व आजूबाजूच्या परिस्थितीला बदलण्यासाठी तो विचारही करत आहे. माणुसकीचा स्वातंर्त्याचा मुक्त विचार घेऊन त्याला वाटचाल करावयाची आहे ; परंतु या सर्व विकासाच्या मानवतेच्या मूल्यांना पायदळी तुडवली जाते. या सर्व संदर्भात अडथळा आणण्याचे सर्व काही प्रयत्न सभोवतालच्या काही धार्मिक, जातीयवादी विचारसरणी करीत असतात. या सर्वांचा परिणाम म्हणून बोलणाऱ्याचा आवाज दाबला जातो किंवा या सर्वांची प्रचंड भीती वाटून जाते. तो माणूस आपला भला विचार सोडून आपल्या कोशामध्ये जगत राहतो, असा महत्त्वपूर्ण विचार घेऊन पी. विठ्ठल आपली कविता लिहितात. 'निर्बुद्ध जमावाचे हिंस्र व्याकरण' यातील या चार ओळी

आपल्याला आजूबाजूला लागलेली आग विझावायची असते...
आपल्याला खूप खूप गोष्टी करायच्या असतात;
पण झुंडीच्या बाजाराचे दहशत मानगुटीवर बसलेली असते
आणि शरणागताचे स्त्रोत्र आवडत बसतो आपण
किंवा निश्चलपणे बघत राहतो निर्बंध जमावाचे व्याकरण

तात्पर्य : कुणाचे तरी गुलाम झालेलो असतो आपण... (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ- ४६ )

'खेड्याकडे चला' या महात्मा गांधीच्या भावनापूर्ण आव्हानास प्रतिसाद देत तत्कालीन काळात अनेकांनी शहरातून खेड्याकडे धाव घेतली. खेड्याचा सर्वांगीण विकास हा त्या देशाचा विकास असतो, म्हणून गांधीजींना खेडे स्वयंपूर्ण व्हावे असे वाटत असे; मात्र पुढील काळामध्ये पुन्हा शहराकडे स्थलांतरित होण्याचा कल प्रचंड वाढला. खेडे ओस पडू लागले. या सर्व घटकास खेड्यातील सुविधांचा प्रचंड अभाव आहे. रोजगाराची हमी म्हणून शहराकडे जाण्याचा ओढा निर्माण झाला. अनेक स्वप्न घेऊन शिकलेला, सवरलेला किंवा शिक्षणापासून वंचित राहिलेला माणूस शहरात जाऊ लागला. मात्र त्या ठिकाणीही प्रत्येकाची अपेक्षा पूर्ण झालीच असं नाही. अनेक आव्हाने आले. प्रसंगी उद्धवस्त व्हावे लागले. कोंडवड्यातील जनावराप्रमाणे जीवन जगणे भाग पडले. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत प्रश्नांचे चक्र डोक्यात चक्रागत ठेवून जगणे भाग पडले अशा आशयाची 'अखंड कष्टाच्या दुर्बोध वाटा' ही कविता समकालीन शहरातील प्रश्नांचा, परिस्थितीचा जीवघेण्या स्पर्धेचा, धावणाऱ्या जगाचा, शहरातील वाढणाऱ्या प्रचंड गर्दीचा वेध घेताना दिसते.

समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भावनिक विस्कळीत परिस्थितीचा चिंतनशील वेध घेणारी अतिशय महत्त्वाची कविता म्हणून 'काही अनिवार्य प्रश्न' या कवितेकडे पहावे लागते. समकालीन प्रश्न आणि त्याचे दुष्परिणाम खरच किती भयंकर आहेत. आजवर निर्माण केलेले हे संचित नामशेष होणार की काय? पुढील काळातील गंभीर प्रश्नांची जाणीव करून देणाऱ्या या कवितेच्या काही ओळी...

प्रेतांच्या ॲम्बुलन्स अशाच धावत राहिल्या अहोरात्र



Scanned with CamScanner

तर आपल्या संवेदनशीलतेचे, अश्रूंचे नेमकं काय होईल ?

नात्याचे निरपेक्ष पान असेच गळत राहिले हळूहळू तर आपण बांधलेल्या घराचं,

घरातल्या उदयोन्मुख जीवांचं नेमकं काय होईल ? (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ ५९, ६०)

'मी सरकार बदलू शकतो' या कॉमनमॅन म्हणून आयुष्य जगणाऱ्या माणसाने लोकशाहीच्या माध्यमातून प्राप्त केलेल्या मतदानाच्या अधिकाराद्वारे कोणतेही सरकार, कोणताही उमेदवार बदलण्याची ताकद निर्माण केली आहे. याची पूर्णपणे जाणीव करून देणारी कविता...

पण मी बोटाला शाई लावू शकतो / मी सरकार बदलू शकतो....!!!

समकालीन प्रश्नांचा गंभीर्याने वेध घेणारी, अवतीभवतीचे दडपशाही वातावरण अधोरेखित करणारी, मानवाच्या सुखापेक्षा सनातनवादी विचारांची पकड अधिक घट्ट झाली पाहिजे अशा विकारी विचारसरणीचा निषेध करणारी '...आणि दुःखाचे जहरी वारे' ही कविता उल्लेखनीय आहे.

कोण दाभोळकर, कोण पानसरे

नुकतेच आपण आपण सारे

कलंकाचे काळे पाणी आणि दुःखाचे जहरी वारे (मी सर्वकालिक सर्वत्र, पृष्ठ ५५)

एकदारच पी. विठ्ठल यांची या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता विचारप्रवृत्त करणारी आहे. सत्यता, वास्तव परिस्थिती, परखडवृत्ती, स्पष्टवक्तेपणा, चिंतनशीलता ता गुणांनी यक्त आहे. राहुल कोसंबी यांनी पी. विठ्ठल यांच्या कवितेसंदर्भात महत्त्वाची नोंद केली आहे. की "ही कविता साम्राज्यवादी मनसुबे, भांडवली नफेकोरी आणि पाशवी पुरुषी अधिपत्याचा धिक्कार करते. ही कविता अस्वस्थ करते आणि आश्वस्तही ; तसेच संकुचित होत जाणाऱ्या दिक्कलात हस्तक्षेपाची हमी देते. अन्याय आणि दमनाच्या सूक्ष्म आणि स्थूल रूपांवर भाष्य करणारी ही एक अत्यंत महत्त्वाची कविता आहे." (मी सर्वकालिक सर्वत्र, मलपृष्ठ) या अनुषंगाने पी. विठ्ठल यांची कविता एका मर्यादित वाटेची वाटसरू न ठरता ती शीर्षकाप्रमाणे सार्वकालिक सर्वत्र संचार करणारी कविता ठरते. मराठी कवितेची कक्षा विस्तारित करण्यात मोलाची भर टाकते.

**संदर्भ :**


१. मी सर्वकालिक सर्वत्र, पी. विठ्ठल , गोल्डन पेज पब्लिकेशन पुणे प्रथमावृत्ती २०२२

२. 'शून्य एक मी', कवितासंग्रह, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१७.

३. माझ्या वर्तमानाची नोंद', कवितासंग्रह, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, २०११ दुसरी आवृत्ती, लोकवाड्मयगृह मुंबई, २०१७

४. मराठी कविता: समकालीन परिदृश्य, पी. विठ्ठल, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१७.


◊◊◊



Scanned with CamScanner

# ABOUT EDITORS

## CHIEF EDITOR



**Dr. Shivdas Shirsath**
Principal,
Yashwantrao Chavan College Ambajogai
Maharashtra.

Dr Shivdas Shirsath is working as the Principal of Yashwantrao Chavan College Ambajogai and has a long experience of 25 years in the field of education. Dr. Shivdas Shirsath is the Research Guide of Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad and he is also working as SENET Member and 'Reservation Cell Advisory Member' of the Aurangabad University. 03 of his Research Projects have been completed and Four Research Students have received Ph.D. degrees under his guidance He has published 23 Research Papers at National and International level and is the author of 08 Books.

## EXECUTIVE EDITOR



**Dr. Indrajeet Ramdas Bhagat**
HoD and Associate Professor
Department of Commerce
Yashwantrao Chavan College Ambajogai
Maharashtra

Dr Indrajeet Ramdas Bhagat is working as Head of Department of Commerce and Associate Professor at Yashwantrao Chavan College Ambajogai Maharashtra. He has fifteen years of rich teaching experience at UG and PG level. He is a recognized Research Guide for Commerce at Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad and he is also working as a research guide for M.Com students in relation to professional and academic projects. He is the author of six reference books on commerce. He has worked as an editor in more than 11 National and International journals. He has published Six Chapter Edited Books under the name "Anora". He has worked as a member in the Board of Studies of Rajarshi Shahu College, Latur (Autonomous) and has also served as a paper setter and moderator at New Arts Commerce Science College, Ahmednagar (Autonomous).
Dr. Indrajeet Bhagat has published many articles in national, international and state level magazines and newspapers and as a leading person in the field of research he has received a research patent under the South African Patent Act. He has read more than 70 research papers in various seminars and conferences and has given many lectures on the subject of commerce. Along with this, he has been working as National Service Scheme' Program Officer for the last four years.

MRP : ₹600

**TARAN PUBLICATION**
www.taranpublication.com | Email: taran.publication@gmail.com

Yashwant: Innovative Research in Modern Era.




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| **Chapter - 11** | **A STUDY OF FAILURE AND SEQUENCE OF CRUSADES OF WOMEN IN MEDIEVAL INDIA**<br>*Dr. V. B. Lamb* | **81** |
| **Chapter - 12** | **ATMANIRBHAR BHARAT: REALITY & BUDGET**<br>*Dr. Gautamkumar P Kanani* | **87** |
| **Chapter - 13** | **APPLICATION OF UBIQUITOUS COMPUTING IN THE DIGITAL ECONOMY**<br>*Dr. T. Aasif Ahmed* | **92** |
| **Chapter - 14** | **JHOUHAAR TO SWARAJ : TRIBAL BELIEF OF NATURE'S WORSHIP , CULTURE AND LEGACY OF SOVEREIGNTY KEY TRIGGER TO STRUGGLE FOR SELF RULE**<br>*Gaurav Dhakad* | **101** |
| **Chapter - 15** | **"अर्थपूर्ण जीवनासाठी आर्थिक साक्षरता: काळाची गरज"**<br>*डॉ.सागर शरद कुलकर्णी'* | **105** |
| **Chapter - 16** | **हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात काशिनाथराव जाधव यांचे योगदान**<br>*प्रा. डॉ. राजाभाऊ व्यंकटराव भगत* | **110** |
| **Chapter - 17** | **अंबादास केदार यांच्या ग्रामीण कथेतील कृषी जीवन**<br>*काजगुंडे हनुमंत महादेव, डॉ. दिलीप भिसे* | **115** |
| **Chapter - 18** | **ग्रामीण भारतामध्ये स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती**<br>*डॉ भंडारे रोहिणी विजयकुमार* | **123** |
| **Chapter - 19** | **महिला सबलीकरण आणि शासन**<br>*प्रा. डॉ. संजयकुमार हनुमंत जाधव* | **130** |
| **Chapter - 20** | **महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य**<br>*डॉ. संजय नारायणराव राठोड* | **139** |


Scanned with CamScanner

ISBN : 978-93-92313-68-4

# CHAPTER - 17

# अंबादास केदार यांच्या ग्रामीण कथेतील कृषी जीवन

संशोधक : काजगुंडे हनुमंत महादेव
मार्गदर्शक : डॉ. दिलीप भिसे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

**प्रस्तावना:**

मराठी साहित्य समृद्ध करण्याचे कार्य ग्रामीण साहित्य वेगवेगळ्या पद्धतीने करत आहे. मराठी कथा, कादंबरी, कविता व इतर साहित्यकृती मधून हे अधिक समृद्ध झालेले दिसून येते. ग्रामीण साहित्य अधिक वास्तवदर्शी होण्याचा काळ जर पाहिला तर तो 1960 नंतरचा काळ आहे. मग त्या अगोदर ग्रामीण साहित्य नव्हते का? असा प्रश्न निर्माण होतो. तर त्या अगोदरही ग्रामीण साहित्य लिहिले जात होते परंतु ते अधिक प्रभावी व वास्तवदर्शी नव्हते, जे की 1960 नंतर आपल्याला पहावयास मिळते. बदलत्या काळानुसार ग्रामीण साहित्य बदलत गेले, त्यानुसार त्याची मांडणी बदलत गेली आणि त्यामधील मांडणी अधिक वास्तवात येऊ लागली ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण प्रश्न, निसर्गाचा लहरीपणा, वाढत्या मजुराचा प्रश्न, पिकवलेल्या पीकांना मिळणारा कमीभाव, दुष्काळ , नापिकी, सरकारचे कुचकामी कृषी धोरण आणि या सर्वांमध्ये अडकून पडलेला शेतकरी याचे वास्तववादी चित्रण आता ग्रामीण साहित्यात अधिक प्रभावीपणे चित्रीत होताना आपणाला दिसून येतआहे. 1990 नंतरच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे खाऊजा संकल्पना अधिक दृढ झाली आणि शहरी व ग्रामीण भागातील जनजीवन ढवळून निघाले खेड्यामध्ये बदलाच्या नावाखाली नवनवीन तंत्रज्ञानाचे आगमन झाले. नवनवीन बदलाचे वारे जोराने वाहू



Scanned with CamScanner

 ISBN : 978-93-92313-68-4

लागले त्यामुळे या होणाऱ्या बदलाचा चांगला वाईट परिणाम ग्रामीण जीवनावर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. जागतिकीकरणाच्या प्रवाहात अडकलेला ग्रामीण माणूस पूर्णपणे बदललेला दिसून येतो. त्याचे राहणीमान, त्याची आवड- निवड, त्याची बदललेली जीवन पद्धती यामध्ये प्रचंड बदल झालेला दिसून येतो, या सर्व बदलांचे वास्तववादी चित्रण आपणास विविध कथाकारणे आपल्या कथा साहित्यातून अधिक प्रभावीपणे मांडलेले दिसून येते.

मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारामध्ये उमेश मोहिते, आसाराम लोमटे, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, उत्तम बावस्कर ,अंबादास केदार ,श्रीराम गुंदेकर, प्रभाकर हरकाळ, मथु सावंत यांनी आपल्या कथालेखनातून ग्रामीण जीवनावर वास्तव स्वरूपात लेखन करून मराठवाड्यातील ग्रामीण जीवन वाचकांसमोर मांडण्याचा प्रमाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

सदरील विषय मराठवाड्यातील कृषी जीवन व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. मराठवाड्यातील शेती संदर्भात व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची उकल करण्याच्या दृष्टीने, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या कशा शेतकऱ्यांना भेडसावतात हे या संशोधनाच्या माध्यमातून वाचकाच्या समोर येण्यासाठी व 1990 नंतरच्या कथाकारांनी जागतिकीकरणात अडकलेल्या शेतकऱ्याचे जीवन कशा पद्धतीने आपल्या साहित्यकृतीतून मांडले आहे हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे म्हणून सदरील विषय अतिशय महत्त्वाचा आहे.



Scanned with CamScanner

 ISBN : 978-93-92313-68-4

## मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील अंबादास केदार यांच्या चऱ्हाट साहित्य कृतीतील कृषी जीवन :

'चऱ्हाट' कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथा आहेत. या सर्व कथा ग्रामीण भागात घडणाऱ्या कथा आहेत. कारण लेखक हा ज्या काळात ज्या वातावरणात वावरत असतो, त्यापासून तो दूर राहूच शकत नाही. तो जे पाहत असतो जो अनुभवत असतो त्याला तो साहित्याच्या स्वरूपात बांधण्यासाठी धडपडत असतो. अंबादास केदार हे कथाकार ग्रामीण भागातील कथाकार आहेत. ग्रामीण भागातच त्यांचा जन्म झाला आहे. लेखक सुद्धा एक समाजाचा संवेदनशील घटक असतो म्हणून समाजात राहत असताना त्याला जे अनुभव आले तो ते शब्द स्वरूपात मांडण्यासाठी धडपडत असतो. म्हणूनच त्यांच्या कथा मधून, त्यांच्या भोवतालच्या घटना, भोवतालची माणसं, त्यांची वृत्ती, प्रवृत्ती, त्यांचं जगणं, दुःख, वेदना, यांची जाणीव, जगण्याची धडपड, जगण्याची रीत, इत्यादीचे वास्तववादी स्वरुप त्यांच्या कथा मधून पाहायला मिळते. अंबादास केदार यांच्या कथा गावगाडा मोडलेल्या गावच्या कथा आहेत. कारण गावगाडाच आता शिल्लक राहिलेला नाही. तो केव्हाच उध्वस्त झाला आहे. गावगाड्यात राहणारा सुतार, लोहार ,तेली, शिंपी, न्हावी, इत्यादी गावच्या बलुतेदारीवर जगणारे समाज घटक आता एकतर गाव सोडून बाहेरगावी गेले आहेत किंवा परंपरागत व्यवसाय सोडून जमेल ते काम करीत आहेत. यामुळे त्याचा परिणाम नुसता ग्रामीण व्यवस्थेवर झाला असे नाही तर एकूण ग्रामीण परंपरागत समाज व्यवस्थेत झालेला पाहायला मिळतो. याचे वास्तव चित्रण अंबादास केदार यासारखे कथाकार आपल्या कथेतून करतात, लिहितात. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून उमटलेले पाहायला मिळते आणि ते कमी अधिक प्रमाणात चऱ्हाट मधील या कथासंग्रहातून उमटलेले दिसून येते.



Scanned with CamScanner

 ISBN : 978-93-92313-68-4

'चऱ्हाट' या कथासंग्रहामधून अंबादास केदार यांची सकारात्मक भूमिका दिसून येते. त्यांच्या चऱ्हाट मधील पहिल्याच कथेत दुष्काळा सारख्या आपत्तीमुळे सावकाराकडून होणाऱ्या पिळुनकीमुळे महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हजारो आत्महत्या घडल्या आहेत. घडत आहेत. शेतकरी हातबल झालेला व शेवटी मृत्यूला कवटाळत असताना दिसतो. परंतु त्याला मृत्यूकडे ओढीत नेणारी निराशा दूर करून दिलासा दिला तर तो त्यापासून परावर्त होऊ शकतो. यावर कथाकाराचा विश्वास आहे हे त्यांच्या पहिल्या कथेमधून दिसून येते. या कथेमध्ये मुलीच्या लग्नासाठी विठोबा सावकाराकडे शेती गहाण ठेवून कर्ज काढतो. लग्न दणक्यात पार पाडतो परंतु सावकाराने दिलेले कर्ज विठोबाला वेळेत फेडता येत नाही सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी विठोबा शेतात पेरणीसाठी दुसर्या शेतकऱ्याचे बैल आणून नांगरणी करतो, पेरणी करतो मिरगाचा पाऊस वेळेवर येतो, पेरलेल्या सोयाबीनचे पीक रानात डोलू लागते पण नंतर पाऊसच पडत नाही पीक वाळून जाते शेंड्याला चार शेंगा लागतात त्यामुळे सोयाबीन काढायलाही परवडत नाही. घातलेले बी भरून निघत नाही आणि विठोबाच्या आशेवर पाणी फिरतं आणि शेवटी विठोबा निराश होतो आणि आत्महत्या सारखा विचार त्याच्या मनात येऊ लागतो आणि शेतात जाऊन तो चऱ्हाट आपल्या गळयाला लावून झाडाला लटकून आत्महत्या करायची असे त्यांनी मनातल्या मनात ठरवलं. अशा विचाराने ग्रासलेला विठोबा आत्महत्या करण्यासाठी निघतो, त्यावेळेस त्याला रस्त्यात बारकूदा भेटतात आणि त्याला समजावून सांगतात आणि तो आत्महत्या करण्याच्या विचारापासून दूर जातो. याचे वास्तव चित्रण अंबादास केदार यांनी या कथेत मांडलेले पाहायला मिळते.

'चऱ्हाट' या कथासंग्रहातील दुसरी कथा बटई या कथेत आपल्या शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून बऱ्याचदा मेहनत करणारा शेतकरी दुसऱ्याची



Scanned with CamScanner

शेती बटाईने घेतो त्यामध्ये राबराब राबतो पण निसर्ग त्याला शेवटी साथ देत नाही, तो कसा हतबल होतो, हीच कथा यामध्ये मांडण्यात आली आहे. माणुसकीचा घाव या कथेमध्ये गावगाड्यात परस्परांच्या सहकार्यावर जीवन कशा पद्धतीने अवलंबून असते आणि व्यवहारा व्यतिरिक्त माणुसकी कशी जपली जाते याचे उत्तम उदाहरण या कथेमध्ये पाहायला मिळते. जातीभेद आणि उच्चनीचता पाळल्या जाणाऱ्या काळातही माणुसकी कशी जागी आहे उत्तम उदाहरण या कथेतून आलेले आहे. प्रसूतीचा काळ जवळ आलेल्या कचरू घिसडयाच्या बायकोला प्रसूतीच्या वेदना होऊ लागतात आणि त्याच वेळेस जोराचा मुसळधार पाऊस सुरू होतो. तो थांबता थांबत नाही. त्याच्या पालात पाणीच पाणी होतं अशावेळी गावातील चावडीत तो बायकोला घेऊन जातो, मात्र प्रसूती वेदना असाहाय्य झालेली त्याची बायको पाहून चावडी समोरच्या ग्यानबाच्या दारात जाऊन रात्री आवाज देतो ग्यानबाची बायको घिसड्याच्या बायकोला मदत करते ती प्रसूती होते. मात्र सकाळी गावातला इट्या घिसड्याच्या प्रसूती झालेल्या बायकोला चावडीत पाहतो. आणि तो विश्वनाथाला सांगतो. त्याच्याशी त्याचे भांडण होते. इट्या ला चावडीत घिसड्याच्या बायकोचा मुक्काम आवडलेला नसतो परंतु त्याला समजून सांगितल्यानंतर त्याला त्याची चूक लक्षात येते आणि घिसड्यासारखी भटकंती करणाऱ्या कारागिरांना गावात राहण्यासाठी स्थान नाही हे विदारक चित्र या कथेतून दिसून येते. आणि माणुसकीचे दर्शन घडवणारी ही कथा असल्याचे दिसून येते. परक्याचं धन या कथेतून भ्रूणहत्या विषयीचे चित्रण आलेले पाहायला मिळते. सहाव्यांदा दिवस गेलेल्या संभाच्या बायकोची गर्भ परीक्षा करण्याच्या हेतूने सांभा तील दवाखान्यात घेऊन जातो. पण केरबा नाना त्याला समजावून सांगतो आणि संभाचे विचार बदलतात आणि तो आपल्या बायकोला समजावून सांगतो. सहाव्यांदा पोरगी झाली तरी आपण हिम्मत



Scanned with CamScanner

ठेवायची आणि सगळे देवाच्या नावावर सोडून द्यायचं असं म्हणून तो भृण हत्या करत नाही याचे चित्र या कथेत आले आहे. ग्रामीण माणसाचे मानसिक परिवर्तन कशा पद्धतीने होते यावर प्रकाश टाकणारी ही कथा दिसून येते. पाठीचा खेळ ही अशीच एक वेगळयाप्रकारची कथा या कथासंग्रहात आलेली आहे. या कथेमध्ये डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या पक्या आपल्या मुलाच्या शिकवणीसाठी अस्वस्थ झालेला असतो. त्याला आपल्या मुलांनी खूप शिकावे असे वाटते पण पावसाळा संपला की, खेळ करून पोट भरण्यास पुन्हा भटकंती सुरू करायची असते. अशा परिस्थितीमध्ये काय करावयाचे, याची चिंता त्याला पडते. त्याच्या बायकोलाही हीच चिंता होती, मात्र शाळेतील गुरुजी त्याची मुलं स्वतःजवळ ठेवण्यास तयार होतात आणि पक्या डोंबऱ्याचा प्रश्न मिटतो. असे वास्तविक चित्रण व भटक्या समाजामधील प्रश्नाची उकल त्यांनी या कथेच्या माध्यमातून केली आहे.

'घालमेल' ही त्यांची कथा आजही मुलींच्या शिक्षणासाठी ग्रामीण भागातील बहुजन समाज शिक्षणाला महत्त्व देत नाही, मुलीला शिकवण्यापेक्षा ती वयात आल्याबरोबर तिचे लग्न करावे अशीच त्यांची धारणा असते. तिची शिकण्याची इच्छा असली तरी, तिला शिकवण्यापासून दूर ठेवतो. हे या कथेतून मांडण्यात आले आहे. हातावर पोट असणाऱ्या आई-वडिलांची मुलगी कमल अभ्यासात हुशार असते बारावी पास झाल्यानंतर ती आई वडिलांच्या मनाविरुद्ध पुण्याला जाऊन डी एड करते सीईटीची परीक्षा ती पास होते परंतु तिला नोकरी मिळत नाही. लग्नासाठी पाहुणे बघायला येतात पण देण्याघेण्याच्या कारणामुळे तिची सोयरीक काही जमत नाही. शिक्षण घेऊन नोकरी नाही आणि लग्नही नाही, अशा अवस्थेत तिला नाईलाजाने आपल्या आई-वडिलांबरोबर कष्टाची कामे करावी लागतात. या कथेमध्ये डी एड सारख्या शिक्षणातून देखील बेकारी वाढलेले आहे. याचे विदारक व



Scanned with CamScanner

वास्तववादी चित्र पाहायला मिळते. छळ या कथेमध्ये मूल झालं नाही म्हणून आजही ग्रामीण भागात आपल्या सुनेचा छळ कशा पद्धतीने होतो याचे चित्रण आले आहे. तर त्यामधीलच इरस कथेमध्ये आपल्याला शेताच्या बाजूला मातंग समाजाचा शेजार नको म्हणून बाजीरावला त्रास देणाऱ्या भावकीचे चित्रणआले आहे. तसेच वाचपा या त्यांच्या कथेमध्ये ग्रामपंचायत च्या निवडणुकीचे चित्रण आले आहे. त्यामधील ऑपरेशन, अतिक्रमण, चारा या कथा देखील ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रण मांडणाऱ्या कथा असल्याचे पाहायला मिळतात. त्याच्यातील भाषाशैली, निवेदन शैलीचा जर विचार केला तर त्या सर्व वास्तवाशी धरून ग्रामीण भागातील वास्तव चित्रण मांडणाऱ्या दिसून येतात.

सकस कथालेखन लिहिणाऱ्या ग्रामीण कथाकारमध्ये अंबादास केदार यांचे नाव आवर्जून घेतले जाते. 'चऱ्हाट' या कथासंग्रहामध्ये शेतकऱ्याचे प्रश्न, ग्रामीण जीवनाचे प्रश्न, ग्रामीण जीवनातील कौटुंबिक प्रश्न, बलुतेदारी पद्धतीचा झालेला ऱ्हास, त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांचा अतिशय सूक्ष्म वेध या कथासंग्रहातून अंबादास केदार यांनी घेतला आहे. आधुनिक काळामध्ये यंत्र सामग्री शेतामध्ये स्थिर झाली. त्याचा परिणाम शेतीमातीमध्ये राबणारे पशुधन वरचेवर संख्येने कमी होत गेले. त्याचाही एकूण परिणाम शेतीव्यवस्थेवर कसा झाला. शेतकरी आणि शेतीत राबणारे बैल,गाय यासारख्या पशूंचा जिव्हाळा पुढील काळात कसा कोरडा होत गेला, याचे चित्रण या कथेमध्ये आलेले दिसते. एकूणच 2000 नंतरचे बदललेले ग्रामीण जीवन अंबादास केदार यांनी आपल्या कथेतून साकार केले आहे. असे म्हणता येते.





**संदर्भसूची :**

1. चराट, अंबादास केदार, संगत प्रकाशन, नांदेड प्रथम आवृत्ती जानेवारी 2014.

2. जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, संपादक डॉ. रवींद्र शोभणे.

3. आधुनिक मराठी साहित्य विविध प्रवाह, संपादक डॉ. धनराज धनगर.

Scanned with CamScanner